

# महाभारत

## खंड २८ : द्रोणपर्व ३

मराठी अनुवाद

## श्री. अशोक कोठारे

# महाभारत

## महाभारत खंड अठ्ठाविसावा

## द्रोण पर्व भाग तिसरा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० मे २०२०**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सत्ताविसावा खंड, द्रोण पर्व भाग तिसरा, आपण आता वाचणार अहात, जयद्रथ वध पर्व.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381 2350.html

# - द्रोणपर्व भाग तिसरा –
## जयद्रथ वध पर्व (पुढे चालू)
## भाग पंच्याण्णवावा

धृतराष्ट्र बोलतात, "द्रोणाचे बाण त्या वृश्नीकुळातील अग्रेसर योद्ध्यानी, युयुधनाने तोडल्यावर धृष्टद्युम्नाचे संरक्षण झाल्यावर द्रोण सिनीच्या नातवाशी काय करतात"?
संजय सांगतो, चिडलेले द्रोण त्यांच्या लाल रंगाचे घोडे असलेल्या रथाने मोठ्या वेगांनी युयुधनावर चाल करतात. ते त्यांचे सोनेरी बाण त्याच्यावर मारत सुटतात. ते पाहून सिनीचा नातू त्याच्या सारथ्याला आज्ञा करतो कीं, त्याने त्यांचा रथ जास्तीत जास्त वेगांने द्रोणाकडे न्यावा. जो ब्राह्मण त्याचे ब्राह्मण कर्तव्य विसरला आहे व एका नीच पापी भ्रष्ट आणि उन्मत्त क्षत्रियाची सेवा करत आहे त्याला शासन झाले पाहिजे. ती आज्ञा झाल्या बरहुकूम ते घोडे मोठ्या वेगांने द्रोणाकडे जाऊ लागतात. त्या नंतर त्या दोघांत द्वंद्व सुरू होते. ते नेहमीप्रमाणे एकमेकांवर हजारो बाण फेकत असतात. त्यांच्या बाणांनी सगळे आकाश भरून निघते. त्यांच्या बाणांमुळें सूर्य झाकला गेला होता, वारे वहावयाचे जणू थांबले होते. त्यांचे एकमेकांवर बाण मारणे थांबत नाही, ते दोघे त्यांच्या युद्धकलेचे जास्तीत जास्त चांगले प्रदर्शन करत असतात, दोघे तुल्यबळ दिसतात. त्या असंख्य बाणांचा आवाज ढगांच्या गडगडाटा सारखा सर्वदूर ऐकू येत होता. त्यांचे विषारी बाण ज्यांना सागत होते ते विव्हळत पडलेले दिसत होते. त्यांचे दोघाचे रथ त्यांच्या बाणामुळें विलक्षण असें सुंदर दिसत होते. त्या दोघाच्या छत्र्या फाटलेल्या होत्या. त्यांचे ध्वजस्तंभसुद्धा मोडलेले होते. दोघे रक्ताने माखलेले दिसत होते. दोघे दुसर्याला बाद करण्याच्या प्रयत्नाची पराकाष्ठा करत होते. त्या द्वंद्वाचे निरीक्षण करणारे अनेक योद्धे त्यांना ओरडून उत्तेजन देत होते. कांहीं शंखनाद करून उत्तेजन देत होते तर कोणी टाळ्या वाजवून. रणवाद्ये जोरांने वाजली जाऊ लागतात. इतर सगळे योद्धे लढावयाचे थांबवून ते द्वंद्व पहात बसतात. त्यात सगळे होते जसे, घोडदल, हत्तीदल, पाईक सगळेंच आपापले लढणे थांबवून ते पहात रहातात. तो दोनही बाजूचा सैनिकांचा जमाव शांत होऊन ते पहात होता. देवसुद्धा ते द्वंद्व पहात होते. त्यात सिद्ध, चरण, विद्याधर असें बरेच

होते. ते आकाशातून ते पहात होते. द्रोण व सत्यकी त्यांचे युद्धनैपुण्य सगळ्यांना दाखवत होते. युद्धात त्याचा जय होतो जो थकत नाही. त्या नियमानुसार त्या दोघातील कोण प्रथम थकते त्यावर कोण जिंकणार ते द्वंद्व ते ठरणार असते. सत्यकी द्रोणांचे धनुष्य मोडतो. त्या बरोबर पटकन तो भारद्वाजाचा मुलगा नवीन तिरकमटा घेतो. तो सुद्धा सिनीचा नातू तोडतो. पुन्हा द्रोण जोरांने ओरडत आणखीन एक धनुष्य घेतात ते सुद्धा सत्यकी तितक्याच वेगांने तोडतो. असे नऊ धनुष्य द्रोणांचे तो सत्यकी मोडून टाकत होता. द्रोणांना त्याचे कौशल्य पाहून भार्गवाची आठवण येते. राम, धनंजय, कार्तवीर्य, भिष्म अशा योद्ध्याची तो बरोबरी करत होता युयुधन. सगळे गंधर्व, इंद्र ते युयुधनाचे कसब पाहून संतुष्ट झाले होते. द्रोणांना क्षणभर वाटते कीं, सत्यकीवर कृष्णाची कृपा झाली असावी नांहीतर त्याचे ते कसब अवचित होते. द्रोण आणखीन एक धनुष्य घेतात व मंत्राचे बाण मारतात पण तेसुद्धा तो वृश्नी बाद ठरवतो. ते अगदी आश्चर्यकारक होते. ते खरोखरच सत्यकीसाठी मोठे भूषणावह होते. तुझ्या सैन्यातील जाणकार युयुधनाचे टाळ्या वाजवून कौतुक करतात. जे आयुध द्रोण वापरत होते तीच सत्यकी वापरून त्यांचा डाव उलटवत होता. त्यामुळे द्रोणांचा राग अनावर होत होता. त्या संतापाच्या भरात भारद्वाजाचा मुलगा दैवी आयुध सत्यकीवर टाकण्याचे ठरवतो. त्यात अग्नेय एक होते. त्याचा जणू युयुधनाला आधीच अंदाज आला होता कीं काय तो वरुण अस्त्र काढतो जे अग्नेयाला बाद करण्यासाठी असते. द्रोणांचे अग्नेय अस्त्र बाद होते. ते होत असतांना पांडवांचे युधिष्ठीर, भिमसेन, नकूल व सहदेव सत्यकीला मदत करण्यासाठी पुढे होतात. त्याबरोबर मत्स्य देशाचे आणि सल्वेय राजांच्या फौजा द्रोणांकडे जाऊ लागतात. कौरवांच्या बाजूचे अनेक राजे दुःशासनाच्या नेतृत्वात द्रोणांना मदत करण्यासाठी पुढे होतात. आता ते द्वंद्व रहात नाही. दोन सैन्यातील योद्धे जिंकण्यासाठी लढू लागतात. तो गोंधळ असा होता अहो राजे, कीं कांहींही दिसत नव्हते. मातीचे लोट हवेत उडत होते जसे घोडेस्वार व रथ वेगांने धावत होते एकमेकाविरुद्ध. त्यापुढे ते युद्ध नियमानुसार राहिले नाही व फक्त शत्रूपक्षाच्या माणसांना ठार मारणे हा एकच नियम कार्यरत होता असें दिसत होते.

जयद्रथ वध पर्व भाग पंच्यांण्णवावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग श्याहण्णवावा

संजय पुढे सांगतात. सूर्य अस्ताच्या दिशेने जात होता. आकाश संपूर्णपणे धुळींने भरलेले होते. सूर्याची उष्णता कमी होत होती, तो सोळावा दिवस संपण्याला फक्त कांही घटकांचा अवधी राहीला होता. दोनही बाजूचे बहुतेक सैनिक त्या दिवसाचे युद्ध आटोपते घेण्याच्या तयारीत होते. कांहीं मात्र अजून जोमांने लढत होते. कांहीं विश्रांती घेत पडलेले होते. अर्जुनाला अजून जयद्रथापर्यंत जाता आलेले नव्हते. धनंजयाने त्याच्या बाणांच्या माराने युद्धभूमीत त्यांच्या रथासाठी चांगला मोठा रस्ता तयार केला होता व त्या रस्त्याने त्यांचा रथ जयद्रथाच्या पाशी जात होता. कृष्ण तो रथ वेगांने नेत होता. त्याचे सारथ्या पहाण्यासारखे होते. त्याच वेळी अर्जुनाचे बाण वेगांने शत्रूंच्या अगात घुसत होते. त्यामुळे वहाणारे रक्त पिण्यासाठी नरमांस भक्षक प्राणी त्याच्या मागून जात होते. हृषिकेश त्याचा रथ गरुडाच्या वेगांने नेत होता. ते पाहून कोणाचा त्यांच्या डोळ्यावर विश्वास बसला नसता. जणू तो सुर्याचाच रथ असावा असें वाटत होते पहाणार्यांना. थोड्याच काळात त्यांचा रथ तुमच्या रथांच्या वेढ्याजवळ पोहोचतो ज्यामध्ये जयद्रथाला ठेवलेले होते. ते भूकेने व्याकूळ झाले होते व त्यांच्या घोड्याना सपाटून तहान लागलेली होती. त्यांना विविध आयुधांमुळे जखमा झाल्या होत्या. रणभूमीत मरून पडलेल्या हत्ती, घोडे व माणसे ह्यांना डावलून त्याना चक्रा मारत त्यांचा रथ त्यांना न्यावा लागत होता. ते सोपे नव्हते. त्यानां अवंतीचे योद्धे विंद व अनुविंद पहातात कीं, अर्जुनाचे घोडे थकले आहेत. ते त्याला आव्हान देतात. त्या दोघांना ती एक चांगली संधी आहे असे वाटते व ते खूप खूष होतात. ते अर्जुनावर साठ बाण मारतात व कृष्णावर सत्तर त्याशिवाय रथाच्या घोड्यांना सुद्धा ते जखमी करतात. परंतु, अर्जुन त्यांच्या नाजूक भागावर नेमके बाण मारतो व त्यांचा जोर कमी करतो. त्या मारामुळे चिडलेले ते दोघे अवंतीचे विभत्सूवर हल्ला करतात. त्यानंतर शांतपणे धनंजय त्या दोघांचे धनुष्य व सोन्याचे ध्वजस्तंभ मोडून टाकतो. त्यांनतर तो त्यांचे सारथी मारून टाकतो व नंतर मोठ्या भावाला मारतो. तो जमिनीवर कोसळतो. मोठा भाऊ मारला गेला आहे ते पाहिल्यावर धाकटा गदा घेऊन खाली उतरतो. तो

कृष्णाला गदेने कपाळावर मारतो. कृष्णाला त्यामुळे कांहींच झाले नाही असा तो स्थीर असतो. त्यानंतर अर्जुन सहा बाणांनी त्याचे मुंडके उडवतो व शरीराचे तुकडे करतो. त्यांचे राजे मारले गेले ते पाहून त्यांचे इतर योद्धे अर्जुनावर चाल करून येतात. अर्जुन असंख्य बाणांने त्या सगळ्यांना यमाकडे पाठवतो. त्यांचा नाश केल्यानंतर कौरवांची भितीने गाळण उडाली. परंतु, लवकरच ते सावरतात व नवीन आघाडी करून धनंजयावर चाल करतात. त्यांचा असा समज झालेला असतो कीं, अर्जुन व कृष्ण फार थकलेले आहेत व जयद्रथाचे ठिकाण अजून खूप दूर आहे. ते अर्जुनाच्या रथाला वेढा देतात. ते पाहून अर्जुनाला हसू येते. तो कृष्णाला बोलतो, "आपले घोडे बाणांने जखमा झाले आहेत. जयद्रथ अजून खूप दूर आहे. अशा परिस्थितीत काय केले पाहिजे असे तुला वाटते ते सांग. तू नेहमी योग्य निर्णय घेत असतोस म्हणून मी तुला विचारत आहे. आम्हा पांडवांसाठी तू त्यांचे नेत्र आहेस. मला काय योग्य वाटते ते तुला सांगू कां? मला वाटते कीं, आपण आपल्या घोड्यांना रथातून मोकळे करावे व त्यांच्या अंगात घुसलेले बाण काढावेत व त्यांना औषधं लावावीत". ते ऐकून केशव त्याला सांगतो, "तुझे बरोबर आहे, तेंच आपण केले पाहिजे". अर्जुन त्यावर कृष्णाला सांगतो कीं, जोवर तो घोड्यांचे पहात आहे तोवर तो शत्रूच्या फौजांना काबूत ठेवेल. त्यावर केशव ते मान्य करतो व तसे करण्याचे ठरते.

संजय पुढे सांगतो, रथाच्या गच्चीवरून तो उतरतो, त्याचे गांडीव सज्ज ठेवून तो शत्रूच्या फौजांवर बाणांची वर्षाव करू लागतो. त्याला रथातून उतरलेला पाहून तुझे क्षत्रिय समजतात कीं, त्यांचा जय झाला आहे. ते मोठ्याने घोषणा देत त्याच्याकडे जाऊ लागतात. ते त्याच्यावर त्यांच्या बाणांचा वर्षाव करू लागतात. त्या अगणित योद्ध्याना पाहून अर्जुन त्यांना त्याच्या विविध शस्त्रांने गोंधळात टाकतो. तो त्यांच्यावर सतत असंख्य बाणांचा वर्षाव करत रहातो. दोनही बाजूने होणार्या त्या बाणांच्या वर्षावामुळें आकाश भरून जाते. ते सगळे विजयासाठी एकमेकांना मारत होते. त्यात वातावरण तांपलेले होते. त्या असंख्य रथांच्या गराड्यात तो अडकलेला होता. त्यात शंखनादाने आकाश दणाणून गेले होते. जीवंत व जखमी आणि मेलेले असे सगळे तेथे गर्दी करून होते. पार्थ त्याची कमाल करत होता तो शत्रूंचा ओघ थांबवण्यासाठी. तो

एकटा होता व त्याच्यावर बाणांचा मारा करणारे असंख्य होते. जमिनीवर मरून पडलेले, जखमी, जीवंत असे सैनिक त्याबरोबर मोडलेले रथ, त्यांचे फाटलेले ध्वज, त्यांचे आडवे तिडवे पसरुन पडलेले दांडे अशातून पुढे सरकणे सोपे नव्हते त्यांमुळे क्षत्रिय आहेत तेथूनच पार्थावर बाणांची मारा करत होते. कांहींचे बाण संपल्यामुळे ते तसेंच अडकलेल्या स्थितीत गप्प उभे होते. कांहीं क्षत्रिय थकल्यामुळें तेथेच कांहीही न करता शांतपणे उभे राहून इतराचे युद्ध पहात होते. कांहीं त्यांचा घाम पुसत होते. कांहीं त्याच्या जखमा पहात होते. त्या गदारोळात महाबली जनार्दन अर्जुनाला बोलतो, "अरे जिश्नू, येथे घोड्यांना देण्यासाठी पाण्याची विहीर नाही. आपले घोडे तहानलेले आहेत. त्याना जखमा धुतल्यावर आंघोळ घालावी लागेल त्यासाठी सुद्धा पाणी ह्या रणांगणात नाही तर त्यासाठी तू कांहीं करू शकतोस कां"? ते ऐकल्यावर अर्जुन एक बाण मंत्र म्हणून तेथेच मातीत मारतो. त्या बरोबर एक विस्तीर्ण सरोवर तेथे निर्माण होते ज्यात हंस, चक्रवाक असें पक्षीसुद्धा होते. त्या सरोवरात मांसेसुद्धा पोहतांना दिसत होते. ते पाहून तुझे सैनिक सुद्धा अचंबित होतात, बहूतेकांना तहान लागली होती त्यामुळें ते क्षत्रिय युद्ध थांबवून त्या तलावाकडे धावत जातात. सगळे त्या थंड व रुचकर पाण्याने आपली व त्यांच्या जनावरांची तहान भागवू लागतात. मोठे हत्तीसुद्धा त्या पाण्यात उतरतात. कांहीं काळासाठी युद्धाचा विसर सगळ्याना पडल्याचे दिसते. अर्जुनाची ती किमया पाहून तुझे सैनिक व दोस्त राजेसुद्धा पार्थाचे कौतुक करत होते. कांहीं काळासाठी ते वैर संपले आहे असे दिसत होते. त्या सरोवराला आकाशातून कांहीं ऋषी उतरून भेट देतात. त्यात नारदसुद्धा असतात. अर्जुन त्वश्त्री (देवांचे अभियंता) साक्षात असावा असें ते करत होता. त्याच्या भोवती बाणांचे कुंम्रण व भिती खांबे तो रचतो . ती करामत पाहून कृष्ण व इतर तुझे व पांडवांचे क्षत्रिय पार्थाचे कौतुक करू लागतात. कांहीं काळासाठी वैर संपले आहे असे वाटते. कृष्ण पार्थाची पाठ थोपटतो व शाब्बास शाब्बास असे कौतुक करतो.

जयद्रथ वध पर्व भाग श्याहण्णवावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग सत्त्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, तो जलाशय तयार केल्यानंतर, त्याने शत्रूपक्षाचे सैन्य काबूत आणण्यास सुरूवात केली. त्याने त्यांच्या संरक्षणासाठी जो बाणांचा महाल तयार केलेला असतो तो पाहून वासुदेव फारच संतुष्ट होतात. ते रथातून उतराताता, घोड्यांना जूतातून मोकळे करतात, त्यांच्या शरीराला लागलेले बाण काढतात, ते पाहून सिद्ध, चरण, आणि आसपासचे योद्धे त्यांच्या कौतुकाचे बोलत एकच ओरडा करतात. पांडवांचे शत्रूसुद्धा त्याने इतके प्रभावीत झाले होते कीं ते अर्जुनाची प्रशंसा करण्याचे नाकारू शकत नाहीत. तरीसुद्धा कांहीं राजे समजतात कीं, ही नामी संधी आहे कीं, अर्जुनावर हल्ला करता येईल. त्याप्रमाणे ते त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करतात. विविध प्रकाराने ते त्यांच्यावर चाल करून जातात. दुष्मनाचे दोस्त अर्जुनावर बाण मारत असतात परंतु, अर्जुनाने जे अदृष्य कवच त्यांच्या भोवती निर्माण केले होते त्यामुळे ते बाण त्यावर आदळून खाली पडत असतात. अर्जुन व कृष्ण त्यांचे घोड्यांची निगा करण्याचे काम निवांतपणे करतच रहातात. त्या बाणां प्रमाणे गदा, भाले असे बरेच कांही शत्रू फेकत होते परंतु, त्या अदृष्य कवचामुळे ते सुरक्षित होते. जरी ते दोघे जमिनीवर होते तरी ते शत्रूला आवरता येत नव्हते. शत्रू असूनही तुझे मुलगे अर्जुनाच्या किमयेची तारिफ करत असतात. ते एकमेकांना सांगत असतात, "असे चमत्कारीक कृत्य दुसरे कोणी केलेले आम्ही पाहिलेले नाही. जे पार्थ व वासुदेव करत आहेत. भर युद्धात ते त्यांचे घोडे रथापासून सुटे करतात व त्यांना औषध लावतात असें कोणी आधी केलेले ऐकिवात नाही. त्यांच्या त्या कृतीतून आम्हीसुद्धा कांहीं शिकू शकतो". ते समजल्या सारखे कृष्ण स्मित करतो जसें काय तो रणांगणात नसून त्याच्या राधांमध्ये बसला आहे. त्या बाणांच्या सुरक्षित दालनात तो त्याचा रथ नीट करत असतो आणि ते सगळे भर युद्धात ते करत असतात. त्यानंतर त्यांचे घोडे ताजेतवाने होतात. त्यांच्यामध्ये घुसलेले बाण काढल्याने ते जास्त तरतरीत झालेले दिसतात. तो त्याना जलाशयातील पाणी पाजतो. अशारितीने ते दोघे त्यांच्या घोड्यांची अशी निगा करतात

कीं जणूकाय ते त्यांचे साथीदारच आहेत युद्धामधील. ते झाल्यानंतर कृष्ण त्याचे घोडे पुन्हा जूला बांधतो व रथ तयार करतो पुढच्या चढाईसाठी. ते पाहून तुझे कौरव बेचैन झालेले दिसतात. ते स्वताला दोष देऊ लागतात व म्हणतात, "अरे, ते आपल्या नजरेसमोर गेले जयद्रथाच्या मागे, धिक्कार असो आपला. ते आता पुन्हा आपली कत्तल करण्यास सुरूवात करणार"! "आपण त्याना मारू शकलो नाही"! दुसरे कांहीं बोलतात चला आता आपण त्यांचा नाश करण्यासाठी त्यांच्या मागे जाऊ, नाहीतर ते दोघे जयद्रथाला पकडतील". कित्येक मोठे नामवंत राजे अजून त्या अर्जुनाच्या किमयेने प्रभावित असे स्वताशी बोलतात, "तो दुर्योधन किती मूर्ख आहे पहा, अशांच्याशी तो शत्रूत्व करतो ज्यांच्याशी कोणीही केवळ मैत्रीच करणे शहाणपणाचे समजेल. अशाप्रकारे तेथे तुझ्या दोस्त राजांत बातचीत होत होती. ते म्हणतात किं, "तो सिंधचा राजा आज यमाच्या घरी खात्रीने जाणार आहे मग आपण कशाला त्यात जा"!

अर्जुन पहातो कीं, सूर्य मावळतीकडे जात आहे. म्हणजे आता फार कमी वेळ उरला आहे. ते दोघे जास्त वेगांने जयद्रथाच्या ठिकाणी जाण्यासाठी रथाचा वेग वाढवतात.

ताज्या दमाचे त्यांचे घोडे वार्याच्या वेगांने धावू लागतात. त्यांच्या वेगांने जाण्यामुळे तुमचे सैन्य अस्वस्थ झाल्यासारखे दिसत होते. कृष्ण मोठ्याने त्याचे शंख फुंकतो व आव्हानाचे जाहिर करतो. त्यामुळें कौरवांच्या सैन्याची होणारी चलबिचल पहाण्यासारखी होती. त्याच्या रथाचा वेग त्याने फेकलेल्या बाणांच्या वेगापेक्षा जास्त होता म्हणून त्याचे बाण त्याच्या मागे पडत होते. कौरवांच्या फौजा धनंजयाला घेरण्याचे प्रयत्न करू लागतात. दुर्योधन पार्थाच्या जवळ जाऊ लागतो, त्याला दिलेल्या चिलखताचे आधाराने त्याला नवीन जोर आलेला असतो. कौरवांचे योद्धे तो कपीधारक ध्वज फडकतांना पहातात. त्याचे दर्शनाने ते खचून जातात. रणांगणातील मातीच्या धूळीमुळे सूर्य झाकला गेला होता, त्यामुळें तुमचे योद्धे धनंजयाला व त्याच्या रथाला नीटपणे पाहू सुद्धा शकत नव्हते.

जयद्रथ वध पर्व भाग सत्त्याणववावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग अठ्ठ्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, धनंजय व कृष्ण त्यांच्या वेगवान रथने तुमच्या अनेक पलटणी पार करून जयद्रथाच्या ठिकाणी पोहोचलेले पाहून तुमचे सगळे लोक चिंताक्रांत झालेले दिसतात. अर्जुन व कृष्ण मात्र त्यांचे चित्त शांत ठेवून पुढे जात असतात. त्यांना अडवणारे राजे व त्यांचे सैन्य ते मारत पुढे जात होते. ते पाहून कितीतरी क्षत्रिय युद्ध सोडून पळून जात असलेले दिसत होते. त्यांना कितीही सांगितले तरी ते तुझ्यासाठी लढण्यास तयार नव्हते कारण ते समजले होते कीं, कौरवांचा पराजय होणार आहे हे निश्चित मग कशाला आपला जीव त्यांच्यासाठी खर्च करावा". त्या विचारसरणीने उचल घेतली होती तुझ्या बहुतेक योद्ध्यांच्या मनात म्हणून अर्जुनाला विरोध करणार्यांची संख्या कमी झालेली दिसत होती. फक्त जे खास होते मात्र अजून अर्जुनाला विरोध करणांता दिसत होते. परंतु, त्यांचा टिकाव लागत नव्हता. त्यामुळें त्या दोघा कृष्णांची परिस्थिती अशी होती जसे चंद्र सूर्य राहूच्या तावडीतून सुटले आहेत. द्रोण व हृद्रीकाचा मुलगा कृतवर्मन ह्याचा व त्यांच्या फौजांचा विरोध मात्र चालू होता. दोनही बाजूंने बाणांचे वर्षाव सतत चालू होते. तरी त्या विरोधाला न जुमानता पार्थ व जनार्दन वेगांने जयद्रथाच्या ठिकाणी जातच होते. त्यांचा प्रवास असा होता, जसे ते आगीच्या वणव्यातून जात आहेत. किंवा जसे संतापलेल्या मोरी माशांच्या तावडीतून दोन देवमासे सुटत आहे. किंवा जसे सागराच्या लाटांच्या तडाख्यातून दोन देवमासे सुखरुप निघाले आहेत. तुमच्या मुलांना वाटत होते कीं, द्रोणांच्या पेचातून ते दोघे सुटणार नाहीत परंतु, ते सुटलेले होते. आता त्यांना जयद्रथाच्या सुटकेची शाश्वती उरलेली नव्हती. द्रोणामुळें व कृतवर्मनामुळें त्यांना विश्वास होता कीं, जयद्रथ वाचेल परंतु आता त्यांचा विचार बदललेला दिसत होता. भोजांच्या विळख्यातून सुद्धा ते निसटलेले होते ह्यांचे कित्येक अनुभवी राजांना आश्चर्य वाटत होते. जयद्रथ मरणार हे सगळे समजून चुकतात. ते दोघे समजतात कीं, जयद्रथाचे ठिकाण त्यांच्या आवाक्यात आले आहे. ते एकमेकांशी बोलतात, "तो जयद्रथ त्यांच्या सहा योद्ध्यांच्या मध्ये सुरक्षित असा

ठेवलेला आहे. तरी तो माझ्या हातून सुटणार नाही. अगदी इंद्रसुद्धा त्याला माझ्यापासून वाचवणार नाही". अर्जुन कृष्णाला सांगतो. त्यांचे ते संभाषण तुझे लोक ऐकतात. तुमच्या भागातून दुःखाच्या किंकाळ्या ऐकू येऊ लागतात. पार्थ व कृष्ण झपाट्याने पुढे सरकत असतात. द्रोण व कृतवर्मनाच्या पेचांतून सुटलेले ते दोघे पाहून तुमचे लोक समजतात कीं, आता जयद्रथाला कोण वाचवणार? त्यांच्या चेहर्या वरील क्रुध्द भाव पाहून ते आणखीनच खच्ची झालेले होते. कारण आता पार्थाला कोण अडवणार?

आपण जयद्रथाच्या जवळ आलो आहोत त्या समजूतीने ते दोघे कृष्ण समाधानी दिसत असतात. ते साक्षात इंद्र व अग्नी असें चमकत होते. सुसरीने भरलेल्या नदीतून सुरक्षित बाहेर येण्यासारखे ते होते. तरी द्रोणांचे व कृतवर्मनाचे फेकलेले बाण त्यांच्या अंगावर खूणा ठेवून होते. द्रोणांच्या पेचातून निसटणे म्हणजे, एकादा हाताने पोहत पांच नद्या (शतद्रू, विपाशा, रावी, चंद्रभागा, वितस्ता) एका झटक्यात पार करण्यासारखे होते. भक्ष्यावर तुटून पडणार्या सिंहासारखे ते दिसत होते. जयद्रथ मेल्यातच जमा होता. त्यामुळें कोणीही त्याच्या जीवासाठी फार विचार करत नव्हते. अखेरीस तो जयद्रथ अर्जुनाला दिसतो. त्याला पहाताच अर्जुनाचे डोळे आणखीनच लालेलाल होतात. तो गर्जना करतो. कृष्ण हातात रथाचे लगाम घेऊन व उभ्याच तो रथ हाकत होता व त्याच्या बाजूला पार्थ हातात गांडीव घेऊन सज्ज असे ते वेगांने जयद्रथाकडे जात असतात. भक्ष्य दिसल्यावर जो उतावळेपणा घार दाखवते तसा उतावळेपणा पार्थात दिसत होता. सूर्य अजून दिसत होता म्हणजे वेळ अजून बाकी होती. त्याच वेळी दुर्योधन त्याच्या नव्याने मिळालेल्या चिलखतात जणू अर्जुनाची वाट पहात उभा आहे असा दिसत होता. तो वेगांने पुढे घुसतो अर्जुनाचा रथ अडवण्यासाठी. तुझ्या मुलाचे सगळे लक्ष कृष्णाकडे होते. दोघे जोराने ओरडतात व शंखू वाजवून एकमेकांना आव्हान देतात. दुर्योधन जयद्रथाच्या संरक्षणासाठी स्वतः पुढे झाला होता. ते पाहून कृष्ण अर्जुनाला त्या प्रसंगानुसार कांहीं बोलतो.

जयद्रथ वध पर्व भाग अठ्ठ्यांण्णवावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग नव्यांण्णवावा

वासुदेव अर्जुनाला बोलतो, "अरे धनंजया, हा दुर्योधन तुला आव्हान देत आहे. ते मोठे नवल करणारे आहे. तो वास्तवात एक चांगला रथी आहे. तो एक चांगला धनुर्धारीसुद्धा आहे. त्याचे युद्ध कौशल्य चांगले आहे. त्याला पराभूत करणे साधारण क्षत्रियाला सोपे नाही. त्याची लढण्याची पद्धत धुसखोरीची आहे हे तुला माहीत आहेच. वैभवात वाढलेला आहे. त्याला कष्ट माहीत नाहीत. तो तुमचा द्वेष्टा आहे. अशा करता, तुला प्रथम त्याला मारावे लागेल मग जयद्रथ, असे दिसत आहे. त्याच्यावर विजय कां पराजय हे ठरणार आहे. तुझा सगळा राग त्याच्यावर काढ. तो तुमच्या सगळ्या त्रासाचे मूळ आहे. जर त्याला मारलेस तर हे युद्ध आत्ताच संपूष्टात येईल. तो तुझ्या आवाक्यात येत आहे. त्याला लक्ष्य कर. हा सत्तेचा हावरा स्वतः का आला आहे लढावयाला? कदाचित तुझे शुभभाग्य असेल कीं हा स्वतःच मारावयाला आला आहे. त्यात कांही नवीन कपट कारस्थान तर नाहीं नां? त्याची बुद्धी भ्रष्ट झाली आहे कां? त्याला कोणत्याही पापकर्माचा कधी पश्चात्ताप वाटत नाही. त्याला तुझ्या सामर्थ्याची कल्पना नाही असे वाटते. आत्ताच असे कर कीं, त्याचा जीव जाईल. वैभवात राहिल्याने त्याचा अहंकार फार वाढला आहे. त्याला दुःख म्हणजे काय ते माहीत नाही. त्याला तुझ्या युद्धकौशल्याचा सुद्धा अनुभव नाही. तिनही जगातील लोक, देव, असुर व मानव तुझ्यापुढे उभेसुद्धा राहू शकत नाहीत ह्याची त्याला कल्पना नाही. तुझ्यापुढे हा दुर्योधन तुच्छ आहे. हे तुझे भाग्यसमज कीं, त्याला तुझ्या जवळ येण्याची दुर्बुद्धी झाली आहे. जसे पुरंदराने वृत्राचा वध केला तसा तू ह्या असुराचा वध लवकर करून टाक. कपटाने त्याने तुझ्या युधिष्ठीराला फसवले. तुम्ही जितके पवित्र अहात तितका हा अपवित्र आहे. त्याने तुम्हाला फक्त त्रास देण्याचे काम केले आहे. युद्धाच्या क्षेत्रात ते होवू दे. कोणतीही शंका कुशंका न करतां सरळ त्याचा वध करून टाक. त्यामुळें मानवतेचे भले होणार आहे. त्याने ज्या सगळ्या वाईट गोष्टी तुमच्याबरोबर केल्या त्या आठवून त्याबद्दल त्याला शिक्षा कर. दुर्योधन हा पापात्मा

आहे. अरे पंडुपुत्रा, अशी संधी वाया घालवू नकोस. तो तुझ्या बाणांच्या कक्षेत येत आहे. ह्याचा काटा काढून तू तुझ्या अनेक अपेक्षा ज्यांची तुला आज कल्पनासुद्धा नाही, त्या तू नकळतपणे पूर्ण करणार आहेस. फार प्राचीन काळी जसे इंद्राने असुर जंभाला मारले तसे तू आज ह्याला मार. त्याचे अंत्ययात्रेची तू तयारी कर ह्या निमित्ताने".
संजय पुढे सांगतो, ते कृष्णाचे ऐकल्यावर पार्थ त्याला सांगतो, "तुझ्या म्हणण्याप्रमाणे होईल. सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून ते मी करणार आहे. माझे युद्ध सामर्थ्य पणाला लावून मी त्याचे मुंडके धडापासून वेगळे करणार आहे. त्याने आमचे राज्य अवैधपणे बळकावून उपभोगले आहे, त्याची शिक्षा त्याला झालीच पाहिजे. द्रौपदीचा जो अपमान त्याने केला आहे त्याचीसुद्धा त्याला शिक्षा झाली पाहिजेच. अशारितीने ते दोघे मजेत गप्पा मारत होते. ते होत असतांना त्यांचा रथ दुर्योधनाच्या जवळ जात होता. तुमचा मुलगा कृष्णाच्या व पार्थाच्या जवळ जात असतांना त्याला कसलीच भिती वाटत नव्हती. जरी ते प्रसंग कोणाच्याही मनात भय उत्पन्न करणारा होता. तुझ्या बाजूचे क्षत्रिय तुझ्या मुलाच्या धैर्याचे कौतुक करत टाळ्या वाजवत होते. जसें ते आणखीन जवळ आले एकच आरडा ओरड तुझ्या लोकांनी सुरू केली. दुर्योधन अर्जुनाचा रथ थांबवतो. ते पाहून धनंजयाला फार राग येतो. दोघेही फार रागावलेले दिसत होते. तुझ्या मुलांने पार्थाला युद्धाचे आव्हान हसत हसत दिले मात्र. ते पाहून कृष्णालासुद्धा हसू आवरेना. ते दोघे शंखनाद जोरांने करतात. धनंजय व कृष्ण आनंदात आहेत हे पाहून तुझे मुलगे घाबरून जातात. त्याना समजते कीं, आता त्यांच्या मोठ्या भावाचे कांहीं खरे नाही. तुमचे योद्धे अर्जुनाला व कृष्णाला हसतांना पाहून बोलतात, "आपला राजा आता मेला".
दुर्योघन बोलतो त्याच्या सैनिकांना, "तुम्ही असें घाबरून जाऊ नका. मी ह्या दोघांना यमाकडे पाठवणार आहे". त्यानंतर तो अति आत्मविश्वासी कौरव पार्थाकडे चिडून बोलतो, "अरे पार्था तू, पंडूच्या घरात जन्मलेल्या, तुझी सगळी आयुध माझ्यावर वापरून पहा. मी कृष्णाला सुद्धा आव्हान देतो कीं, त्यानेसुद्धा त्याची करामत माझ्यावर करून दाखवावीच. जरा फुशारकी काय आहे तुमची ती मला पाहू द्या. सगळे सांगतात कीं, तुझ्याकडे हे आहे ते आहे, मग आता मला दाखव तुझे शौर्य किती आहे. चल हो पुढे. जयद्रथ वध पर्व भाग नव्याण्णवावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग शंभरावा

संजय पुढे सांगत असतो, अशारितीने दुर्योधन त्या दोघांना आव्हान देतो. त्याच वेळी तो तीन बाण अर्जुनावर फेकतो. चार आणखीन बाण त्याच्या चार घोड्याना मारतो. त्यानंतर तो कृष्णावर सुद्धा त्याच्या छातीत बाण मारतो. त्याच्या हातातील लगाम तो तोडून टाकतो. तो लगाम जमिनीवर पडतो. पार्थ शांतपणे त्याच्यावर बारा आण मारतो परंतु, ते सगळे दुर्योधनाने घातलेल्या चिलखतामुळें निकामी ठरतात. त्यानंतर धनंजय आणखीन चौदा धारदार बाण फेकतो पण तेसुद्धा निरुपयोगी ठरतात. ते पाहून कृष्ण सावध होतो व पार्थाला बोलतो, "मला असें झालेले कधी अपेक्षित नव्हते. तू मारलेले बाण निरूपयोगी होतात हे नवल आहे. तुझ्या गांडीवाची शक्ती कमी झाली आहे कां? तुझी तपस्या कमी पडते कां? हा तुझा दुर्योधनाचा शेवटचा मुकाबला तर नाहीं नां? मला ह्याचे कमालीचे आश्चर्य वाटत आहे, हे काय होत आहे"? तुझे शक्तीमान बाण असें कसे व्यर्थ जात आहेत. कांहींतरी किमया दुर्योधनाच्या चिलखतात, ते समजले पाहिजे.

अर्जुन त्याला सांगतो, "मला खात्री वाटते कीं, हे चिलखत द्रोणांनी त्याला दिले आहे. त्यांने मंत्रसिद्ध करून ते त्याला बांधले आहे, म्हणून माझे तीर त्याच्यावर परिणाम करू शकत नाहीत. द्रोणांना ते त्यांच्या गुरूने दिले आहे. ते शिरस्त्राण माझ्या बाणाने भंग होणार नाही. इंद्राने स्वतः ते द्रोणांना दिले असावे. तुला ते सगळे माहीत असतांना मला काय प्रश्न विचारत आहेस? तुला सगळे माहीत असतांना असे भोळेपणाचे नाटक तू कां करत आहेस"? हा दुर्योधन त्या चिलखतात आहे म्हणून माझ्याकडे येण्याचे धाडस करत आहे. परंतु, ते शिरस्त्राण घालणार्याने कांहीं गोष्टी करावयाच्या असतात, त्यांची मात्र माहिती त्याला नसावी. तो ते सांगकाम्यासारखे घालून माझ्यापुढे हुशारी करत आहे. आता पहा माझ्या गांडीवाचा प्रताप. त्या चिलखतात असला तरी मी त्याला बाद करणार आहे ते कसे, ते तू पहात रहा. शिवांने ते अंगीरसांना दिले होते. त्याच्या कडून ते बृहस्पतीना मिळाले, त्याच्या कडून ते इंद्राला मिळाले आहे. महादेवांनी मला

ते एकदा मंत्रोच्चारासह दिले आहे. ते दैवी आहे व ते साक्षात ब्रह्माने उत्पन्न केलेले आहे. तरी आता पहा माझ्या बाणांने ते निरुपयोगी कसे होते ते".
संजय पुढे सांगतो, असे बोलून अर्जुन कांहीं बाण मंत्राने उत्तेजित करतो ते त्याच्यावर नेम धरून मारणार एवढ्यात अश्वत्थामा ते त्याचे मंतरलेले बाण उडवतो. ते झाल्याने आश्चर्य करत अर्जुन त्या अश्वत्थामा कडे पहात रहातो. कृष्णाला बोलतो, "मी हे मंत्र दुसर्यांदा वापरू शकत नाही. जर केले तर ते मलाच आणि माझ्या सैन्याला मारतील". ते बोलत असतांना दुर्योधन अर्जुनाच्या रथावर आणखीन बाण मारत असतो. तो बाणांचा मारा पाहून ते दोघे कृष्ण मोठ्याने गर्जना करतात. त्यांची रणवाद्ये वाजवतात. अर्जुन दुर्योधनाचे अंग पहातो तर तो पहातो कीं, त्याच्या अंगाचा सगळा भाग त्या दिव्य चिलखताने झाकलेला आहे. पार्थ त्याचे घोडे मारतो. त्याचे सहाय्यक सारथी मारतो. त्यानंतर तो दुर्योधनाचे धनुष्य मोडून टाकतो. त्याच्या हातातील संरक्षक कवच फाडून टाकतो. त्यानंतर तो सव्यसाची त्याच्या रथाची मोडतोड करू लागतो. त्यानंतर तो दुर्योधनाचे कान कापून टाकतो जे त्या चिलखताबाहेर होते. त्यानंतर पार्थ त्या कौरवाचे हात फाडतो. आपल्या राजाची अशारितीने दैना होत आहे ते पाहून तुमचे योद्धे त्याला मदत करण्यासाठी पुढे होतात. ते हजारांने होते. त्यात असंख्य हत्ती, घोडे, रथ व पायदल होते. त्यांच्या गर्दीत पार्थ व कृष्ण दिसत नव्हते. त्या तुझ्या सैन्याची सव्यसाची कत्तल करू लागतो. असंख्यांचे हातपाय तुटून जातात. त्यांच्या किंकाळ्याने आसमंत भरून जातो. अर्जुनाच्या रथाभोवती एक मैल इतक्या पसार्यात ते तुझे सैन्य त्यांच्या रथाला विळखा घालून होते. त्यातून बाहेर पडणे सोपे नव्हते. त्यामुळे अर्जुनाचा रथ जागीच अडकला होता. कृष्ण ओळखतो कीं आता त्यालच कांहीं करावे लागणार आहे, तेव्हां तो पार्थाला सांगतो, तुझे गांडीव सज्ज असू दे मी आता माझ्या पांचजन्य शंखाचा आवाज करणार आहे. ते ऐकल्यावर अर्जुन न डगमगता त्याचे नरसंहाराचे काम चालू करतो. त्या दोघांचे चेहरे धुळीने माखलेले होते. त्या शंखनादाने कौरवांचे सगळे सैन्य बेहोष होऊन मातीत पडले. अर्जुनाचा रथ त्या वेढ्यातून बाहेर ते काढू लागतात. कारण त्याना अडवण्यासाठी कोणी तुमचा सैनिक शुद्धीवर नव्हता. ते पाहून पांडवांचे सैनिक मोठ्या उत्साहाने लढण्यासाठी सज्ज होतात. त्यावेळी जयद्रथाचे

संरक्षण करणारे पार्थाचा रथ त्यांच्या जवळ येत आहे हे पाहून जोराजोराने किंचाळू लागतात. त्यांचे बाण व त्यांचे शंखनाद असें दोनही ऐकू येत होते. धनुष्याचे टणत्कार त्यात भर घालत होते. वासुदेव व पार्थ त्यांचे शंख वाजवतात. ते आव्हान असते. सगळ्या दहा दिशांना तो शंखनाद जातो. त्याला प्रतिसाद म्हणून दोनही बाजूचे सैनिकसुद्धा त्यांचे शंखू वाजवू लागतात. तुमचे योद्धे अर्जुनाचा रथ त्यांच्या नजिक येत आहे ते पाहून अस्वस्थ होतात. परंतु, ते लवकरच सावरतात व प्रतिकारासाठी सज्ज होतात. तुमचे रथी मोठ्या तयारीने अर्जुन व कृष्णाला तोंड देण्यासाठी पुढे होतात. ते दृष्य मोठे विलोभनीय होते.

जयद्रथ वध पर्व भाग शंभरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकावा

संजय पुढे सांगतो, तुमचे योद्धे त्या वृश्नी अंधक आणि कुरु योद्ध्याना ठार मारण्यासाठी मोठ्या उत्साहाने पुढे होतात. विजय आणि जनार्दन सुद्धा त्याच उद्देशाने त्यांच्यावर चाल करतात त्यांच्या सोन्यानी मढवलेल्या व व्याघ्र चर्माने सजवलेल्या रथातून. त्यांची सगळी शस्त्रं सज्ज होती. ते जोरा जोराने युद्धाच्या ललकार्या देत आक्रमण करतात. त्यांचे घोडेसुद्धा रागावल्यासारखे धावत होते. भुरिश्रव, सल, कर्ण, वृषसेन, जयद्रथ आणि कृप त्याशिवाय मद्रदेशाचा सल्य, द्रोणांबरोबर असे ते आठजण अर्जुनाला भिडतात. ते आठ जण त्याच्या बाणांचा भडिमार करत असतात. त्या आठ जणांच्या रथाचे घोडे निरनिराळ्या देशांतील होते. कांहीं पहाडी होते तर कांही नदीकाठचे होते व कांहीं सिंध प्रांतातील होते. तुमचे कित्येक प्रामाणिक योद्धे दुर्योधनाला वाचवण्यासाठी अर्जुनाभोवती गराडा घालतात. ते मोठ्या मोठ्याने शंखध्वनी करतात. त्याचा अर्थ ते अर्जुनाला युद्धाचे आव्हान देतात. त्या नादांने सगळ्या दिशा दुमदुमून निघतात. ते पाहून प्रति आव्हान म्हणून धनंजय व वासुदेव त्यांचे शंख वाजवतात. धनंजय देवदत्त व कृष्ण पांचजन्य वाजवतो. त्याचा फार मोठा आवाज होतो व कित्येकांच्या अंगावर त्यामुळे शहारे उठतात. ज्या आवाजाने भित्रे घाबरतात व शूरवीर लढण्याच्या मनस्थितीत जातात त्यांना ते आव्हान आवडते. त्याशिवाय झांजा व ढोलकी, मृदुंग वाजवली जात असतात त्या युद्धाचे पार्श्वसंगीत ते होतेच. त्यात भर म्हणून विविध देशांतून आलेल राजे व त्यांचे सैनिक त्यांची वैशिष्टपूर्ण वाद्ये वाजवून त्यात भर घालतात. एकंदर वातावरण युद्धाचे असल्याचे जाणवते. तुझे कुरु सैन्य त्यांच्या हत्ती, घोड, रथ व पाईक अशा सगळ्या दलांनी अर्जुनावर चाल करण्याच्या अवस्थेत असतात. दुर्योधन त्याच्या आठ सेनानींसह जयद्रथाच्या संरक्षणार्थ अर्जुनाचा परामर्श करण्यासाठी तयार होतात. अश्वत्थामा प्रथम वासुदेवावरच हल्ला करतो. सत्तर बाण मारतो. अर्जुन वेळ न घालवता अश्वत्थामाच्या ध्वजाच्या दांड्यावर व घोड्यांवर तीन लांब पल्ल्याचे बाण मारतो असे कीं, ते खाली कोसळतात. अश्वत्थामाला शंभर बाण मारतो. त्यानंतर पार्थ कर्णावर बाणांचा मारा करतो.

वृषसेनावर तीन बाण मारतो. अर्जुन सल्याचा बावटा फाडून टाकतो. त्याचे धनुष्य तोडून टाकतो. सल्य दुसरे धनुष्य घेतो व तीन धारदार बाण पार्थावर मारतो. ते अर्जुनाला लागतात. भुरिश्रव पार्थाला तीन बाण मारतो. कर्ण दोन मारतो, वृषसेन सात मारतो. जयद्रथ अर्जुनाला सत्तर व नंतर तीन बाण मारतो. कृप दहा मारतो. सल्य फाल्गुनीला दहा बाण मारतो. अश्वत्थामा साठ मारतो. त्यानंतर आणखीन पांच मारतो. कृष्णाला वीस बाण मारतो. अर्जुन त्या आठांना चपळाईने बारा बाण प्रत्येकी मारतो. ते फारच झपाट्याने तो करतो. त्यानंतर कर्णाला बारा व त्याच्या मुलाला तीन मारतो. पार्थ सल्याचा तिरकमटा मोडून टाकतो. सोमदत्ताच्या मुलाला तीन मारतो. सल्याला पुन्हा तीन मारतो. कृपांना पंचवीस मारतो. जयद्रथाला शंभर मारतो. पार्थ अश्वत्थाम्याला सत्तर बाण मारतो. भुरिश्रव कृष्णाच्या हातातील चाबूक उडवतो. अर्जुनाला तेवीस बाण मारतो. धनंजय त्या शत्रूंच्या गटावर शेकडो बाण मारतो व त्याना बेजार करतो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे एक संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे दोन

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, "अरे संजया, मला सांग सविस्तरपणे त्या आठ योद्ध्यांचे व अर्जुनाचे झेंडे कसे दिसत होते.

संजय सांगतो, त्याची माहिती सांगतो तर ती नीटपणे ऐका. त्यांचे आकार व नांवे मी सांगणार आहे. त्या सगळ्या योद्ध्यांचे झेंडे फार सुंदर होते व त्यांना वेगळे तेज होते. ते बहुतेक सोन्याच्या जरीने बनवलेले असावेत. त्या झेंड्यांच्या बाजूने आणखीन लहान बावटे शोभेसाठी लावलेले होते. त्यामुळें त्यांच्या सौंदर्यात भर पडत होती. त्या बावट्यांचे रंग विविध होते. वारा आला किं ते फडपडत, ते छान दिसत होते. अर्जुनाचा झेंडा त्याच्यावर कपीची मुद्रा होती. ती पहाणार्याला भिववत होती. त्या एका झेंड्याची भिती तुझ्या सैन्याला जास्त होती कारण त्यातून दैवी विलक्षण दिसणारे प्राणी अधून मधून बाहेर येत होते. अश्वत्थामाच्या झेंड्यावर उगवता सूर्य दाखवला होता. त्याला सोन्याचे जरीकाम केलेले होते. त्यामुळे तुझ्या सैनिकांना प्रोत्साहन मिळत होते. अदिरथाच्या मुलाचा, कर्णाचा झेंडा हत्तीचे चित्र दाखवत होता. तो सुद्धा सोन्याच्या जरीने सुशोभित केलला होता, त्यावर माळा घातलेल्या होत्या. वारा आला की तो हत्ती रथावर नाचत आहे असें वाटत असे. द्रोण त्यांच्या झेंड्यावर यज्ञकुडाचे चित्र होते. पांडवांचे दुसरे शिक्षक कृपाचार्य त्यांच्या झेंड्यावर वृषभ दाखवला होता. वृषसेनाच्या झेड्यावर मोराचे चित्र होते. त्याच्या जरीकामात रत्न व इतर मौल्यवान जवाहिर गुंतलेले होते. त्या झेंड्यावरील मोराची अशी मुद्रा होती, जणूकाय तो आता ओरडणार आहे. त्याचा झेंडा व त्याचा रथ पाहिला कीं, देवांच्या सरसेनापती स्कंधची आठवण येते. त्याच्या झेंड्यावर सुद्धा मोर व नांगराचा फाळा असें होते. सोन्या चांदीच्या जरतारीमुळें ते सूर्याच्या प्रकाशात विशेष तेजस्वी दिसत होते. सल्याच्या झेंड्यावर अन्नपूर्णा देवता दाखवलेली होती. सिंधच्या राजाच्या झेंड्यावर चांदीच्या जरीने काढलेले रानडुक्कराचे चित्र होते. त्याला सोन्याचा हार घातलेला होता. असुरांच्या व देवांच्या युद्धात तसे चिन्ह असुरांनी वापरलेले होते. सोमदत्ताच्या मुलाच्या झेंड्यावर यज्ञवेदी दाखवलेली

होती. त्यावरील जरी कामामुळे ती सूर्याच्या प्रकाशात फार चमकत होती. ती वेदी सोन्याची दाखवलेली होती. जशी राजसूय यज्ञात असते. सालच्या झेंड्यावर चांदीचा हत्ती दाखवला होता. त्याच्या दोन बाजूना मोर होते. मोर सोन्याचे होते. तुमच्या सैन्याचा झेंडा एक शुभ्र हत्ती दाखवत होता. जसा ऐरावत असावा. दुर्योधनाच्या झेंड्यावर रत्नजडीत हत्तीचे चित्र होते. त्याच्या सुशोभित रथाला ते शोभत होते. त्या रथात तुमचा मुलगा तेजस्वी दिसत होता. ते झेंडे त्या रणभूमीत दिमाखाने फडकत होते. अर्जुनाचा झेंडा ज्यावर कपी आहे, त्या बरोबर अर्जुन तेजस्वी दिसत होता. जसे हिमालयातील शिखर असावे.

त्या लढाईत पुढे काय झाले ते सांगतो. तुमच्या बाजूचे योद्धे अर्जुनाला विरोध करण्यासाठी त्यांच्या आयुधानी सज्ज, असे पार्थाला अडवत होते. अहो तुमच्या दुष्टपणामुळे अनेक चांगले योद्धे नाहक मारले जात होते. पार्थ त्याच्या गांडीवाने त्यांना यमाकडे पाठवत होता. तुमच्या चुकीच्या धोरणामुळे तुमचेच किती मुलगे आता पर्यंत मारले गेले तेंच पहा. त्याशिवाय असंख्य हत्ती, घोडे मारले गेले त्याची गणती नाही. त्यांचे युद्ध सुरू झाले. कुंतीचा मुलगा कृष्णाच्या सारथ्यामुळे तेथे कमाल करत होता. तुझ्या सगळ्या एकत्र आलेल्या योद्ध्यांना तो एकटा पुरून उरत होता. हातात गांडीव घेतलेला अर्जुन फारच सुंदर दिसत होता. जयद्रथाचा वध करण्यासाठी त्याला तुझ्या त्या आठ योद्ध्यांचा पराभव करावा लागणार होता. तो हजारे बाण मारत होता. त्याच्या बाणांमुळे तुमचे योद्धे दिसत नव्हते फक्त बाणांचा झोत दिसत होता. योद्धे मोठ्याने ओरडून एकमेकांना साथ देत होते. "मारा, पकडा, हाणा", असे सारखे ऐकू येत होते.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे दोन संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे तीन

धृतराष्ट्र विचारतात, "पार्थाला जयद्रथ दिसल्यानंतर इतर पांचाल काय करतात? ते अश्वत्थामावर हल्ला करतात कां"?

संजय बोलतो, त्या दुपारी जे युद्ध पांचाल व कुरुंमध्ये झाले त्यात द्रोण त्याचे मुख्य लक्ष्य ठरले होते. नेहमी प्रमाणे दोनही बाजूंनी बाणांचा बर्षाव चालू होता. ते एक भीषण युद्ध होते. प्राचीन काळचे देव आणि असुरांच्या युद्धाची आठवण आणणारे होते. सगळे पांचाल व पांडव द्रोणांच्या रथा मागे लागलेले होते. ते त्यांची व्युहरचना तोडण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करत होते. द्रोणांना पकडणे हा एकच उद्देश त्यांचा होता. कौकेय योद्धा बृहत्क्षत्र सतत बाणांचा वर्षाव करत द्रोणांच्या जवळ जात असतो. त्याच वेळी तुमचा क्षराधुर्ती बृहत्क्षत्रीवर चाल करून जातो. ते पाहून छेड्डींचा धृष्टकेतू क्षराधुर्तीकडे जातो त्याला अडवण्यासाठी. जसे महेंद्र असुरांच्या संवरावर गेले होते. ते पाहून तुमचा विरधवन त्याच्यावर चाल करून जातो. राजा युधिष्ठीर त्यांच्या पलटणीचे नेतृत्व करत विजयासाठी लढत होता. त्याला द्रोण विरोध करत होते. तुमचा मुलगा विकर्ण नकूलावर चाल करतो. तुमचा दुर्मुख सहदेवाला अडवण्याचा प्रयत्न करत असतो. तुमचा शूरवीर व्याघ्रदत्त सत्यकीला अडवत होता. त्याच्या तीक्ष्ण बाणावे सत्यकीला भरपूर जखमा झाल्या होत्या तरी तो लढत होता. त्याच्या सहनशक्तीची कमाल होती. सोमदत्ताचा मुलगा एकटा द्रौपदीच्या पांच मुलांना आवरण्याचा प्रयत्न करत होता. ऋष्यषृंगाचा मुलगा अलमवुष भिमसेनाला अडवत होता. ते युद्ध मनुष्य व राक्षस असें होते. त्यावेळी आकाशातील प्रेक्षकांना राम रावणाचे युद्ध आठवले. युधिष्ठीर द्रोणांना नव्वद बाण मारतो. द्रोण त्याला प्रतिसाद देतात त्याच्या छातीत पांच बाण मारून. त्यानंतर द्रोण त्याचे घोडे जखमी करतो. त्याचे धनुष्य तोडतो. युधिष्ठीराकडे धनुष्य नाही हे समजल्यावर द्रोण त्याला कैद करण्यासाठी झपाट्याने त्याच्या कडे जाऊ लागतात. ते त्याच्यावर असंख्य बाण मारतात इतके कीं तो दिसेनासा होतो. त्यांना वाटते कीं तो पांडव मेला असावा. कोणाला वाटते कीं, तो त्या गदारोळात निसटला

असावा. पांडवांचे सैनिक ओरडू लागतात कीं, त्यांचा राजा मेला आहे. ते हळहळ व्यक्त करतात. ब्राह्मणांने त्याला मारले असे ते बोलत असतात. ते समजतात द्रोणांने एक आणखीन चांगले कार्य केले त्या युद्धाच्या दरम्यान. परंतु ते तसे नव्हते. युधिष्ठीर आणखीन धनुष्य मिळवतात व द्रोणांवर ते गाफिल असतांना हल्ला करून त्यांना बाद करतात. ते सगळे चमत्कारा सारखे होत होते. रागावलेला युधिष्ठीर एक जबरदस्त शर द्रोणावर फेकतो ज्याने एकादा डोंगर कोसळेल. त्यावेळी तो ज्या प्रकारे ओरडतो सगळे प्राणी घाबरून जातात. द्रोणावर तो सापासारखा दिसणारा शर फेकला जातो. ते पाहून द्रोण ब्रह्म अस्त्र सोडतात. त्यामुळे तो शर भस्म होतो. त्यानंतर ते ब्रह्म अस्त्र युधिष्ठीराच्या गाडीकडे जाऊ लागते. ते पाहून युधिष्ठीर त्या अस्त्राला गोंधळात टाकतो असें कीं, ते पुन्हा द्रोणाकडे जाऊ लागते. त्यानंतर युधिष्ठीर द्रोणांवर पांच तीक्ष्ण बाण मारतो. त्यामुळें त्यांचे धनुष्य मोडते. ते मोडलेले धनुष्य गदेसारखे युधिष्ठीरावर फेकून मारतो. ते मोडलेले धनुष्य गदेप्रमाणे गिरक्या घेत युधिष्ठीराकडे वेगांने जात असते. युधिष्ठीर गदा घेतो. तो ती गदा त्या येणार्या धनुष्यावर फेकतो. त्या दोघांची टक्कर होते. त्या खाली कोसळतात. चिडलेले द्रोण युधिष्ठीरेचे घोडे जखमी करतात. त्यांचा झेंडा पाडतात. त्यानंतर तो आणखीन तीन बाणाने त्या पांडवाला जखमी करतो. युधिष्ठीर त्यांच्या घोडे नसलेल्या रथातून उतरतो व हात वर करून उभा रहातो. युधिष्ठीर हार मानतो ते द्रोणांना लक्षात येते. द्रोण त्याच्याकडे वेगांने जातात. जात असतांना ते त्याच्यावर बाणांचा वर्षाव करत असतात. ते पाहून पांडवांच्या सैन्यांकडून हाःहाःकार ऐकू येतो. ते बोलतात, राजाला द्रोण मारणार. तेवढ्यात सहदेव तेथे येतो व युधिष्ठीराला घेतो व ते तेथून निघून जातात. द्रोण त्या पांडवाला अटक करू शकत नाही.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे तीन संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे चार

संजय पुढे सांगत असतो. क्षेमधृती अंगावर चालून येणार्या वृहत्क्षेत्रला छातीत अनेक बाण मारतो. तो कैकेय राजपुत्र छातीत ते घेऊन त्याच्या विरोधकाला नव्वद बाण मारतो. क्षेमधृती संतापाच्चा भरात कैकेयाला पुनः बाण मारतो. त्याचे धनुष्य तोडले जाते. त्यानंतर तो इतरांवर बाणांचा वर्षाव करत असतो. बृहत्क्षत्र दुसरा तिरकमटा घेऊन हसत हसत क्षेमधृतीचे घोडे मारतो. सारथ्याला सुद्धा मारतो. त्यानंतर तो एका धारदार बाणांने क्षेमधृतीचे डोके उडवतो. त्याचा रत्नजडीत मुकूट प्रथम खाली पडतो व त्यावर त्याचे मुंडके पडते. ते केल्यानंतर बृहत्क्षत्र खूप आनंदी दिसतो. त्यानंतर तो पार्थाला मदत करण्यासाठी जातो. मोठा योद्धा वीरधवन धृष्टकेतूला विरोध करत असतो. कारण तो द्रोणांना मारण्यासाठी जात असतो. त्यांच्यामध्ये द्वंद्व सुरू होते. ते एकमेकांवर असंख्य तीर फेकत असतात. जसे दोन माजलेले हत्ती झुंजावेत तसे ते द्वंद्व होते. ते द्वंद्व फारच भीषण होते. त्यांच्या धारदार बाणांने आजूबाजूचे कित्येक सैनिक व जनावरं मारली जातात. आकाशातून ते पहाणारे सिद्ध, चरण व साध्य सांगतात कीं, ते पाहून डोळ्याचे पारणे फिटले होते इतकं ते प्रेक्षणीय होते. धृष्टकेतूचा तिरकमटा तुटतो. तो छेड्डीचा नायक दुसरे घेतो. ते द्वंद्व तसेंच पुढे चालू रहाते. तो एक भयंकर शक्तीमान शर वीरधवनावर फेकतो. त्याच्या आघाताने वीरधवन खाली कोसळतो. ते झाल्यामुळे त्रिगर्ताचे सैन्य माघार घेऊ लागतो. कारण त्यांचा नायक मेला कीं ते सैन्य युद्धातून माघार घेणे हा एक नियम होता. माघार घेणार्या सैन्याला अभय असते. माघार घेणारे सैन्य शुभ्र झेंडा उभारून रणभूमीतून परत जात असें. अशारितीने कौरवांच्या सैन्याची संख्या कित्येक अक्षौहिणीने कमी झालेली होती. पांडवांचे सैन्यसुद्धा त्याच कारणामुळें कमी होत होते. तो सोळावा दिवस होता. त्याच वेळी तुमचा मुलगा दुर्मुख सहदेवावर बाणांचा वर्षाव करत होता. ते दोघे जोराजोरांने ओरडून लढत होते. सहदेव त्याला एक नेमक्या जागी बाण मारतो. दुर्मुख मात्र त्वेषाने लढत होता व सहदेव शांतपणे त्याला तोंड देत होता. सहदेव त्याला आणखीन नऊ बाण मारतो. त्यानंतर तो दुर्मुखाचे

धनुष्य मोडून टाकतो. त्यानंतर तो त्याचे घोडे मारतो. त्यानंतर तो एका धारदार बाणांने दुर्मुखाच्या सारथ्याचे शीर उडवतो. त्यानंतर तो पुन्हा तुमच्या मुलाचे धनुष्य तोडतो. तुमच्या मुलावर त्याचे बाण पडत असतात. त्यावेळी दुर्मुख रथातून उतरतो आणि मित्राच्या रथात चढतो. तुमचा मुलगा मारला गेला सोळाव्या दिवशी. त्यामुळे संतापलेला सहदेव निरामित्रावर हल्ला करतो. तो त्रिगर्ताचा युवराज होता. ते रथातून खाली कोसळतो. ते पाहून त्रिगर्ताचे सैन्य मनोधैर्य खच्ची झाल्यासारखे होते. कांहीं माघार घेण्याच्या गोष्टी करू लागतात. कारण युद्धात कौरव जिंकण्याची शक्यता दिवसें दिवस कमी होत होती. सहदेव मोठ्याने जिंकल्याची घोषणा करतो. त्याचवेळी कौरव हळहळ व्यक्त करत होते. ते होत असतांना नकूल तुमच्या विकर्णाचा पराभव करतो. त्याचे सगळ्यांना नवल वाटते. दुसरीकडे व्याघ्रदत्त सत्यकीला जेरीस आणत होता. इतके बाण त्याने सत्यकीवर फेकलेले होते कीं, तो त्यामुळे दिसत नव्हता. सत्याकी मेला की अजून जीवंत आहे ते समजत नव्हते. मगधाच्या युवराजाचा पराजय केला आहे असें समजत तो युयुधनाकडे वळतो. त्या युद्धात बाणांबरोबर इतर आयुधं सुद्धा वापरली जात होती. त्यामध्ये, भाले, गदा, काटेरी गदा, सोटे वापरले गेले होते. त्यातून सत्यकी निसटतो. त्याच्या मुखावर समाधान दिसत होते. मगधांचा जवळ जवळ सर्वनाश झाला होता. जे उरलेले होते ते पळून जात असतात. पळून जाणार्यांना अभय असें, त्यामुळे त्यांना कोणी मारत नसे. कौरवांच्या सैन्यावर युयुधनाचे विषारी बाण पडत होते. त्याने कित्येक मरत होते. युयुधन समाधानी दिसत होता. थोड्या वेळासाठी तो धनुष्य बाजूला ठेवून विश्रांती घेत आहे असे दिसते, त्याच्या मुखावर हास्य चमकत होते. त्याचा जोर असा होता कीं, कोणीही त्याच्या वाटेला जात नव्हते. ते पाहून द्रोण संतापतात. ते त्याच्यावर जातात.
जयद्रथ वध पर्व भाग एकशे चार संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे पांच

संजय पुढे सांगतो, सोमदत्ताचा ख्यातनाम मुलगा द्रौपदीच्या पांचही मुलांना बाणा मारतो. त्यामुळे ते जखमी होतात. ते बेहोष होतात. त्यांचा गोंधळ उडालेला असतो. त्यानंतर सतनिक नकूलाचा मुलगा, सोमदत्ताच्या मुलाला दोन बाण मारून भोसकतो. तो त्याने खूष होऊन जोरांने ओरडतो. ते पाहून त्याच्या इतर सावत्र भावांना हुरूप येतो. त्यांचे मनोधैर्य सुधारते, ते सोमदत्ताच्या मुलावर बाणांने हल्ला करतात. सोमदत्ताचा मुलगा पुन्हा त्याना ते पांच विषारी बाण मारतो. प्रत्येक बाण त्यांच्या प्रत्येकाच्या छातीत घुसतो. त्यानंतर ते पांच भाऊ त्याला घेरतात व त्याच्यावर बाणांचा मारा करू लागतात. त्या जोरात अर्जुनाचा मुलगा सोमदत्ताचा मुलगा सौरादत्तीवर चालून जातो. त्याचे चार घोडे यमाकडे धाडतो. भिमाचा मुलगा सौरादत्तीचे धनुष्य मोडून टाकतो. प्रतिविंध्य युधिष्ठाराचा मुलगा, जोरांने ओरडत नंतर तो त्याचा ध्वजस्तंभाचा दांडा मोडून टाकतो. नकूलाचा मुलगा त्याचा रथ मोडन टाकतो. सहदेवाचा मुलगा पहातो की, सौरादत्ती पळून जात आहे, तो त्याचे मुंडके उडवतो एका बाणाने. ते कानात कुंडले असलेले शीर मातीत पडते . त्याचे डोळे उघडेच असतात व जीभ बाहेर असते. तो आता यमाच्या घरी गेलेला असतो. ते पाहून सोमदत्ताचे सैनिक रणभूमी सोडून जाण्याच्या तयारीला लागतात. राक्षस अलमवुष भिमाबरोबर लढत असतो मोठ्या त्वेषाने. जसे रावणाचा मुलगा इंद्रजित रामाच्या भावाशी, लक्ष्मणांशी लढत होता. ते राक्षस व मनुष्य असे द्वंद्व आकाशातील प्रेक्षकांना फार रोचक वाटत होते. ऋष्यश्रृंगाच्या त्या मुलाला तो नऊ बाण मारतो. ते जिव्हारी बसतात. त्यामुळें चिडलेला तो राक्षस भिमावर चालून जातो. भिमाला बाणांने तो जर्जर करतो. त्यानंतर भिमाला एका बाणाने तो अलमवुष बेहोष करतो. थोड्याच वेळांत भिम सावध होतो. त्याचे मोठे धनुष्य काढतो व त्याने अलमवुषाला जखमी करतो. त्याच्या सर्वांगाला जखमा करतो. तरीसुद्धा तो काळसर वर्णाचा राक्षस अजिबात बधलेला नसतो. त्याच्या सर्वांगातून रक्त येत असल्याने त्याचे शीर लाल झालेले असते. त्यावेळी त्याला त्याच्या भाईबंदाचा

(बकासूर) वध भिमाने केला ते आठवते. ते झाल्यामुळे तो भिमाला बोलतो, "जरा थांब, माझी ताकद तुला दाखवतो, तू आमच्या बकासुराला कपटाने मारले आहेस, त्याचा मला विसर पडला होता". असें बोलून तो राक्षस अदृष्य होतो. तशा स्थितीत तो भिमावर जोरांने बाणांचा वर्षाव करू लागतो. कोठून बाण येतात ते भिमाला समजत नाही. तो राक्षस कधी आकाशातून कधी पृथ्वीच्या उदरातून असें बाण मारत असतो. भिमाचा गोंधळ उडतो, कधी अजस्र आकार घेतो तर कधी सुक्ष्म होऊन अदृष्य बाण मारत रहातो. त्याच्या राक्षसी वाणीत तो वृकोदराला शिव्या देत असतो, ज्या भिमाला समजत नाहीत. त्याशिवाय आकाशातून कितीतरी मायावी शर, बाण, सोटे, तलवारी, दांडपट्टे भिमावर पडत असतात. प्रत्येक कांहीं इजा करत असतात. त्या विचित्र प्रकारच्या वर्षावामुळें पांडवांच्या सैन्याचे बरेच नुकसान होते. तेथे एक नदी वाहू लागते त्यात पाण्याबरोबर मेलेल्या प्राण्यांचे रक्त मिसळलेले असते. त्यात अनेक हत्ती घोडे अडकलेले असतात. त्या रक्त पाण्याच्या नदीत माणसांचे अवयव माशासारखे तरंगत होते. कांही ठिकाणी रथाचे भाग त्या पाण्याबरोबर सावकाशपणे पुढे सरकत होते. ते खाण्यासाठी नरमांस भक्षक राक्षसांच्या झुंडीच्या झुंडी त्यात बुचकळ्या मारत होत्या. ते मायावी दृष्य भीषण होते. त्या रक्तपाण्याच्या नदीतून अनेक पांचाल, श्रींजय व पांडवांचे योद्धे तरंगत जातांना भिमाला दिसत होते. ते पाहून तो बेडर पांडवसुद्धा अस्वस्थ होतो. कौरवांना मात्र त्यामुळे फार संतोष झालेला दिसतो. तुझी रणवाद्ये वाजवणारे जोरा जोरांने त्यांची भीषण वाद्ये वाजवू लागतात जे पांडवाना अजिबात आवडत नाही. भिम त्यामुळें फार संतापतो व एक अस्त्र काढतो ज्याला त्वश्त्री म्हणतात व त्यातून चौफेर असंख्य बाण सोडतो. त्यामुळें तुमचे असंख्य योद्धे मारले जातात. त्याशिवाय अलमवुषाने उत्पन्न केलेले मायावी भासदृष्यसुद्धा गायब होते. भिमाच्या हल्ल्याने त्रस्त झालेला तो राक्षस नंतर द्रोणांच्या आश्रयाला जातो. अशारितीने राक्षसाचा पराभव केल्यानंतर मोठ्याने गर्जना करतो जी दाही दिशां दणाणून सोडते. पांडवांचे सैनिक वृकोदराचे कौतुक करू लागतात. जसे प्रह्लादाच्या पराजयानंतर इंद्राचे देवांनी केलेले होते.

जयद्रथ वध पर्व भाग एकसे पांचवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे सहावा

संजय पुढे सांगतो, भिमाला घाबरून पळून गेलेला अलमवुष नव्या दमाने इतरत्र लढण्यासाठी जातो. तेथे त्याला हिडींबाचा मुलगा घटोत्कच भेटतो. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. ते दोघे राक्षस फारच भयंकर होते. जसे प्राचीन काळी झालेले शक्र व संवराचे द्वंद्व किंवा राम व रावणाचे द्वंद्व. त्यांच्या लढण्यात त्यांचे भ्रमदृष्यांचे प्रमाण जास्त होते. बराच काळ ते लढत असतात परंतु, कोणी एक वरचढ होत नाही. त्यांच्या विविध भ्रमदृष्यांमुळें इतर भांबावून जात होते. त्यांच्या त्या विचित्र पद्धतीच्या लढण्यामुळे पांडवांना काळजी वाटू लागते. ते होत असतांना भिमसेन त्याच्या रथदलाच्या मदतीने अलमवुषाला गराडा घालतो. जसे अरण्यात जंगली हत्ती पकडण्यासाठी करतात तसा पिंजरा ते तयार करतात त्याला पकडण्यासाठी. त्यातून तो अलमवुष तेज बाण मारू लागतो. भिमाला पांच, युधिष्ठीराला तीन, सहदेवाला सात, नकूलाला तीन, द्रौपदीच्या मुलांना प्रत्येकी पांच असें बाण तो मारतो व मोठ्याने जिंकल्याप्रमाणे ओरडतो. भिम त्याला सात बाण मारतो, सहदेव पांच मारतो, युधिष्ठीर शेकडो बाण मारतो, नकूल पुन्हा तीन बाण मारतो, घटोत्कचा त्याला शेकडो बाण मारतो. अलमवुष त्याला पुन्हा सत्तर बाण मारतो व मोठ्याने आरोळी ठोकतो. त्यानंतर घटोत्कच इतक्या मोठ्याने ओरडतो कीं, सारी पृथ्वी हादरते. अलमवुषाला खूप बाण लागलेले असतात त्यामुळे त्याची ताकद कमी झालेली असते. हिडींबाचा मुलगा त्याला आणखीन जास्त बाण मारत असतो. तरी तो घटोत्कचावर अगणित बाण फेकतो. त्यामुळे चिडलेला राक्षस व पांडव पुन्हा त्या राक्षसावर बाणांचा मारा करत असतात. अशा वेढ्यामुळे तो राक्षस पुत्र अलमवुष समजत नाही काय करावे. ती त्याची मनस्थिती भिमाच्या मुलाला समजते व तो ठरवतो कीं, हींच वेळ आहे अलमवुषाचा वध करण्याची. मोठ्या जोरांने तो त्या राक्षस पुत्रावर जातो. त्याला पकडतो व गरूड जसा सापाला पकडतो तसे तो त्याला पकडतो व उंच आकाशात फेकतो. तो जमिनीवर आदळतो व त्याचा वध होतो. निपचितपणे पडलेला तो एकाद्या कोळशाच्या

ढिगार्यासारखा दिसत असतो. त्याला घटोत्कचाने मारलेले असते. त्याचे सगळे अवयव तुटलेले असतात. ते पाहून तुझे सैन्य घाबरून जाते. त्याचा वध करण्यात पांडवांना यश आलेले होते. त्याचा त्याना आनंद होतो. ते आनंदाने उड्या मारून व ललकार्या देऊन तो व्यक्त करत असतात. त्या कोळशाच्या ठिगार्यासारखा दिसणारा अलमवुष ते पहात असतात, पुन्हा पुन्हा व घटोत्कचाचे अभिनंदन करत असतात. घटोत्कचालासुद्धा मोठा आनंद झालेला असतो. त्या युद्धातील तो एक महत्वाचा विजय होता. पांडवांचे शंख नाद करून तो जाहिर करतात. रणवाद्ये वाजवली जातात. तुमचे लोक मात्र दुःख व्यक्त करत असतात. तेथे शांतता असते. वसवाने वलीला मारले तेव्हां जशी वाद्ये देव वाजवत होते तशी आता पांडव वाजवत होते. कौरवांना ते आव्हान वाटले व तेसुद्धा प्रतिआव्हानाचे वाजवू लागतात.

जयद्रथ वध पर्व भाग अकशे सहावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे सातवा

धृतराष्ट्र बोलतात, मला सांग संजया, युयुधन द्रोणांवर चाल करून गेला, त्याबद्दल मला भारी कुतूहल वाटत आहे. त्याचे पुढे काय होते ते मला ऐकावयाचे आहे. पांडवांचा नेता युयुधन व द्रोण ह्यांच्यात होणार्या लढाईत कौरवांचे सैन्य मारले जात होते. द्रोणांना स्वतः त्याची दखल घ्यावा लागली ह्यातच युयुधनाची महती सिद्ध होते. ते सगळे मला कौतुकाचे वाटते.

द्रोण युयुधनाला धारदार बाणाने जखमी करतात. त्याचे रक्त जमिनीवर सांडते. त्यावेळी अजानुबाहू सत्यकी द्रोणांना जखमी करतो. त्यांच्यात ते एकमेकांना बाण मारणे चालूच असते. द्रोणांच्या बाणांने जखमी झालेला सत्यकी समजत नाही कीं, त्याने आता काय करावे? सत्यकीची ती अवस्था पाहून युयुधनाला वाईट वाटते. ते पाहून कीं सत्यकी द्रोणांच्या तावडीत अडकला आहे, तुझे मुलगे आनंद दाखवतात. मोठ्या मोठ्याने ओरडून ते द्रोणांना उत्तेजना देत रहातात. तो गदारोळ ऐकून व सत्यकी द्रोणांच्या तावडीत सापडला आहे ते समजल्यावर युधिष्ठीर त्यांच्या योद्ध्याना आवाहन करतात कीं, ते जाऊन द्रोणांचे लक्ष विचलित करतील व त्या योगे त्याची सुटका करतील. ते धृष्टद्युम्नाला समजते. ते त्याला आज्ञा करतात कीं, तो त्वरित द्रोणांवर चाल करून जाईल. सत्यकीला त्या ब्राह्मणाच्या तावडीतून सोडवले पाहिजे. आत्ता तेथे जा व द्रोणांना त्यांच्यापासून दूर करा. असे राजा युधिष्ठीर बोलतो. भिमाला त्यांचे नेतृत्व करण्यास सांगतो. ती आज्ञा झाल्यावर पांडवांच्या अनेक तुकड्या द्रोणावर चाल करण्यासाठी भिमाच्या नेतृत्वात जाऊ लागतात. श्रींजय व पांडवांचे सैन्य मोठा आवाज करते. ते चहुबाजूने द्रोणांवर बाणांचा वर्षाव करू लागतात. परंतु, द्रोणांना त्याचे भय वाटत नाही. ते त्याकडे गमतीने पहात असतात. त्याना त्याचा मुलगा अश्वत्थामा मदत करण्यासाठी पुढे होतो. द्रोण मध्यान्हीच्या सूर्यासारखा चमकत होता. द्रोण त्या हल्ल्याचे बाणांने स्वागत करतात. त्या द्रोणांच्या प्रतिकारापुढे पांडवांचे व श्रींजयांने कांहीं चालत नाही. भारद्वाजाच्या मुलाचे बाण सूर्य किरणांप्रमाणे चमकत जात होते.

त्यात अनेक चांगले योद्धे मारले गेले. त्यात महारथी जास्त होते. त्यात धृष्टद्युम्नाचे जास्त होते. त्या युद्धात द्रोणांने केकयांचे मोठे योद्धे मारले होते. त्यानंतर तो ब्राह्मण थोडावेळ शांतपणे उभा होता. पहात होता त्यानंतर काय करावे त्याचा अंदाज घेत होता. तेथे असंख्य योद्धे मरण यातनाने विव्हळत पडलेले होते त्यात मत्स्य, केकया, पांचाल व पांडवांचे योद्धे होते. ते पाहून देव, गंधर्व, पितर आकाशातून बोलतात, पहा ते पांडवांचे बाजूचे योद्धे कसे धावत आहेत जीव घेऊन. ते होत असतांना द्रोणांना कोणीही विरोध करत नव्हते. त्याना कोणी एकसुद्धा बाण मारलेला नव्हता. लांबून युधिष्ठीर ते हत्याकांड असहायपणे पहात असतांना त्याला पांचजन्याचा आवाज ऐकू येतो. वासुदेवाने ते वाजवले होते. त्यावेळी कौरव जयद्रथाला वाचवण्यासाठी पराकाष्ठा करत होते. त्या आवाजामुळे गांडीवांचा टणत्कार ऐकू येत नव्हता. त्याला काळजी वाटत असते कीं, पार्थाचे काय होत आहे. सिनीच्या नातवाला तो बोलतो, "अरे मुला, मित्राला मदत करण्याचा धर्म निभावण्याची वेळ आली आहे. मला वाटते, तुझ्या सारखा आमचा हितचिंतक दुसरा नाही. तू नेहमी आज्ञाधारक व प्रामाणिक असतोस. जसे केशव आमचा त्राता आहे तसा तू आहेस. तुझी हिम्मत कृष्णा सारखीच आहे. म्हणून मी तुझ्यावर एक जबाबदारी सोपवू इच्छितो. अर्जुन तुझ्या भावासारखाच आहे, मित्रसुद्धा आहे व शिक्षकसुद्धा आहे. त्याला तू मदत करावी असें मला वाटते. तू सत्यावर विश्वास असलेला, मित्रांचा कैवारी म्हणून प्रसिद्ध आहेस. सत्यासाठी जीवाची बाजी लावणारा व ब्राह्मणांला पृथ्वीचे दान करणारा सारखेच पुण्यवान असतात. अनेक राजांनी ब्राह्मणांना दानं केली आहेत व पुण्य मिळवलेले आहे तसे तू अर्जुनाला मदत करून पुण्य मिळवावे असे मी तुला सांगत आहे, हात जोडून विनंती करत आहे. तेथे कृष्ण आहे. तो त्याच्या मित्रांसाठी कांहींही करण्यास तयार असतो. तू तसा दुसरा आहेस. सामान्य योद्धे ते करणार नाहीत. तुझ्या हिम्मतीच्या गोष्टी धनंजय मला नेहमी सांगत असतो. ते ऐकावयाला मला आवडत असें. तो नेहमी सांगतो, सत्यकी केवळ हुशार योद्धा आहे असे नाही तर तो एक बुद्धीमान क्षत्रियसुद्धा आहे. सत्यकी महारथी आहे व त्याचा चांगला शिष्यसुद्धा. तो माझा आवडता व मी त्याचा आवडता असे आमचे नाते आहे. युयुधन कौरवांचा नाश करणार आहे. अर्जुन पुढे सांगतो मला कीं, तेथे

कित्येक योद्धे आहेत जसे भार्गव, अनिरूद्ध, गद, शरण, संम्व, प्रद्युम्न पण मला सत्यकीवर जास्त भरवसा आहे. हे मला अर्जुन द्वैतवनात सांगत होता तुझ्याबद्दल हे विशेष. तू त्या भरवशाचे महत्व लक्षात घेऊन आता अर्जुनाला मदत करावी असें मला वाटते. ह्यावेळी तुला त्या अर्जुनाच्या विश्वासाची शाश्वती द्यावयाची आहे. आम्ही सगळ्या पांडवांचा विश्वास तुझ्यावर आहे तो तू खरा करणार आहेस. उपप्लवात मला तुझी आठवण येत होती. द्रोणांनी दिलेले चिलखत घालून दुर्योधन अर्जुनाच्या मागे गेला आहे. म्हणून तू तेथे जाऊन काय परिस्थिती आहे ते पहावे असें मला वाटते. भिम व इतर सगळे द्रोणाला आवरण्याचे काम करतील परंतु, कौरवांचे सैन्य पळत आहे सगळे धृतराष्ट्राचे सव्यसाचीला घाबरतात. ज्या प्रमाणात हवेत धुळ उडत आहे ते पाहिल कीं, वाटते अर्जुन मोठ्या संकटात आहे, अर्जुनाला सिंध व सौवीराच्या योद्ध्यानी घेरले असेल, त्यांचा नाश करण्याशिवाय तो जयद्रथा पर्यंत पोहोचणार नाही. तेवढ्यात दिवस संपला तर अर्जुनाची प्रतिज्ञा अपुरी राहिल. अशावेळी जिश्नुला मदत करणारा कोणी मजबूत योद्धा असला पाहिजे असे मला वाटते. कौरवांची सगळी तयारी अशी आहे कीं, अर्जुन त्याची प्रतिज्ञा पुरी करणार नाही. जर ते झाले तर त्याला अग्नीकाष्ठ भक्षण करावी लागतील व ते आपल्याला चालणार नाही. जयद्रथ व अर्जुन ह्यांच्यामध्ये मोठे सैन्य दुर्योधनाने ठेवलेले आहे. त्यातून जयद्रथापर्यंत पोहोचणे सोपे नाही. अर्जुनाच्या पुढे जयद्रथाचे सैन्य आहे व मागे द्रोणांची पलटण आहे. त्यात तो एकटा आहे. त्याला एकटे सोडणे आपल्याला शोभत नाही, त्याची प्रतिज्ञा आपली प्रतिज्ञा आहे हे तुझ्या लक्षात आले असेलच जे मला सांगावयाचे आहे. अर्जुनाचे जगणे पांडवांसाठी वृश्नींसाठी, पांचालांसाठी व श्रींजयांसाठी फार मोलाचे आहे. तू अशावेळी त्याला तुझ्या पद्धतीने मदत करावी असे मला वाटते. तो सकाळपासून जयद्रथाला शोधत आहे. पण अजून तो त्याला पकडू शकला नाही, आणि आता दुपार उलटून गेली आहे. सूर्य पश्चिमेला सरकला आहे. तो त्याची प्रतिज्ञा पुर्ण करणार कीं नाही ते मला समजत नाही. कौरवांचे सैन्य अफाट आहे केवळ त्यामुळे ते हटवणे सोपे नाही त्यात योद्ध्याची हिम्मत तेवढेच पुरेसे नसते. सागराच्या लाटांप्रमाणे ते सैन्य पुन्हा पुन्हा त्याला अडवणार आहे, त्यात वेळ जात आहे. वेळ कोणासाठी थांबत नाही हे तू

चांगलेच जाणतोस. आजच्या युद्धाचे गणित माझे चुकणार अशी भिती मला वाटत आहे. द्रोण माझ्या फौजांना कापत आहे. ते सगळे योग्य प्रकारे हाताळणारा कोणी पाहिजे त्यासाठी मी तुला बोलावले आहे. तूझे काम अर्जुनाला अशाप्रकारे मदत करावी कीं, तो त्या कौरवांच्या अफाट सैन्यातून जयदर्थापर्यंत पोहोचेल. त्याच्याबरोबर केशव आहे, जो जगनियंता आहे. तरी मला भिती वाटते. तरी अर्जुनाच्या हिश्श्याला फार मोठे संकट आहे हे निश्चित. ह्या युद्धात जर तो गेला तर मला कांहीं सुचत नाही. वृश्नींमध्ये दोन अतिरथी आहेत. एक प्रद्युम्न व दुसरा तू. शस्त्रविद्येत तू नारायणासारखा आहेस. ताकदीमध्ये तू शंकराशना (बळराम) सारखा आहेस. पराक्रमात तू अर्जुनासारखा आहेस. तुला मनात आणलेस तर करता येणार नाही असें कांही. त्याला मदत करण्यास सज्ज हो व आम्ही सगळ्यांचे आशिर्वाद घे. अर्जुनाचा आदर्श उराशी बाळगून तू त्याला मदत करावी असे मला वाटते. कृष्ण सगळ्यांचा श्रेष्ठ आहे. म्हणून मी जे बोलतो ते अर्जुनाची आज्ञा आहे असं समजून तू जा त्याला मदत करण्यासाठी. धनंजयाला शोध व त्याच्या बरोबर रहा असे माझे सांगणे आहे. कौरवांच्या सैन्यात फूट पाडण्याचे काम तुला करावयाचे आहे. तेथे तू तुझी कमाल करून दाखव.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे सातवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे आठवा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराचे ते प्रेमाचे आवाहन ऐकल्यावर त्याला आनंद होतो. तो त्याला आश्वासन देतो, तो बोलतो, "आपले सगळे मी ऐकले आहे. फाल्गुनीसाठी आपले जे प्रेम आहे ते मी समजलो. मी अशाप्रसंगी आपल्या शब्दाबाहेर नाही. आपण जी आज्ञा कराल ती मला मंजूर आहे. मी माझ्या शिक्षकासाठी जीव देण्यासाठी सुद्धा तयार आहे. मी आपल्या आज्ञेनुसार तिनही जगांशी लढावयाला तयार आहे. आता मी दुर्योधनाच्या सगळ्या सैन्याशी लढावयाला सज्ज आहे. आता मी धनंजयाकडे जातो व जोपर्यंत त्याने जयद्रथाला मारले नाही तोपर्यंत मी त्याला साथ देत राहीन, त्यानंतर मी आपल्यापुढे हजर होईन. परंतु, मला धनंजयाने जी आज्ञा दिली होती जयद्रथाकडे जाण्या आधी ती आपल्याला सांगतो. धनंजय मला सांगत होते कीं, मी आपल्या संरक्षणाचे काम केले पाहिजे. ते त्यांनी मला कृष्णाच्या व इतर साथीदारां समक्ष सांगितले आहे. तर त्या आज्ञेचे काय करावे? कारण आपल्याला द्रोणांकडून धोका संभवतो हे तितकेच खरे आहे. जर आपण प्रद्युम्नला आपला संरक्षक म्हणून नेमत असाल, तर मी तुमच्या आज्ञेने पार्थाकडे जाऊ शकतो". पुढे तो बोलतो, "आपण द्रोणांना ओळखता, त्यांचे दुर्योधनाला दिलेले वचन आपण आठवत असाल, तो वचनाचा पक्का आहे तेव्हां आपल्या संरक्षणाची निश्चित व्यवस्था झाल्या खेरीज मी पार्थाकडे जाऊ शकत नाही. प्रद्युम्न एक उत्तम योद्धा आहे, तो सुद्धा सहजासहजी थकत नाही. त्याची आपण नेमणूक करावी आपल्या संरक्षणासाठी म्हणजे मी पार्थाकडे जाईन. जयद्रथाचा वध झाल्यावर मी पुन्हा आपल्या सेवेसाठी उपस्थित होईन. जर तुम्हाला पकडण्यात द्रोणांना यश आले तर ते जास्त वाईट ठरणार आहे. कारण, जर आपल्याला ते कैदी करून घेऊन गेले तर आपल्याला पुनः वनवासात जावे लागेल. तसे झाले जर जयद्रथाचा वध कुचकामी ठरेल. युधिष्ठीर मुक्त असणे हे सर्वात जास्त महत्वाचे आहे असें माधवांनेसुद्धा सांगितले आहे. म्हणून युधिष्ठीराचे मुक्त असणे जयद्रथाच्या वधापेक्षा जास्त महत्वाचे आहे. मला वाटते रुक्मीचा मुलगा प्रद्युम्न द्रोणांना बरोबरीचा

आहे. तेव्हां त्याची प्रथम नेमणूक करा आपल्यासाठी मगच मी पार्थाला मदत करण्यासाठी जाऊ शकतो. द्रोणांचे कवच (चिलखत) अभेद्य आहे. त्याच्यासाठी इतर योद्धे लहान मुलासारखे आहेत. मी गेल्यावर तुम्हाला द्रोणांपासून कोण कसे संरक्षण देतो ते मला समजले पाहिजे कारण ती माझी जबाबदारी आहे. आपण जेवढे पार्थासाठी चिंता करता तेवढी चिंता करण्याचे खरेतर कारण मला दिसत नाही. आपले संरक्षण जास्त मोलाचे आहे. तेथे अर्जुनाबरोबर केशव आहे त्यासाठी आपली त्याच्या बद्दलची चिंता निरर्थक आहे. आपल्याला जास्त संरक्षणाची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. त्याच्याशी लढणारे योद्धे अगदी कर्ण धरून अर्जुन एकटा सांभाळू शकतो. तेथे मी नसलो तरी कांहीं बिघडत नाही. अर्जुन त्या सगळ्यांना पुरून उरेल असा आहे. आपले भय कीं, अर्जुनाला कांहीं धोका आहे माझ्यामते व्यर्थ आहे. उलटपक्षी आपल्याला माझी जास्त गरज आहे. माझ्या जाण्याने दुर्योधनाची खेळी जास्त सोपी होईल. तो तुम्हाला द्रोणांच्या मदतीने सहज कैदी करू शकेल. तसे झाले तर मी पार्थाला काय जाब देणार? दोघेही (द्रोण व अर्जुन) त्यांच्या प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी बांधलेले आहेत. हे सगळे लक्षात घेता, अहो महाराज, मी तेथे न जाणे व आपल्याला संरक्षण देत रहाणे जास्त शहाणपणाचे आहे म्हणून मी तेथे जाणार नाही". ते ऐकल्यावर युधिष्ठीर म्हणतो कीं, जर तसे तुला योग्य वाटत असेल तर ते खरे. तरी मला अर्जुनाची चिंता वाटत रहाणार आहे. मी माझे संरक्षण करण्याची पराकाष्ठा करणार आहे. माझ्या अंदाजाने तू अर्जुनाकडे जाणेंच जास्त श्रेयस्कर आहे. म्हणून तू माझ्या सांगण्याप्रमाणे तेथे जा. ते जास्त महत्वाचे आहे. भिमसेन माझे संरक्षण करू शकतो. त्याशिवाय द्रौपदीची मुलं आहेत, इतर योद्धे जसे प्रिशताचा धृष्टद्युम्न आहे. ते सगळे द्रोणाला अटकाव करण्यात समर्थ आहेत. त्याशिवाय घटोत्कच आहे, विराट, द्रुपद असें बरेच आम्ही एकत्र येथे आहोत. शिखंडी, धृष्टकेतू केकया बंधू, कुंतीभोज , नकूल, सहदेव असें आहेत मला संरक्षण देण्यासाठी ते असतांना द्रोणापासून मला धोका कमी संभवतो. तो प्रिशताचा धृष्टद्युम्न द्रोणांचा कर्दनकाळ माझ्या सोबतीला असेल. त्या सगळ्यांना हरवणे द्रोणाला जमणार नाही असे माझे मन सांगते. धृष्टद्युम्न अग्नीतून आला

आहे. त्याचा जन्मच मुळी द्रोणांचा नाश करण्यासाठी झालेला आहे. म्हणून तू जा पार्थाकडे म्हणजे माझ्या मनाला शांती लाभेल.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे आठवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे नववा

संजय पुढे सांगत, असतो, ते युधिष्ठीराचे आग्रही बोलणे ऐकल्यावर युयुधनाला काळजी वाटू लागते कीं, अर्जुन काय बोलेल. दुसर्या बाजूला त्याला वाटते कीं, जर तो युधिष्ठीराचे ऐकणार नाही तर त्याच्यावर भित्रेपणाचा आरोप लागू शकतो. लोक असे म्हणू नयेत कीं, मी पार्थाला संरक्षण देण्यास घाबरलो. त्याशिवाय युधिष्ठीराची आज्ञा पार्थाच्या आज्ञेपेक्षा जास्त मोठी ठरते, असा विचार करत सत्यकी युधिष्ठीराला बोलतो, "जर आपल्याला वाटत असेल कीं, ते तुमच्या संरक्षणासाठी पुरेसे आहेत तर मी आपल्या आज्ञेने पार्थाच्या संरक्षणार्थ जाण्यास तयार आहे. मी आपल्या आज्ञेचे पालन करण्यासाठी जात आहे पण माझ्या मनावर मोठा बोजा त्यामुळे नेहमी रहाणारत आहे. जर द्रोण आपल्याला कैदी करू शकला तर मी मला माफ करू शकणार नाही. आपले दोघे बंधू (कृष्ण व अर्जुन) आपल्याला जे योग्य वाटते तेंच करत आले आहेत तेव्हां मी सुद्धा तसे करणार आहे. मी अर्जुनाकडे जात आहे. अर्जुनाला कर्ण व कृपांना तोंड द्यावे सागणार आहे. ते येथून तीन योजने दूर आहेत. त्या ठिकाणातून तो जयद्रथाचा वध करणार आहे. तेथे मी जातो. वरिष्ठांच्या आज्ञेचे पालन करावे लागते. तेथे कौरवांचे योद्धे त्यांची शस्त्रं घेऊन सज्ज असतील त्याना जाऊन मी भिडणार आहे. तेथे अंजन जातीच्या हत्तींची मोठी पलटण लढण्यासाठी सज्ज असेल. त्यांच्या मानेवर त्यांचे म्लेच्छ सैनिक बसलेले असतील. ते हजारांने असतील. त्याशिवाय महारथी सगळे उच्च कुलीन योद्धे असतील. त्यांना रुक मराठा म्हणून ओळखले जाते. ते शस्त्रं व हात अशा दोनही प्रकारे लढत असतात. रुक मराठा तलवारीने व सोट्याने सुद्धा चांगले लढतात असे सगळे जाणतात. त्यांचे नेतृत्व कर्णाकडे असेल. जो दुःशासनाचा मित्र आहे. वासुदेवसुद्धा त्यांच्या क्षात्रतेजाचे कौतुक करतात. ते कर्णाचे दोस्त आहेत. ते सहसा थकत नाही. त्यांच्या अंगात अभेद्य कवच घातलेली असतील असे ते कौरवांचे योद्धे माझी तेथे वाट पहात असतील. तुम्हा कौरवांचा नाश करत मला जावे लागणार आहे. मग मी सव्यसाचीला मिळणार आहे. ते किराटांचे सातशे हत्ती पहा, ते

धनंजयाला दिले होते परंतु, तुमच्या (युधिष्ठीराच्या) चुकीमुळे ते आज आपल्या विरुद्ध उभे आहेत. कसे भाग्य उलटते ते पहा. ते आता कौरवांसाठी पांडवा विरुद्ध लढण्यासाठी उभे आहेत अहो भाग्य. ते किराट अग्नीतून उत्पन्न झाले आहेत असे म्हणतात. त्यांना एकदा सव्यसाचीने पराभूत केले आहे. आता मी सव्यसाची बरोबर त्यांच्याशी मुकाबला करणार आहे. कारण आता ते दुर्योधनासाठी लढत आहेत. ते किराट मारणे सोपे नाही परंतु, मी अर्जुनाच्या मार्गाने जाणारा आहे. त्यांचे हत्ती ऐरावतासारखे दिसतात. ते उत्तरेकडील पर्वतातून आलेले आहेत. त्यांच्या अंगावर लोखंडी कवचं आहेत. त्याच्या बरोबर म्लेच्छ लोक आहेत जे सर्वथा पापमय (तमोगुणी) जीवन जगत असतात. असे अगणित विविध प्रकारचे क्षत्रिय आहेत ज्यांच्याशी मी लढणार आहे. त्याशिवाय कृपाचार्यांची फौज आहे माझी वाट पहात आहे. सिंधचा राजा, कर्ण जे पांडवांना मामुली समजतात ते सुदैवाने राजमुकूट घालत आहेत. ते सगळे मला यमाकडे पोहोचवायचे आहेत. त्यातील कोणीही माझ्या शरसंधानातून सुटणार नाही. त्याच्या ताकदीवर दुर्योधनाचा मोठा भरवसा आहे. ते सगळे मला संपवायचे आहेत. दुसरे क्षत्रिय रथी मी पहात आहे ते उत्तम लढवय्ये आहेत. ते कंबोजचे आहेत. त्यांचे युद्ध शास्त्राचे ज्ञान चांगले असते. ते सहसा हरत नाहीत. तरी एकेकाळी सव्यसाचीने त्याना पराभूत केले होते. त्यांच्याने कौरवांचे अक्षौहिणी सैन्य तयार झाले आहे. आता ते बरेचसे कमी झाले आहे कारण गेल्या पंधरा दिवसांत त्यातील कित्येक यमाकडे गेले आहेत. मला त्यांना यमसदनाला पाठवावयाचे आहे. त्यासाठी मला माझा रथ सुसज्ज केला पाहिजे. मला कंबोजाना मारावयाचे आहे. त्याशिवाय किराट आहेत ज्यांचा खत्मा मला करावा लागेल नाईलाजाने. दुर्योधनाने त्यांना चांगली वागणूक देऊन आपलेसे केले आहे त्याचा त्रास पांडवांना म्हणजे मला होणार आहे. त्यानंतर शक आहेत तेसुद्धा दुर्योधनाने बांधून घेतले आहेत. शक फार चांगले योद्धे आहेत. त्यांना पराभूत करणे सोपे नसते. त्यांना मी भिडणार आहे. त्यासाठी माझ्या रथाला उत्तम जातीचे घोडे लावले पाहिजेत. त्यांना चांगले खाऊन पिऊन तयार केले पाहिजे. सत्यकीचे मनोगत संजय सांगत असतो.

पुढे तो सांगतो, त्याप्रमाणे युधिष्ठीर त्याची सगळी व्यवस्था करण्याचे पहातो. सत्यकी सर्व प्रकारे सज्ज होतो. सत्यकीसाठी ताज्या दमाचे घोडे दिले जातात. त्याचे घोडे सोनेरी रंगाचे होते. त्यांची वेगाने जाण्याची ख्याती होती असेंच घोडे त्याच्या रथाला जुंपले जातात. सत्यकीच्या रथावर एक उंच ध्वजस्तंभ उभा केला जातो. त्याच्या रथात अनेक प्रकारच्या बाणांचे साठे केले जातात. लढतांना त्याला कांहीं कमी पडू नये म्हणून ती व्यवस्था केली जाते. त्याला दारुक सारथी म्हणून दिला जातो जो कृष्णाचा सारथी आहे. सत्यकी ती सगळी तयारी नीटपणे तपासतो. सगळे मना प्रमाणे आहे कीं नाही ते पहातो. त्यानंतर सत्यकी स्नान करतो विधीपूर्वक. त्यानंतर सगळे धार्मिक विधी होतात जसे युद्धावर जाण्या आधी केले जातात. ब्राह्मण त्याला आशिर्वाद देतात. त्यानंतर खीर, मध असें शुभाचे त्याला खायला दिले जाते. तो फारच सुंदर दिसत होता. तो स्वताचे मुख आरशात पहातो व स्वतः खूष होतो. त्यानंतर तो त्याचे धनुष्य व भाता घेतो व त्या स्थितीत ब्राह्मण त्याची विधीपूर्वक पुजा करतात जेणेकरून त्याला यश मिळावे. कुमारिका त्याच्या डोक्यावर धान्याच्या अक्षदा उधळतात. ते शुभाचे समजले जाते. त्यानंतर तो त्याचे हात जोडून युधिष्ठीराची प्रार्थना करतो. युधिष्ठीर त्याच्या माथ्याचे चुंबन घेतो. त्याचे अश्व वार्यासारखे पळणारे होते. त्याच्या बरोबर त्याची त्यांने निवडलेल्या योद्ध्यांची फौज दिली जाते. त्यांचे घोडे सगळे सिंध जातीचे उत्तम होते. भिमसेन त्याला शुभेच्छा देण्यासाठी येतो. अशा तयारीने सत्यकी पार्थाला मदत करण्यासाठी निघतो. ते होत असतांना द्रोणाची फौज वाट पहात असते. भिम त्याच्या बरोबर शस्त्रसज्ज असा निघालेला पाहून सत्यकी त्याला बोलतो. "आपण राजाला संरक्षण देणार अहात कां"? त्यांचे संरक्षण एक मोठी जबाबदारी आहे. माझी कुवत आपण ओळखता म्हणून आपण माझ्याबरोबर न येता येथेच थांबा व राजाला संरक्षण द्या. मी माझे काम करण्यात समर्थ आहे". ते ऐकल्यावर भिम त्याला उत्तर देतो, "तसे तुला वाटते तर तू एकटा जा, माझ्या शुभेच्छा तुझ्याबरोबर असतील". त्यानंतर सत्यकी त्याला बोलतो, "सिंधच्या राजाचा वध पार्थाने केल्यानंतर मी युधिष्ठीराचे पाय पुजणार आहे". त्यानंतर ते दोघे एकमेकांना मिठी मारतात व शुभेच्छा देतात. त्यानंतर युयुधन तडक त्याच्या स्वारीवर निघतो. त्यानंतर तो पांडवांचा योद्धा

तुमच्या सैन्यकडे एक तीक्ष्ण नजर टाकतो. त्यामुळे तुमचे सैन्य हादरते. तो पुढे निघतो पार्थाला भेटण्यासाठी.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे नववा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे दहावा

संजय पुढे सांगतो, अहो धृतराष्ट्र, युयुधन गेल्यावर लागलीच युधिष्ठीराचे सैन्य धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वाखाली द्रोणांवर चाल करून जाते. त्याच्या बरोबर वासुदन होता. ते जोरांने ओरडून द्रोणाला आव्हान देतात. ते त्यांच्या सैनिकांना द्रोणाच्या फौजेवर हल्ला करण्याची आज्ञा देतात. त्याचे कारण त्यांना सत्यकीचा मार्ग सुकर करावयाचा होता. ते योद्धे बोलतात की, जर कोणी सत्यकीचा रस्ता अडवला तर त्यांना आम्ही बरबाद करू, त्यानंतर सत्यकीचा रथ मोठा आवाज करत तेथून निघून जातो. तुमच्या मुलांना तो त्याच्या बाणांने पळवून लावतो. तुमच्या त्या सैन्याच्या शेकडो तुकड्या त्याच्यामुळे होतात. ते करत असतांना तो सिनिचा नातू तुमच्या सात योद्ध्याना पाणी पाजतो. त्याशिवाय कित्येकांना तो यमाकडे पाठवतो. कौरवांचे म्हात्रे (हत्तीदलाचे योद्धे) त्याच्या बाणांने यमाकडे पाठवतो. त्याचा जोर असा होता कीं, तुमच्यापैकी कोणीही त्याला विरोध केला नाही. सत्यकीला पाहूनच तुमचे योद्धे बाजूला होत होते. त्याचे मुख्य कारण तुमच्या बाजूच्या लोकांना समजून चुकले होते कीं दुर्योधनाचा पराभव होणार आहे मग पांडवांशी विनाकारण वितुष्ट नको अशा विचाराने त्यांचा विरोध पहिल्यासारखा तीव्र राहीला नव्हता. युयुधन रुद्रासारखा जोरांने पार्थाकडे जातो. तो एक असून ही अनेक असल्यासारखे वाटत होते त्याचे रुप. सत्यकीने केलेल्या संहारामुळें जिकडेतिकडे सत्यानाश झाल्यासारखे दिसत होते. मेलेल्या माणसांचे तुटलेले अवयव ठिकठिकाणी पडलेले होते. त्यात माणसांबरोबर हत्ती व घोडेसुद्धा होते. त्या मेलेल्या प्राण्यांच्या अंगावरील दागिने सूर्याच्या उन्हात चमकत होते. अशारितीने असंख्य जणांची हत्त्या केल्यानंतर तो सतवत घराण्याचा योद्धा तुमच्या रिंगणाच्या आत घुसतो जेथे पार्थ जयद्रथाला शोधत होता. तेथे गेल्यावर सुद्धा त्याचे नरसंहाराचे सत्र तसेंच चालू असते. द्रोणांना ते समजते व ते पुढे होतात सत्यकीला आवरण्यासाठी. तो सुडाने पेटलेला सतवत योद्धा त्यांच्यावर घसरतो. परंतु, द्रोण त्याची दौड थांबवतात. युयुधन त्यांना वर्मी पांच बाण मारतात. द्रोण त्याचे घोडे व सारथी जखमी करतो. शक्तीमान युयुधन

त्याने हार मानणारा नव्हता. एक सिंहगर्जना करून तो द्रोणांना दहा बाण मारतो. त्यांच्या सारथ्याला बाण मारतो. द्रोणांचा ध्वजस्तंभ हलवतो. प्रतिक्रीया स्वरुप द्रोण सुद्धा त्याचा गोष्टींवर मारा करतात. त्यानंतर ते सत्यकीला बोलतात, "तुझा गुरू मला घाबरून पळाला आहे मला वाटते त्याच्या सारखा तू सुद्धा पळून जातोस कीं काय, जर तू माझ्याशी लढत राहिलास तर मी तुला यमाकडे जरूर पाठवीन". ते त्यांचे आव्हानात्मक बोलणे न आवडून युयुधन त्यांना उत्तर देतो, "आम्ही कोणी तुम्हाला किंवा कोणाला घाबरून वागत नसतो, आम्ही खर्या लढवय्याप्रमाणे सेनानीच्या आदेशांचे पालन करत असतो मग त्याचा तुम्ही कसाही अर्थ लावला तरी चालेल. मला झालेल्या आज्ञेप्रमाणे मी तुमच्याशी लढण्याचे ठरलेले नाही, मी अर्जुनाच्या बरोबर रहाण्यासाठी नेमलो गेलो आहे म्हणून मी आता तुमच्या बरोबर बोलण्यात माझा समय वाया घालवू शकत नाही. तुम्हाला जे हवे ते समजा, धन्यवाद". ते बोलून सत्यकी द्रोणांना सोडून पुढे त्या कौरवांच्या गराड्यात शिरतो. द्रोण त्याच्याकडे पहात स्मित हास्य करत असतात. ते बोलून मग सत्यकी जेथे अर्जुन असला पाहिजे तेथे पोहोचतो. द्रोण कांहीं ना कांहीं करून माझा प्रवास धनंजयापर्यंतचा अडवण्याचा प्रयत्न करणार आहेत हे समजून आपल्याला आपले काम केले पाहिजे. समोर अवंतीचे सैनिक आहेत. त्यांच्या बाजूला दक्षिणेचे आहेत. त्यांच्या कडेला आहेत वल्हीकं ते कर्णाचे आहेत. अरे सारथ्या, ते प्रत्येक वेगळे आहेत तरी ते एकमेकांना आधार देत असतात. त्यांच्या मधील भागातून आपल्याला आपला रथ काढावयाचा आहे. असें सांगून तो द्रोणाकडे दुर्लक्ष करत सारथ्याला सांगतो त्या मधल्या वाटेने जात आपल्याला कर्णाच्या पुढे उभे रहावयाचे आहे. परंतु, द्रोणाना त्याचा इरादा सोयीस्कर नव्हता. ते त्याच्या वाटेत जाण्याचा प्रयत्न करत रहातात. सारथी त्याप्रमाणे त्यांचा रथ काढत असतो. कर्णाच्या पलटणींवर तो बाणांच्या फेर्या झाडतच जात असतो. त्याचा जोर पाहून कौरवांचे सामान्य सैनिक पळ काढतात. ते कृतवर्मनाला आवडत नाही. तो सत्यकीला अडवण्याचा पर्यत्न करतो परंतु, युयुधन उलट त्याच्यावर वार करून त्याला बाजूला करतो. तो कृतवर्मनाला जखमी करतो. त्याचे घोडे घायाळ करतो. कृतवर्मन त्याला अडवू शकत नाही. तरी कृतवर्मन एक जहरी बाण त्याच्या छातीत मारतो. तो बाण

सत्यकीच्या अंगातून जाऊन मातीत पडतो. त्याने त्याचे रक्त खाल्ले होते. त्यानंतर त्या अनुभवी कृतवर्मनाने सत्यकीवर बाणांचा पाऊस पाडण्यास सुरूवात केली. त्याचे धनुष्य तो मोडतो तेव्हां सत्यकी एक शर कृतवर्मनावर फेकतो. त्यानंतर एक जास्त मजबूत धनुष्य घेऊन तो कृतवर्मनावर शंभर बाण मारतो. त्यानंतर असंख्य बाणाने तो कृतवर्मना भोवती बाणांचे कडे तयार करतो. त्यात हृदीकाचा मुलगा कैद होतो, त्याला कांहीं हलचल करता येत नाहीत. त्यानंतर तो त्याच्या सारथ्याचे डोके तोडून टाकतो. सारथी मेल्यामुळें त्याचा रथ बेतालपणे धूम ठोकत कोठेही जाऊ लागतो. त्यामुळें एकच गोंधळ उडतो. मोठ्या कष्टाने भोजांचे सैनिक तो रथ आवरतात. कृतवर्मन त्यानंतर भिमाच्या मागे लागतो. भोजांच्या गराड्यातून सत्यकी निसटतो व कंबोजांच्या भागात जातो. तेथे त्याला जबरदस्त विरोधाचा सामना करावा लागतो. तेथे त्याचा रथ थांबतो. द्रोण त्यांचे संरक्षणाचे काम भोजांवर सोपवून युयुधनाच्या मागे जाण्याचे ठरवतात. त्यांना त्याच्याशी द्वंद्व करण्याची इच्छा असते. ते पाहून पांचालांचे मोठे योद्धे द्रोणांना सतावायला लागतात. त्यांचे नेतृत्व भिमसेन करत असतो. कृतवर्मन त्याना अडवण्याचा प्रयत्न करतो. त्याचा मारा जास्त करून त्यांचे घोडे बाद करण्यावर होता. भोजांच्या विरोधाला न जुमानता पांडवांचे योद्धे त्यांना आव्हान देतात.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे दहावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे अकरावा

धृतराष्ट्र बोलतात, "आपले सैन्य उत्तम योद्ध्यानी युक्त आहे. त्यांचे युद्धकौशल्य कांहीं कमी नाही. त्यांच्याकडे संख्यबळ आहे. अरे संजया त्यांना चांगली वागणूक मिळते. म्हणून ते नेहमी आमच्याशी प्रामाणिक असतात. त्यांचे कर्तृत्व सगळ्याना माहित आहे. सैनिक त्यांच्या योग्य वयात आहेत. फार लहान नाहीत व फार वृद्धसुद्धा नाहीत. ते निरोगी आहेत, त्यांच्याकडे सगळी उत्तम आयुध आहेत, त्यांच्यासाठी उत्तम रथ, घोडे व हत्ती आहेत. त्यांचे प्रशिक्षण उत्तम आहे. ते कुलीन आहेत. ते निर्व्यसनी आहेत. त्याना चांगला भत्ता दिला जातो आहे. त्याच्या सगळ्या गरजा पुरवल्या जात आहेत तरी मला समजत नाही ते ह्या युद्धात कां कमी पडतात? द्रोणासारखा सरसेनापती आहे, कृतवर्मनासारखा योद्धा आहे, जलासंधा सारखे वीर आहेत, तरी जेव्हां तो पांडवांचा शूरवीर माझ्या सैन्याचा एका हाताने नाश करत असतो, त्या मागोमाग युयुधनसुद्धा तेंच करतो, ते पहाता मला नाही वाटत अशारितीने आपण हे युद्ध जिंकू शकू. कोणी त्या सव्यसाची पुढे टिकाव धरू शकेल. ते दोघे ज्याप्रकारे आपल्या फौजांचा परामर्श घेत आहेत मला नाही वाटत जयद्रथ वाचेल. आपले भाग्य फुटलेले आहे असें मला वाटते. सगळे कौरव मरणार असें मला वाटते. आपल्या योद्ध्याचे सामर्थ्य सुद्धा पहिल्यासारखे राहिलेले नाही. त्यातील प्रत्येक योद्धा चांगला पारखून घेतला होता मग युद्धभूमीवर असें कां होत आहे? कृष्ण व अर्जुन कौरवांच्या अड्ड्यात सहजपणे घुसतात, कोणी त्यांना विरोध करत नाही, आपण आपल्या योद्ध्यांचा चांगला सन्मान करतो मग ते असे कसे करतात. त्यांचा कधी अपमान होत नाही. प्रत्येकाचा पगार त्याच्या योग्यतेनुसार दिला जातो तरी त्यांच्याकडून अपेक्षे प्रमाणे कामं का होत नाहीत? सव्यसाची येतो व त्यांना हरवतो, त्याचा शिष्य येतो व आपल्या लोकांना सहजपणे मारतो असें कसे होत आहे? हे काय म्हणावयाचे, भाग्य कां दुसरे कांही? अर्जुन सहजपणे जयद्रथाच्या समोर जातो, माझ्या मूर्ख मुलाने काय व्यवस्था केली होती त्याला अडवण्यासाठी ते समजत नाही. कां ते सुद्धा आमचे दुर्भाग्यच

समजावयाचे? सत्यकी आपल्या गोटात कसा घुसू शकला, त्याला विरोध करण्याची कोणतीही व्यवस्था दुर्योधनाने कां केलेली नव्हती? कसलाही विरोध न होता ते कसे आपल्या गोटात आले ते समजत नाही. हा काय चमत्कार समजावयाचा कां आपला हलगर्जीपणा? मला समजते कीं, अर्जुन व कृष्णासह युयुधन येण्यामुळें कौरवांचे खच्चीकरण होत आहे. त्यांना येतांना पाहून आमचे राजे त्यांच्या सैन्यासह पळून जातात व आम्ही ते पहात बसतो ह्याचे मला नवल वाटते. अर्जुनाच्या बाणाने आमचे हत्ती घोडे पळून जातात ते पाहून माझी मुलं फक्त पहात बसतात ते पाहून मला नवल वाटते. आमचे हत्ती व घोडे त्यांच्यावरील स्वार मेल्यानंतर उधळतात ते पाहून मला नवल वाटते. आमच्या पायदलातील सैनिक पळून जातात ते पाहून मला नवल वाटते. ते दोघे द्रोणाला सुद्धा दाद देत नाहीत हे पाहून माझे मन खच्ची होत आहे. कृष्णासह अर्जुन आमच्या गोटातून सुरक्षितपणे जातात व आमचे सैन्य त्यांना अडवत नाही तसेंच तो सत्यकी भोजांना पार करतो व आमचे लोक कांहींच करत नाहीत असें कां होत आहे. अरे संजया मला सांग ते असे कां वागतात"?

"मला सांग संजया, द्रोणांनी पांडवांना झोडले त्या लढाईची माहिती. द्रोण अजिंक्य आहेत, तरी पांचाल त्यांना कसे बाणांनी भोसकू शकतात? पांचाल हे द्रोणांचे फार पूर्वीपासूनचे दुष्मन आहेत. तसेंच मला सांग, अर्जुन जयद्रथाचा वध करण्यासाठी पुढे काय करतो".

संजय पुढे सांगतो, "अहो राजे, हा सगळा तुमच्या लोभीपणाचा परिणाम आहे. आता दुःख करण्यात काय उपयोग होणार? अगदी सुरूवातीपासून आपले सूज्ञ सल्लागार विदूर ते सांगत होते कीं, पांडवांचा हिस्सा त्यांना प्रामाणिकपणे द्या, परंतू तुम्हाला त्या पंडुच्या मुलांच्या संपत्तीचा मोह टाळता आला नाही. दुर्योधनाचा नुसता बहाणा होता, खरेतर तुम्हालाच पांडवांना त्यांचा हिस्सा द्यावयाचा नव्हता ते न समजण्या इतके कोणी मूर्ख नाहीत. जर ते दिले असते तर हे युद्ध झाले नसते. त्या द्युतासाठी युधिष्ठीराला तुम्ही उद्युक्त केले त्या मागील तुमचा इरादा न समजण्याइतके कोणी मूर्ख नाहीत. जे चांगला सल्ला झुगारतात त्यांच्यावर अशी रडण्याची पाळी येते. कृष्ण स्वतः सामोपचार करण्यासाठी आला होता पण तुमच्या मुलांनी काय केले? तुमचा पांडवांच्या बद्दलचा छुपा

द्वेष कोणाला समजला नाही असें समजू नका. सगळे तो पहात होते. आता रडून काय उपयोग. युद्धा शिवाय दुसरा पर्याय आपण ठेवला नाही त्यासाठी सुद्धा तुम्ही तुमच्या मुलाचा मोहरा वापरला ते कोणाला समजले नाही असें समजू नका. ते सगळे आपण दुर्योधनाला पुढे करून करत होता व स्वतः नामानिराळे रहाण्याचे सोंग करत होता ते कोणाला समजत नव्हते असे नाही. सगळे जाणत होते कीं, तुमच्या सत्तेच्या लोभामुळें तुम्ही तुमच्या मुलांचा नाश करत अहात व आता रडून काय उपयोग? दुर्योधनाला वेळोवेळी शिव्या घालून सर्व दोष त्याच्यावर टाकण्याचे जे नाटक आपण करत होता ते कोणाला समजत नाही असे जरी तुम्ही समजत होता तरी ते सगळ्यांना समजत होते. म्हणून रडण्याचे नाटक बंद करून जे घडते आहे त्याचा वृतांत मी सांगतो तो निमुटपणे ऐका जो तुमच्या सत्तेच्या लोभाचा परिणाम आहे. तुमचे दोस्तसुद्धा समजून आहेत कीं, तुमची बाजू खोटी आहे त्यामुळे त्यांचा जोर कमी होत आहे, कारण अहो महाराज, सगळे जाणतात कीं, शेवटी विजय सत्याचा होतो आणि म्हणून ते पांडवांना पाहून पळून जात आहेत. त्यांना समजून चुकले आहे कीं, पांडवांचा विजय होणार मग त्यांच्याशी लढून विनाकारण त्यांच्या रांगाला कां ओढवून घ्यावे? ह्या कारणेमुळे ते अर्जुनाला सत्यकीला व कृष्णाला पाहून निघून जात आहे. कित्येक तुमचे दोस्त त्यांच्या सेना घेऊन आपापल्या ठिकाणी जात आहे. त्याचे कारण सुद्धा तेंच आहे. कांही तुमचे इमानदार स्नेही जसे हृदिकाचा मुलगा कृतवर्मन, अश्वत्थामा, सोमदत्त असें अजून तुमच्यासाठी प्राणपणाने लढत आहेत बाकीचे लढण्यापेक्षा गम्मत पहाण्यातच जास्त गुंतलेले आहेत.

ते पांडवांना पुढे येऊ देत नाहीत जयद्रथाचा वध टाळण्यासाठी. परंतु, भिमसेन कृतवर्मनाला बाणाने जखमी करतोच. त्यानंतर शंखनाद करतो. त्यानंतर सहदेव हृदिकाच्या मुलाला बाण मारतो. त्यानंतर युधिष्ठीर त्याला पांच बाण मारतो. त्यानंतर नकूल शंभर बाण मारतो. द्रौपदीची मुलं सुद्धा त्याला सोडत नाहीत घटोत्कच तीन बाण मारतो. त्याशिवाय विराट, द्रुपद, धृष्टद्युम्न अनेक बाण मारतात. शिखंडी पंचविस बाण मारतो. त्यानंतर कृतवर्मन त्या सगळ्यांना प्रत्येकी सात बाण मारतो. त्यानंतर तो महापराक्रमी भिमावर चाल करून जातो. त्याच्यावर सत्तर बाण त्याच्या छातीत मारतो.

त्यामुळे भिम भोवळ आल्यासारखा होतो. ते पाहून पांडव कृतवर्मनावर एकत्रपणे चालून जातात. त्याला वेढा घालतात. तेवढ्यात भिम शुद्धीवर येतो. भिम त्याच्यावर एक लोखंडी शर फेकतो परंतु, कृतवर्मन त्याचे हवेतच तुकडे करतो व तो शर मातीत कोसळतो. ते झाल्यावर भिमाला फार क्रोध होतो. तो एक मजबूत धनुष्य घेतो त्याने कृतवर्मनावर बाणांचा वर्षाव करू लागतो. तो भोजांचा राजा त्या वर्षावाने छिन्नभिन्न झालेला तेथेंच पडतो. त्यातून तो उठतो व भिमावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्या नंतर तो सतवत वंशाचा योद्धा शिखंडीवर हल्ला करतो. शिखंडीचे धनुष्य तुटते तेव्हां तो तलवार घेऊन उतरतो. त्याच्या दुसर्या हातात असते एक भली मोठी ढाल. तो ती तलवार कृतवर्मनावर फेकतो. त्यामुळें कृतवर्मनाचे धनुष्य मोडले जाते. त्याचवेळी इतर सगळे कृतवर्मनावर जोराचा बाणांचा मारा करत असतात. हृदिकाचा मुलगा नवीन तिरकमटा घेतो. त्याने पुन्हा त्या पार्थांवर बाण मारत रहातो. तो शिखंडीवर बाण मारतो त्याचे धनुष्य तोडतो. शिखंडी नवीन धनुष्य घेतो कृतवर्मनावर अनेक बाण मारतो. त्यानंतर तो यज्ञसेनाच्या मुलावर चालून जातो. ज्याच्यामुळे भिष्माचा मृत्यू झाला होता. त्यांच्यामध्ये द्वंद्व सुरू होते. कृतवर्मन शिखंडीवर असे बाण मारतो कीं तो वेदना सहन झाल्यामुळे खाली बसतो. तो बोहोष होतो. ते पाहून तुमचे सैनिक आनंद व्यक्त करताना दिसतात. पांडव त्वरेने शिखंडाला युद्धातून बाहेर काढतात. ती त्याची मोठी कमाई होती त्या दिवशीची. त्यांने एकट्याने पांडव, पांचाल अशा दोनही बाजूच्या योद्ध्याना बाद केले होते. त्यानंतर तो छेड्डी, श्रींजय अशा इतर योद्ध्याना सुद्धा बाद करतो. पांडवाच्या फौजांचा संहार तो करू लागतो. त्याला कोणी अडवू शकत नाही. अशाप्रकारे भिमाच्या नेतृत्वात असलेल्या पांडवांच्या सैन्याचा पराभव केल्यानंतर पांडव त्याला बिचकून वागू लागले होते. त्या कृतवर्मनाचा जोर त्या दिवशी पहाण्यासारखा होता.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे अकरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे बारावा

संजय पुढे सांगतो. आता ऐका पुढे काय झाले त्या युद्धात. पांडवांचा अशारितीने पराभव झाल्यानंतर कृतवर्मन आनंदात जातो. ते युयुधनाला समजते. त्याचा संताप अनावर होतो. कौरवांच्या आनंदाच्या आरोळ्या त्याला ऐकवत नाहीत. तो झपाट्याने कृतवर्मनाच्या दिशेने निघतो. युयुधन आल्यावर कृतवर्मन त्याच्यावर बाणांचा मारा करतो. सत्यकी ताबडतोब त्याला अनेक बाणांने जर्जर करतो. त्यामुळे कृतवर्मनाचे घोडे मरतात. त्यानंतर त्याच्या सैनिकांवर मारा करतो ते पळून जातात. सत्यकीच्या हल्ल्याने त्यांचा जोर उतरतो. त्यानंतर युयुधन तुमच्या इतर फौजांवर तुटून पडतो. तो द्रोणांच्या फौजावर हल्ला करतो. त्याला कृतवर्मनाला पराभूत केल्याचा आनंद झालेला होता. त्या आनंदात तो त्याच्या सारथ्याला सांगतो कीं, सावकाशपणे आपण पुढे जाऊ. परंतु, पुढे तो तुमचे सैन्य पहातो तो सारथ्याला सांगतो कीं, "ते मोठे लष्कर दिसते ते द्रोणांचे आहे व त्याच्या कडेला जे काळे हत्ती दिसत आहेत ते रुक मराठाचे आहेत. ते जिंकावयाला अवघड आहेत. दुर्योधनाच्या सांगण्यावरून ते मला विरोध करण्यासाठी आहेत. म्हणून आपले घोडे लवकर पळव, मला त्यांच्यात ने, म्हणजे मी त्रिगर्ताशी लढू शकेन, द्रोणांच्या समक्ष मला त्याला मारावयाचे आहे. ते ऐकल्यावर तो प्रामाणिक सारथी रथाचा त्या दिशेने पळवतो. त्यांचा रथ पाहिजे त्या जागी आणला जातो. तेथे आल्याबरोबर तुमचे सैन्य त्याला गराडा घालते. त्या वेढ्यात मोठे हत्तीसुद्धा होते. ते तुमचे सैनिक त्याच्यावर धारदार बाणांचा वर्षाव करू लागतात. सतवत सुद्धा कांहीं कमी नव्हता, तो त्यांना तसेंच प्रत्यूत्तर देतो. तो हत्तीदलावर हल्ला करतो त्याच्या बाणांने. त्यामुळें ते हत्ती भेदरून जातात व इतस्ततः पळू लागतात. त्यांची अंग रक्तानी माखलेली होती. त्यांच्यावरील म्हात्रे खाली फेकून दिलेले होते. विविध प्रकारच्या बाणांने तो त्यांचा परामर्श करत होता. धावतांना ते किंचाळत होते जे ऐकवत नव्हते. धावत असतांना घाबरलेले ते प्रचंड हत्ती हगत व मुतात होते. अशारितीने सत्यकीच्या हल्ल्यामुळें ते चौफेर धावत जाताना दिसत होते. त्या

हत्तीदलाची अशाप्रकारे वासलात लागते. ते झाले तरी हिम्मतवान जलासंध त्याच्या हत्तीवरून सत्यकीपुढे जातो. त्याच्या अंगावर सोन्याचे दागिने असतात. त्याच्या हातात सोन्याचा मुलामा दिलेले धनुष्य होते. तसा तो फार सुंदर वाटत होता. तो मगधचा राजा जलासंध त्याच्या दिमाखात सत्यकीला आव्हान देतो. त्याला पाहून सत्यकीला राग येतो. जलासंध युयुधनाला बाणाने जखमी करतो. सत्यकी त्याला बाणांने बराच जखमी करतो. त्यांचे द्वंद्व पहाण्यासारखे होते. त्यानंतर सिनीचा नातू मोठे धनुष्य घेतो व त्याला छातीत जोरदार बाण मारतो. त्यानंतर तो त्याचे धनुष्य तोडतो. जलासंध त्याचे मोडलेले धनुष्य टाकतो व तलवार घेतो व सत्यकीच्या अंगावर भाल्याप्रमाणे फेकतो. त्या तलवारीमुळे सत्यकीचा डावा हात जखमी होतो. तरी तो हिम्मत न हरता जलासंधाला तीस बाण मारतो. जलासंध मोठी तलवार व ढाल घेऊन सत्यकीचे मोठे धनुष्य मोडून टाकतो. ती तलवार धनुष्य मोडून जमिनीवर पडते. त्यामुळें न घाबरता तो दोन तीक्ष्ण बाणांने जलासंधाचे दोन हात छाटतो. हत्तीवर बसलेल्या जलासंधाचे ते दोन हात दोन गदांसारखे हत्तीवरून खाली पडतात. तिसर्या बाणानें जलासंधाचे मुंडके तो कपून टाकतो. कानातील मोठ्या कर्णकुंडलासह ते मुकूटासह खाली जमिनीवर पडते. त्याचा हत्ती त्याच्या रक्ताने रंगवला जात होता. त्यानंतर तो मगधचा राजा त्याच्या बैठकीसह खाली पडतो. त्यानंतर सत्यकी त्याच्या हत्तीवर बाण मारत रहातो. त्याने बेजार झालेला ते प्रचंड हत्ती कोठेतरी निघून जातो. त्या हत्तीच्या पायाखाली कित्येक सैनिक चिरडले जातात. ते घडल्यामुळे मगधचे लष्कर एकच गदारोळ करतात. त्यांचा राजा मेलेला असतो. मगधचे सैनिक रणभूमी सोडून जाऊ लागतात. त्या सुमारास द्रोण पुन्हा युयुधनाला छेडण्यासाठी त्याच्याकडे जाऊ लागतात. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. त्यात एका बाजूस कौरवांचे सैन्य व द्रोण आणि सत्यकी विरुद्ध असे ते होते. ते युद्ध देव आणि असुरांच्या युद्धाची आठवण करून देत होते आकाशातील प्रेक्षकांना.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे बारावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे तेरावा

संजय पुढे सांगतो, दोनही बाजूने बाणांचा वर्षाव भलताच होत होता. त्यामुळे कांहीं दिसत नव्हते. द्रोणांचे सात बाण युयुधनाला लागतात. दुर्मर्शनाचे बारा लागतात. दुःशासनाचे दहा लागतात, विकर्णाचे बाण त्याच्या छातीवर लागतात. दुर्मुखाचे दहा लागतात. चित्रसेन आठ मारतो. दुर्योधन बाणांचा वर्षाव करत असतो. इतर राजेसुद्धा तसेंच करत असतात. सत्यकी त्या सगळ्यांना त्याच्या बाणांनी जखमी करत असतो. तो द्रोणांना बाणाने जखमी करतो. ते केल्यानंतर सत्यकी तुमच्या मुलाकडे म्हणजे दुर्योधनाकडे त्याचा मोर्चा वळवतो. सगळ्यांच्या समक्ष तो दुर्योधनाला बाणाने भोसकतो. त्यानंतर त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. ते एकमेकांना इतके बाण मारतात कीं, त्यात ते दिसेनासे होतात. त्यानंतर सत्यकी दुर्योधनाला इतके भोसकतो कीं, त्याच्या अगातून रक्ताच्या धारा वाहू लागतात. जसे चंदनाच्या झाडातून त्याचा चीक वहातो. तुमचा मुलगा सुद्धा सत्यकीला तसेंच बाण मारत असतो. सत्यकी त्यानंतर एका धारदार बाणांने दुर्योधना धनुष्य तोडतो. ते युयुधनाचे यश तुमच्या मुलाला सहन होत नाही. त्यानंतर तो आणखीन एक मजबूत तिरकमटा घेतो ज्यावर सोन्याचा मुलामा होता, व सत्यकीला कांही तीक्ष्ण बाण वेगांने मारतो. त्या त्याच्या कृतीचा सत्यकीला फार राग येतो परंतु, तुमचे इतर मुलगेसुद्धा त्यांच्या मोठ्या भावाचे अनुकरण करतात व सत्यकीला अनेक बाण मारत रहातात. सत्यकी दुर्योधनाचे ते मोठे व मजबूत धनुष्य तोडून टाकतो. त्यानंतर तो त्याच्या सारथ्याला मारतो. पुन्हा दुर्योधनाला तो अनेक धारदार बाण मारत रहातो. त्यानंतर दुर्योधन तेथून चित्रसेनाच्या रथातून पळून जातो. दुर्योधनाला अशारितीने पळून जातांना पाहून कौरवांच्या सैन्याचा धीर खच्ची होतो ते मोठ्या मोठ्याने ओरडत आपले दुःख व्यक्त करत असतात. तो गोंधळ ऐकल्याने शूरवीर कृतवर्मन सत्यकीला तोंड देण्यासाठी त्याच्याकडे निघतो. तो त्याच्या सारथ्याला सांगत असतो कीं, आपण त्वरितपणे सत्यकीच्या ठिकाणी गेले पाहिजे. त्याला येतांना युयुधन पहातो. तो त्याच्या सारथ्याला बोलतो, "कृतवर्मन येत आहे, त्याचे बाण सज्ज

आहेत, ते माझ्यावर रोखलेले आहेत, म्हणून आपण वेगांने त्या दिशेने गेले पाहिजे". सत्यकी व भोजांचा राजा एकमेकांना भिडतात. कृतवर्मन सत्यकीच्या सारथ्याला व घोड्यांना बाण मारतो. त्याप्रकारे तो सत्यकीला अडवतो. सत्यकी त्या अजिंक्य समजला गेलेला भोजांचा राजाला असें बाण मारतो कीं, तो थरथरू लागतो. त्याचा धीर रहात नाही. त्यानंतर पुन्हा पुन्हा सत्यकी त्याच्यावर व त्याच्या सारथ्यावर, घोड्यावर वार करत रहातो, शेवटी एक असा बाण मारतो कीं, त्याचे कवच निखळून पडते त्या बाणासह जमिनीवर. त्या हल्ल्याने कृतवर्मन खच्ची होतो व त्याच्या रथात पडतो. भोजांचे सैन्य बुचकळ्यात पडते त्यांना समज नाही काय करावे? सिनीचा नातू मात्र त्यांच्या मधून रुबाबात पुढे निघून जातो. जसे इंद्र वृत्राचा वध केल्यानंतर असुरांच्या सैन्याच्या समक्ष निघून गेला होता प्राचीन काळी. त्यानंतर कृतवर्मन तेथेच थांबून पांडवांच्या फौजांना रोखण्याचा प्रयत्न करत असतो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे तेरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे चौदावा

संजय पुढे सांगतो, सत्यकी कौरवांच्या फौजांतून रुबाबात जात असतांना तेथे द्रोण त्याच्यावर बाणांचा पाऊस पाडत होता. ते त्यांचे द्वंद्व तुमच्या सौनिकांसमोर होत होते. जसे प्राचीन काळी इंद्र व वलीमध्ये झाले होते. द्रोण युयुधनाच्या कपाळावर बाण मारतात. त्याने भांबावलेल्या सत्यकीवर द्रोण आणखीन बाण मारतात. परंतु, तो दशरथाच्या कुळातील योद्धा त्याचे धनुर्विद्येचे ज्ञान पणाला लावून द्रोणांचे सगळे प्रयत्न व्यर्थ करतात. ते पाहून द्रोणांना आनंद झाल्यासारखे दिसत होते. ते त्याच्या युद्ध कलेचे कौतुक करतात. त्यानंतर ते सत्यकीवर पन्नास बाण मारून त्यांच्या धनुर्विद्येचे प्रदर्शन करतात. त्या द्वंद्वामुळे त्यांच्यातील कोण जास्त चांगला धनुर्योद्धा ते ठरवणे अवघड होते. त्यानंतर सत्यकी द्रोणांचा झेंडा फाडून टाकतो. द्रोण युयुधनाच्या सारथ्याला जखमी करतात. त्याशिवाय घोड्यांना सुद्धा जखमी करतो. द्रोण सत्यकीचा झेंडा फाडून टाकतात. ते पाहून संतापलेला सत्यकी गदा घेतो आणि द्रोणांवर फेकतो. द्रोण त्या गदेला बाण मारून तिची दिशा फिरवतात. अशी कीं ती गदा परत सत्यकीकडे जावी. सत्यकी चिडून द्रोणांवर असंख्य बाण मारत रहातो. तो मोठी गर्जना करतो. द्रोण एक लोखंडाचा शर ज्याची मुठ सोन्याची आहे युयुधनावर फेकतात. परंतु, त्यांचा नेम चुकतो व तो शर रथाला लागून मातीत पडतो. त्याचा मोठा आवाज होतो. त्यानंतर सत्यकी द्रोणाच्या उजव्या हातावर बाण मारतो. त्यामुळें चिडलेले भारद्वाजाचे पुत्र सत्यकीवर बाणांचा वर्षाव करण्यास सुरूवात करतात. त्यामुळे सत्यकीचे धनुष्य तुटते. त्यांने फेकलेल्या एका शराने सत्यकीचा सारथी बेहोष होतो. त्यानंतर सत्यकी स्वतः रथाचे सारथ्य करत लढत रहातो. ते पहाण्यासारखे होते. त्याचे द्रोणांशी युद्ध अशारितीने चालू असते. द्रोणांच्या बाणांमुळें सत्यकी फार जखमी झालेला होता, संतापलेला सुद्धा होता. युयुधन द्रोणांच्या सोनेरी रथाला अनेक बाण मारून मोडण्याचा प्रयत्न करतो. द्रोणांचा सारथी त्यात मारला जातो. तो खली पडतो व त्यांचा रथ बेताल होतो. द्रोणांचा रथ त्या रणभूमीत गोल गोल घिरट्या घालत रहातो व

द्रोण कांहीं करू शकत नाहीत.  ते पाहून कौरवांचे लोक मोठ्या मोठ्याने किंचाळू लागतात.  एकच धावपळ सुरू होते.  तो रथ थांबवण्यासाठी.  ती रणभूमी सत्यकी सोडून देतो.  तुमचे योद्धे द्रोणाचा रथ थांबवण्यासाठी प्रयत्न करत असतांना तुमचे सैनिक मोठ्या मोठ्याने मदतीसाठी हांका मारतांना ऐकू येत होते.  द्रोणांना समजते कीं, त्याच्या व्युहरचनेला पांडवांनी खिंडार पाडले आहे तेव्हां त्याना समजते कीं ते सत्यकीमागे जे लागले त्यात चूक झाली होती.  त्यानंतर द्रोण सत्यकीचा नाद सोडतात.  त्यांची व्यहरचना पुन्हा कार्यरत करण्यावर ते त्यांचे लक्ष केंद्रीत करतात.  तेथे भोवती जमलेल्या पांडवांच्या फौजांवर त्याच्या बाणांचा वर्षाव होऊ लागतो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे चौदावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे पंधरावा

संजय पुढे सांगतो, द्रोणाचा पराभव केलेला तो सिनी ज्याने कृतवर्मनालासुद्धा पाणी पाजले होते तो हसत हसत त्याच्या सारथ्याला बोलतो, "आपले शत्रू केशवांनी व पार्थाने आधीच खतम केले असतील. त्याना पुन्हा हरवण्यात आपण फक्त आधीच मेलेल्याना मारत असल्यासारखे होणार आहे. असें बोलून तो पांडवांचा सेनानी कौरवांच्या टोळ्यांवर बाणांचा वर्षाव करत पुढे जात असतो. त्याला तुमचे कोणीही विरोध करत नाहीत. त्याची क्षमता देवांच्या राजासारखी होती. अशावेळी एक राजा सुदर्शन ज्याचे युद्धशास्त्राचे ज्ञान खास होते, सोन्याचे चिलखत घालून त्याचे धनुष्य व बाण घेऊन सत्यकीच्या दिशेने चालून जातो. तो त्याच्या वाटेत उभा रहातो. त्यांच्यात एक भीषण द्वंद्व होते. सुदर्शन सोमकांचा राजा होता. तो सत्यकीला त्याच्या धारदार बाणांने अडवण्याचा प्रयत्न करत असतो. तो त्याच्या रथाच्या वरच्या गच्चीतून सत्यकीवर बाण मारत असतो व तो त्याचे धनुष्य मोडून टाकतो. त्याचा इरादा सत्यकीला ठार मारण्याचाच आहे हे स्पष्ट दिसत होते. त्याचे लांब बाण सत्यकीच्या कवचाला भेदून त्याच्या उंगात शिरतात. त्यानंतर तो सोमकांचा राजा सत्यकीचे घोडे जखमी करतो. ते पाहून सत्यकी समजतो कीं त्या सोमकाच्या राजाचा निकाल लावणे आवश्यक आहे. तो तीक्ष्ण बाणाने सुदर्शनाचे घोडे मारतो. त्यानंतर एक गर्जना आव्हानाची करतो. त्यानंतर तो सुदर्शनाच्या सारथ्याचे मुंडके उडवतो. त्यानंतर वेळ न घालवता सत्यकी सुदर्शनाचे मुंडके उडवतो. मुकूटासह ते खाली पडते मातीत. प्राचीन काळी वलाचे डोके जसे शक्राने उडवले होते तसे ते होते. ते केल्यानंतर तो यदु कुळातील योद्धा समाधानी झाल्यासारखे दिसते. युयुधन त्यानंतर अर्जुनाच्या दिशेने जाऊ लागतो. अर्जुनाचे बाण वाटेत पडलेले तो पहात त्याप्रमाणे अर्जुनाचा रस्ता शोधत पुढे जात रहातो. त्याचे ते रस्ता शोधणे सगळ्यांना नवल करते. सगळे अनुभवी योद्धे त्या युवकाचे शौर्य पाहून त्याचे कौतुक करत असतात. त्याचे शत्रूचा काटा काढण्याचे धोरण बर्याच जणांना आवडते. जयद्रथ वध पर्व भाग एकशे पंधरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे सोळावा

संजय पुढे सांगतो, सुदर्शनाचा वध केल्यानंतर तो त्याच्या सारथ्याला बोलतो, "जे केवळ अशक्य वाटत होते ते आपण शक्य केले आहे. त्या द्रोणांच्या अफाट सैन्यातील रथ, बाण, शर, तलवारी, गदा अशा सगळ्यांच्या गदारोळातून आपण निघालो आहोत सहीसलामत. मृत्यूच्या अगदी जवळून आपण आपला प्रवास करत आलो आहोत. त्यात कृतवर्मन, जलासंध, द्रोण आता सुदर्शन ह्यांना आपण लोळवले आहे. त्यामुळे द्रोणांचा व्युह बहुतेक उधळला गेला आहे. उरलेले आपण सहजपणे पार करू शकू असा माझा विश्वास आहे. तुझ्या घोड्याना पुढचा प्रवास सावकाश करण्यास सांग. आपण सव्यसाची जवळ लवकरच पोहोचू. द्रोणांना पराभूत केले आहे, त्याशिवाय हृदिकाच्या मुलाला जिंकले आहे, म्हणजे मी धनंजयाच्या फार जवळ आलो आहे. मला कशाचीही भिती वाटत नाही. मला शत्रू सुक्या गवतासारखे वाटतात. ते एका पेटत्या काडीने भस्मसात होतात. जरा जपून रथ चालवं म्हणजे सव्यसाचीचा माग काढता येईल. जेथे जास्तीत जास्त हत्ती मेलेले दिसतात त्या दिशेने तो गेला असला पाहिजे कारण, दुसरा कोणीही हत्ती त्या प्रमाणात मारू शकत नाहीत. कौरवांचे सैन्य पळत आहे, त्याची धूळ आकाशात दिसते त्या दिशेने आपल्याला जावे लागेल. ते पहाता मला वाटते मी अर्जुनाच्या जवळ आलो आहे. ते पहा गांडीवाचा आवाज, जो इतर धनुष्यांपेक्षा वेगळा आहे तो अधून मधून ऐकू येत आहे. म्हणजे आपण योग्य मार्गावर आहोत. जे शुभशकून मला दिसत आहेत त्यावरून मला खात्री आहे कीं, आज अर्जुन त्याचा प्रतिज्ञा पूर्ण करणार आहे. सूर्य मावळण्यास अजून अवधी आहे. उगाच घाई न करता आपला रथ त्या दिशेने न्यायला सांग जेथे दुर्योधनाचे विविध जाती कुळाच्या लोकांच्या सेना माझे स्वागत करण्यासाठी सज्ज आहेत ज्या मध्ये कंबोज, यवन, शक, दरद, बरबर, ताम्रलिप्तक, असे अनेक म्लेच्छ योद्धे आहेत. मला त्यांना ठार मारावयाचे आहे त्यांच्या हत्ती घोड्यांसकट". ती आज्ञा सारथ्याला पुरेशी असते. तो बोलतो, "अहो वृश्नी, मला कसलीच भिती नाही. तुम्ही भर्गवाशी अथवा

द्रोणांशी अथवा सल्याची अथवा तशा कोणाशीही लढा, जो वर मी आपल्या संरक्षणात आहे, मला कसली भिती शिवणार? अशा कितीतरी योद्ध्याना आपण ह्या आधी मारले आहे. तुमचे धैर्य पाहून मला उत्साह येतो. मी तुम्हाला दिवसाच्या आत धनंजयांपर्यंत घेऊन जातो. तुम्हाला पाहून कौरवांचे सैन्य पळून जाते ते पाहून मला बरे वाटते". सत्यकी बोलतो, मी आज जसे इंद्राने दानवांना मारले तसे कंबोजांचे शिरकाण करणार आहे. त्यांचा संहार करत मी धनंजया पर्यंत जाणार आहे. सगळे कौरव व दुर्योधन माझी हिम्मत पहातील जेव्हां मी त्या म्लेच्छांचा संहार करणार आहे. मला कौरवांना रडतांना पहावयाचे आहे. आज मी माझ्या गुरूला दाखवणार आहे कीं, मी किती तयार झालो आहे त्यांच्या शिकवणूकींने. कौरवांच्या फौजांचा संहार होत असलेला पाहून तो दुर्योधन रडेल ते मला पहावयाचे आहे. मी कौरवांचा संहार करत असतांना त्या दुर्योधनाला असे वाटेल कीं दोन पार्थ लढत आहेत. त्यातच मला खरे समाधान मिळणार आहे. पांडवाबद्दलची माझी इमानदारी मी आज सिद्ध करणार आहे".

संजय पुढे सांगत असतो, असे बोलून तो त्याच्या सारथ्याला विनंती करतो की, तो रथाला वेग देईल. त्यांचे घोडे वेगांने जाऊ लागतात. ते त्या ठिकाणी पोहोचतात जेथे यवन सज्ज होते. ते यवन सत्यकीवर बाणांचा वर्षाव करू लागतात. सत्यकी त्याच्या प्रतिकाराने त्या यवनांचे शिरकाण करतो. शेकड्याने तो त्यांना ठार मारतो. त्याच प्रमाणे तो कंबोज, शक व इतर म्लेच्छ मारत जातो. सिनीचा नातू मोठ्या प्रमाणात नरसंहार करत असतो. रणभूमी त्या कौरवांच्या बाजूने लढणार्या योद्ध्यांच्या मुडद्याने भरलेली दिसत होती. कोणाचे डोके तर कोणाचे हात, पाय असे पडलेले दिसत होते. रक्ताचा चिखल झाला होता. त्याच्या लांब दाढ्या व केस नसलेली टकली सर्वत्र पडलेली दिसत होती. उरलेले म्लेच्छ त्यांच्या घोड्यांना तेथून पळवतात आणि सत्यकीचा मार्ग मोकळा करतात. जेथे वाट मिळेल तेथे ते पळत होते. कंबोजांचा अशाप्रकारे पराभव केल्यानंतर सत्यकी मोठ्या आत्मविश्वासाने त्याच्या सारथ्याला बोलतो, "चल आपण पुढे जाऊ". ते त्याचे कर्तृत्व पाहून आकाशातील चरण, सिद्ध, गंधर्व टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक करतात. युयुधन मोठ्या उत्साहाने अर्जुनाच्या दिशेने जात रहातो. जयद्रथ वध पर्व भाग एकशे सोळावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे सतरावा

संजय पुढे सांगतो, यवन आणि कंबोजांना हरवल्यानंतर तो कुलदीपक युयुधन अर्जुनाच्या समीप जाण्यासाठी पुढे होतो. तो कौरवांच्या सैनिकांच्या जत्थ्यामधून जात होता निर्धास्तपणे. जसें वाघ हरणांच्या कळपातून जावा. त्याचे व्यक्तीमत्व तेजस्वी, देखणे होते. हसतांना त्याची शुभ्र दंतपंक्ती चमकत होती. त्याचे चिलखत त्यावर शोभून दिसत होते. पुढे जात असतांना तो त्याचे धनुष्य हाताला झटके देऊन व्यवस्थित करत होता जसे तो ते सज्ज करत होता बाण मारण्यासाठी. त्याच्या धनुष्याच्या मागील बाजूना सोन्याचा मुलामा होता. फार सुंदर प्रकारे तो सजवलेला होता. त्याच्या अंगावरील सगळे कांहीं सोन्याच्या मुलाम्यानेच सुशोभित केलेले होते. त्याच्या हातातील गोलाकार धनुष्यासह तो सूर्यासारखा चमकत होता. त्याचे धिप्पाड शरीर व बांधा असा होता कीं, तो त्या तुमच्या सैनिकांत उन्मत्त वृषभ असावा. हत्तींमध्ये माजलेल्या हत्तीसारखा तो होता. द्रोणांच्या पलटणी त्यांने पार केल्यानंतर तो भोजांच्या पलटणीकडे जातो. त्यातून पुढे तो जलासंधाच्या पलटणी पार करतो. ते करत असतांना हृदिकाचे कित्येक सैनिक युयुधनाला वाढा देतात व त्याचा रथ अडवतात. त्याबरोबर दुर्योधन चित्रसेन, दुःशासन, विविंसती, शकूनी, दुःसह, दुर्धर्शन, क्राथ असें तुमचे युद्धशास्त्र उत्तम जाणणारे सत्यकीच्या मागून त्याचा पाठलाग करत असतात ते सुद्धा तेथे पोहोचतात. त्याठिकाणी मोठा गदारोळ होतो. सगळ्या फौजा एकमेकांवर धावून जातात. सिनीचा नातू त्याच्या सारथ्याला सांगतो, "सावकाशपणे पुढे होत रहा. धृतराष्ट्राचे माझ्यावर चाल करून येत आहेत". सत्यकीच्या रथाच्या आवाजाने पृथ्वी जणू हादरते. तो कौरवांच्या सैन्याजा समुद्र पाहून त्याचे रक्त सळसळू लागते. कधी एकदाचा त्यांना यमाकडे पाठवतो असें त्याला होत असते. तो बोलतो, "माझ्या धारदार बाणांने मी त्याची मुंडकी कधी उडवतो असें मला झालेले आहे. मी इंद्रासारखा त्यांचा नाश करणार आहे. ह्यांच्या सगळ्या फौजा मी माझ्या धारदार बाणांने मारून टाकणार आहे. त्यांचे सगळे हत्ती, घोडे त्यावरील स्वार, पायदळ सगळे मी

यमाकडे धाडणार आहे". ते त्यांचे संभाषण होत असतांना कौरवांचे योद्धे वेगांने त्याच्या रथा जवळ येतात. त्यांचे मोठ्याने ओरडणे चालू होते. "मारा त्याला, ठार करा त्याला", असे तो एकमेकांना सांगत होते. सत्यकी त्याच्या बाणांने त्यांचा वेध घेण्यास सुरूवात करतो. सत्यकीचे रुप आता फारच भीषण झालेले होते. इंद्राचा अवतार झाला होता. ते युद्ध फारच भीषण होते. जसे देव व असुरांचे युद्ध असावे. फार मोठ्या प्रमाणात नरसंहार झाला. त्याशिवाय हत्ती, घोडे मारले गेले ते वेगळे. सत्यकीचे बाण अजिबात चुकत नव्हते. सत्यकीच्या एकतर्फी मारामुळें ते तुमचे सैन्य जागच्या जागी उभे राहिले होते. बाणांचा पाऊस तो पाडत होता त्यामुळे कांहीं हलचाल करणे शक्य होत नव्हते. त्या मारामुळे धास्तावलेले सैन्य पळून जाण्याच्या तयारीत असते. तेथे असलेला प्रत्येक कौरव सैनिक त्याच्या बाणांनी जखमी झालेला होता. अहो महाराज धृतराष्ट्र, सत्यकीचे युद्धकौशल्य पार्थाच्या योग्यतचे होते. त्यावेळी दुर्योधन तेथे येतो व तो सत्यकीवर बाणाचे वार करतो. त्याच्या सारथ्याला तो बाण मारतो. त्यानंतर सत्यकीला प्रथम तीन व नंतर दहा बाण मारतो. दुःशासन सुद्धा साठ बाण मारतो. चित्रसेन पांच मारतो व शकूनी सहा मारतो. त्यानंतर सत्यकी त्याचा मारा चालू करतो. तो सगळ्यांना खोल जखमा करणारे बाण मारतो व त्या सगळ्यांना बाद करतो. त्यानंतर तो शकूनीचे धनुष्य मोडून टाकतो. इतरांचे धनुष्यसुद्धा निकामी करतो. दुर्योधन नवीन धनुष्य घेऊन युयुधनाला सत्तर बाण मारतो. त्याला सत्यकी जशास तसे जाब देतो. ते दुर्योधनाच्या रथावर व सारथ्यावर हल्ला करतो. त्यामुळे त्याचा मृत्यू होतो. ते झाल्याने दुर्योधनाचा रथ वाटेल तसा रणांगात धावत रहातो. तो नंतर रणांगणातून बाहेर जातो. तुझा मुलगा पहातो कीं, त्याचे सैन्य इतस्ततः पळत आहे. त्या पळणार्या लष्करावर सत्यकीचे बाण पडत होते व त्यामुळे त्यांना जखमा होत होत्या. पळता पळता त्यातील कित्येक मरत होते त्याच्या बाणामुळें. त्यानंतर तो अर्जुनाकडे निघतो. मागून कोणा पाठलाग करू नये म्हणून तो रथाच्या मागे बाण मारत पाठलाग करणार्यांचा बंदोबस्त करत असतो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे सतरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व
## भाग एकशे अठरावा

धृतराष्ट्र बोलतो, युयुधन अर्जुनाकडे जात असतांना तो माझ्या फौजांचा परामर्श घेत होता. अरे संजया, त्यावेळी माझे बेशरम मुलगे काय करत होते? जेव्हां युयुधन जो सव्यसाचीच आहे दुसरा त्याच्यापुढे आमचे सैन्य कापत होता तेव्हां ते काय करत होते ते मला ऐकावयाचे आहे. त्याना अजून युद्धाचा मोह कसा होत होता ते मला समजत नाही. आहे ते पाहून ते हरलेले क्षत्रिय त्यानंतर काय करत होते? सत्यकी त्यांच्यातून कसा निर्धास्तपणे जात होता? मला ते सगळे ऐकावयाचे आहे. तू फार चांगल्या प्रकारे सांगतोस. तू मला सांगितले आहेस कीं, अरे सुता, आमचे भाग्य बिघडलेले आहे असे दिसते. तो एकटा कसा त्या सगळ्या महारथींना ठार मारू शकतो तेंच समजत नाही. अशी युद्ध मी पाहिलेली अथवा ऐकलेली नाहीत कीं, त्यात एक योद्धा अनेक योद्ध्यांशी लिलया मुकाबला करतो. हे कांहीं तरी नवलच आहे. अरे संजया, माझे सगळे सैन्य पांडवांच्या एका योद्ध्याला हरवू शकत नाही हे काय होत आहे? तो तरूण सत्यकी द्रोणांना नाकींनऊ करतो हे कसे मी मान्य करू? तो एक अजिंक्य योद्धा ज्याने अनेक पिढ्यांचे योद्धे शिकवून तयार केले आहेत ते एका मुलाकडून हरतात, त्यांचा रथ घोटाळत रहातो व कोणी त्यांना मदत करण्यासाठी पुढे येण्यास धजावत नाही हे काय होत आहे ते मला समजत नाही. तो सत्यकी माझ्या मुलांना उंदीर मारावेत अशाप्रकारे मारत होता ते मी कसे सहन करू? तो महाबली कृतवर्मन जो अव्वल योद्धा आहे म्हणून जगभर ख्यातनाम आहे तो युयुधनाकडून हरवला जातो म्हणजे काय होत आहे ते मला समजत नाही. असेंच जर चालणार असेल तर तो मुलगा माझ्या मुलांना सुद्धा मारून टाकणार असेल. फाल्गुनीसुद्धा त्या जोशात कधी लढलेला मला माहीत नाही ज्या जोशात युयुधन लढत होता. त्याचे शौर्य व अभिमन्यूचे शौर्य ह्यात मला खूप साम्य दिसते.

संजय बोलतो, "अहो राजे, ह्या सगळ्या विनाशाच्या मागे आपले दुष्ट विचार आहेत ह्याचा आपल्याला विसर पडू देऊ नका. मी काय सांगतो ते नीट लक्ष देऊन ऐका.

आपल्या मुलाच्या आज्ञेने संसप्तक एकत्र येऊन भयंकर लढाई करण्याचे ठरवतात. तीन हजार धनुर्धारी त्याच्या आदेशानुसार लढणार होते, त्यात शकसंद कंबोजी, वल्हीक, यवन, परद, कलिंग, तंगनी, अम्वश्त, पिशाच्च, बरबर, आणि पहाडी लोक होते. अहो राजे ऐका, ते सगळे एकट्या सत्यकीच्या विरुद्ध लढण्यासाठी त्याच्यावर हल्ला करतात. जसें टोळधाड असावी. इतर पांचशे योद्धे त्याच प्रमाणे त्याच्यावर चालून जातात. त्यांच्याकडे हत्ती, घोडे रथ व पायदळ होते. त्यांचे नेतृत्व दुःशासनाकडे होते. तो त्या सगळ्या लढवय्याना जोरा जोराने ओरडून सांगत होता कीं, ते त्या एका क्षत्रियाला ठार मारतील. त्या सगळ्यांशी तो एकटा वृश्नी सहजपणे लढत होता. आणि त्या सगळ्यांना तो पाणी चारत होता. ते सगळे संसप्तक व दुसरे योद्धे त्यांने ठार मारले होते. त्यांची आयुध, रथ, हत्ती, घोडे असें सगळे त्याने चुराडा करून टाकले होते. हे सगळे एकट्याने केले होते ते महादेवाच्या मदतीशिवाय केवळ अशक्य होते. त्याने वनायू जातीचे उत्तम घोडे, कंबोज व वल्हीक जातीचे घोडे व असंख्य पायदळीचे सैनिक त्याने सहजपणे ठार मारले होते. त्यांचे सैनिक मारले जात असतांना ते घाबरून रणभूमी सोडून जाऊ लागतात तेव्हां दुःशासन त्यांना बोलतो कीं, त्यांनी धर्मयुद्ध कधी केलेले नाही ते लुटारू आहेत तेव्हां त्यानी युद्धभूमी सोडून जाऊ नये. तो पुढे बोलतो कीं, कौरवांनासुद्धा अशा लढाईचा अनुभव नाही. सत्यकीवर चाल करून जा. त्याला घाबरू नका. तेव्हां दगडानी लढणारे ते जंगली लोक सिनीच्या नातूवर तेथे मिळतील ते दगड फेकून मारू लागतात. युयुधनाला ते एक वेगळ्या प्रकारचे आव्हान होते. दुसरे कांहीं भाले घेऊन सत्यकीवर हल्ला करतात. सत्यकी त्याच्या नागासारख्या दिसणार्या बाणांने ते मोठे दगड फोडून टाकतो असें कीं त्याचा चुरा त्याच लोकांच्या अंगावर पडतो. त्या दगडांच्या मार्याने त्यातील कितीतरी मरतात. त्यांच्या किंकाळ्याने आसमंत दणाणून जातो. दुसरे कांही त्यांच्या हातातील दगडांसह खाली पडतात तोल गेल्यामुळें त्यात बरेच मरतात. त्यात त्यांचे हात पाय तुटतात ते निकामी होतात. कित्येक सत्यकीच्या पर्यंत पोहोचू शकत नाहीत ते तसेच जातात. बाकीच्या कांहींजणांना सत्यकी त्याच्या बाणांनी मारून टाकतो. तरी कांहीं त्यांचे दगड व इतर प्राथमिक स्वरुपाची आयुध घेऊन लढण्यासाठी पुढे जातात. त्यामध्ये दरद, तंगनी, खासी, पुलिंद असे होते.

सत्यकी त्याच्या त्याच्या युद्धकौशल्याने त्यांची सगळी आयुधं नष्ट करतो. त्यांना कंठस्नान घालतो. त्यांचे हत्ती व रथ पळून जातात. त्या दगडांच्या मार्याने जखमी झालेले हत्ती, घोडे व माणसें लढण्यास निरुपयोगी झाले होते. ते युयुधनाच्या रथापासून दूर निघून जातात. तो सगळा गोंधळ द्रोणांच्या कानावर जातो. ते त्याच्या सारथ्याला सांगतात कीं, "अरे सुता, तो सतवत घराण्याचा योद्धा माझे सैन्य उधळत आहे. जसे कांहीं साक्षात यम आला आहे असे ते होत आहे. आपल्याला त्याच्याकडे गेले पाहिजे. आपले सैनिक बेभान झाले आहेत. ते ऐकून त्यांचा सारथी त्यांना बोलतो, "त्याच्या मुळें कौरवांचे सैन्य पळत आहे, पांचाल व पांडव एकत्र येऊन आपल्या फौजांचा नाश करत आहेत. मला सांगा कोणते काम प्रथम करावयाचे. येथे थांबून पांचालांचे पारिपत्य करावयाचे कां सत्यकीकडे जावयाचे? सत्यकी म्हंटले तर तो आपल्या फार पुढे गेला आहे". ते तो बोलत असतांना अचानकपणे त्यांना सत्यकी समोरून येतांना दिसतो. तो कौरवांच्या लष्कराचा सत्यानाश करत असतो. कौरवांचे सैन्य त्याच्या पासून दूर पळत होते. युयुधनाच्या मारामुळें हैराण झालेले कौरव ज्यांत दुःशासन सुद्धा होता ते सुद्धा द्रोणांच्या संरक्षणात जातात.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे अठरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकोणीसावा

संजय पुढे सांगतो, दुःशासनाचा रथ त्यांच्याकडे येत आहे ते पाहून द्रोण त्याला बोलतात, "अरे दुःशासना तू असा युद्धातून पळून कां जात आहेस? राजा ठिक आहे नां? सिंधचा राजा मेला का जीवंत आहे? तू राजपुत्र आहेस कौरवांचा, तू राजाचा धाकटा भाऊ आहेस, तुला युद्धातून पळून जाणे शोभत नाही. तसे झाले तर युद्ध कोण करणार व कोणासाठी व कां? तू विसरतोस कीं तू युवराज आहेस. तुला आठवते कां, एकदा तू द्रौपदीला म्हणाला होतास कीं ती तुमची दासी आहे, तिने तिचे नवरे सोडून द्यावे, कारण काय तर ते नालायक आहेत, मग आता काय झाले तुला? त्यांच्या बरोबर तुम्ही युद्धाला आव्हान दिले आहे अशा परिस्थितीत तू युद्ध सोडून कसा पळतो आहेस? तुम्हीच पांडवांशी वैर प्रारंभ केले आहे ते सगळे जग जाणते. पांडवांचे सोडा, ह्या एकट्या सत्यकीशी तू लढू शकत नाहीस व त्या पांडवाना तू तीळातील कचर्याची उपमा देत होतास. आता कोण कचरा ते जगाला समजते आहे ह्याची लाज आहे कां तुम्हाला? जेव्हां त्या द्युताचे फासें तुम्ही टाकत होता तेव्हां तुम्हाला जाणीव होती कां कीं, ते फासें एक दिवशी धारदार विषारी बाण बनून तुमच्या अंगात घुसणार आहेत. त्या खेळाच्या वेळी तू किती अपमानास्पद बोलत होतास. त्या द्रौपदीने जे शाप तुम्हाला दिले आहेत ते तुम्ही आज भोगत अहात. तो रुबाब आता कोठे गेला? तो उद्धटपणा कोठे गेला? तू तुझ्या भावाचा मर्द बंधू आहेस मग असा कां फलून सारखा पळत आहेस? तुला माझ्या संरक्षणाची कां गरज वाटते, तुझे क्षात्रतेज कोठे गेले. तू पळत आहेस मग तुझ्यासाठी लढणार्यांनी काय करावे? त्यांने कां मरावे तुमच्यासाठी, मी कां लढावे तुमच्यासाठी? जर दुर्योधनाचा शूर भाऊ युद्धातून पळत आहे त्या ऐवजी तू खरेतर मरे पर्यंत लढले पाहिजे, तुझ्या भावासाठी. तू तुझ्या सैन्याला दाखवले पाहिजेस कीं, तू खरा योद्धा आहेस. त्या ऐवजी तू युद्धभूमी सोडून पळत आहेस ह्याचा अर्थ काय समजावयाचा? जर मुख्य राजे पळून लागले तर तुमच्या दोस्तानी कशाला मरावे अशा युद्धात? जा त्या योद्ध्याला एकट्याने तोंड दे. त्याच्यापुढे तुमची ही गत आहे तर मग

तो गांडीवधारी जेव्हां येईल तेव्हां तू काय करणार? त्याशिवाय भिमसेन, नकूल आणि सहदेव आहेत. जर तुम्हाला असे पळून जायचे असेल तर त्यापेक्षा युद्ध थांबवून पांडवांशी समझौता करावा व त्यांचे त्याना देऊन टाकावे. ते जर नाही केलेत तर ते पांडव तुमचे सगळे भाऊ ठार मारून टाकणार आहेत. तो भिम तुमच्या सैन्यात घुसून एकेकाला पकडून ठार मारणार आहे त्याचा विसर पडला कां तुला? युधिष्ठीर व कृष्णां पुढे जाऊन क्षमा मागून तहाची बोलणी करावीत. असे पळून काय उपयोग? तुला आठवत असेल कीं, भिष्म बोलत होते कीं, पांडव कधीही हरणार नाहीत कारण त्यांच्या बरोबर माधव आहे. जेथे नारायण आहे तेथे नेहमी विजय असतो. तरी तुम्ही ते मानले नाही. तुम्हाला वाटले कीं, पांडव वनवासात जाऊन बरबाद झाले आहेत तेव्हां त्यांना भिण्याची आवश्यकता नाही. परंतु, तुमचा अंदाज चुकला आहे हे लक्षात घे. म्हणून तू बर्या बोलांने परत फिर व त्या सत्यकीला सामोरी जा. जर तू तसे नाही केलेस तर तुझे सगळे सैन्य तुझ्याबरोबर पळून जाईल व तुमच्या पदरी नामुष्की येईल". द्रोणांचे ते बोलणे ऐकल्या न ऐकल्यासारखे करत दुःशासन परत फिरला त्याचे मोठे सैन्य घेऊन सत्यकी जेथे होता तेथे पोहोचतो. तेथे म्लेच्छ योद्ध्याना घेऊन तो प्राणपणाने लढतो. सत्यकीला मात्र तो हरवू शकत नाही. द्रोण त्यांचा रथ घेऊन पांचालांच्या सैन्याकडे जातात. तेथे असलेल्या पांचाल व पांडव फौजांशी त्यांचे युद्ध सुरू होते. द्रोण त्यांचे पारिपत्य करू लागतात. ते मोठा नरसंहार करतात. मत्स्य देशाचा युवराज वीरकेतू द्रोणांवर चाल करतो. द्रोणांवर तो बाणांचा वर्षाव करू लागतो. त्याचा ध्वज फाडतो. त्याच्या सारथ्याला जखमी करतो. पांचाल द्रोणांना चारही बाजूने वेढा देतात. द्रोणांवर जोराचा बाणांचा भडिमार सुरू करतात. ते पाहून चिडलेले द्रोण वीरकेतूवर एक तीक्ष्ण बाण मारतात. त्या बाणामुळें वीरकेतू मरतो. पांचालांचे सैनिक द्रोणांवर बाणांचा मारा चालू ठेवतात. त्यानंतर चित्रकेतू, सुधवन, चित्रवर्मन आणि चित्ररथ त्यांच्या भावाच्या मृत्यूमुळें फारच दुःखी झालेले दिसतात. ते सुडाच्या भावनेने द्रोणांवर बाणांचे वार करत असतात परंतु, त्याचा द्रोणांना कांहीं त्रास होत नाही असे दिसते. त्यानंतर द्रोण त्यांचा प्रतिकार सुरू करतात. त्यामुळें ते पांचालचे राजपुत्र बेहोष होतात. त्यानंतर द्रोण एकेका बाणाने त्या पांचालच्या राजपुत्रांची शीर तोडून टाकतात. जसे इंद्र दैत्यांची मुंडकी

उडवत होता. ते मेलेले युवराज जणू देव असावेत असे सुंदर दिसत होते. ते पाहून पांचाल व पांडव सैनिकांत हलकल्लोळ होतो. ते समजल्यावर त्यांचा भाऊ धृष्टद्युम्न संतापतो. त्याला त्याच्या भावांच्या मृत्यूचे फार दुःख होते तो डोळ्यातील अश्रू न पुसताच द्रोणांवर चाल करतो. जसें द्रोणांना धृष्टद्युम्न त्याच्या बाणांने व्यापतो तुमच्या गटातून मोठ्याने ओरडा ऐकू येऊ लागतो. तरी त्यांना त्या बाणांमुळें कांही झालेल नाही असे दिसते. त्यानंतर तो पांचाल पुत्र द्रोणांच्या छाताडावर अनेक बाण मारतो. त्यामुळें द्रोण मृच्छित होऊन पडतात त्यांच्या रथात. त्याला तसा पडलेला पाहून धृष्टद्युम्न त्याच्या रथातूनव उतरतो व द्रोणांच्या रथात चढतो. त्याच्या हातात एक तळपती तलवार असते. तो द्रोणांच्या अगदी जवळ जातो, तेवढ्यात द्रोणांना शुद्ध येते व ते त्या पांचाल पुत्राला त्यांच्या फार जवळ पहातात. तो पांचाल द्रोणांच्या फार जवळ होता कीं, कोणताही सामान्य बाण त्याच्यावर मारणे अशक्य होते. तशात द्रोण एक छोटा बाण काढतात व त्याच्यावर मारतात. त्या दोघांत द्वंद्व सुरू होते. जसे इंद्र व प्रह्लादात झाले होते त्या अतिप्राचीन काळी. त्यांच्या द्वंद्वात अनेक इतर योद्धेसुद्धा सांपडतात. ते भोवळ येऊन पडतात. ते द्वंद्व पाहून तेथे असलेले सगळे क्षत्रिय वहाव्वा वहाव्वा असें कौतुकाचे उद्गार काढतात. कौरव बोलू लागतात कीं, आता दृष्टद्युम्न द्रोणांना मारणार कारण तसे भविष्य आहे. परंतु, त्यानंतर द्रोण पांचालपुत्राच्या सारथ्याचे डोके उडवतात. त्यानंतर त्याचे घोडे मारतात. त्यामुळें धृष्टद्युम्न रणभूमी सोडून जातो. द्रोण त्यानंतर तेथे असलेल्या पांचाल व श्रींजय फौजांचे शिरकांड सुरू करतात. अशारितीने पंडुच्या पक्षाचा व पांचालांचा पराभव केल्यावर ते कौरवांचे सरसेनापती त्यांच्या पलटणीमध्ये जातात. त्यानंतर पांडव त्यांच्या वाटेला जात नाहीत त्या दिवशी.
जयद्रथ वध पर्व भाग एकशे एकोणीसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे विसावा

संजय पुढे सांगतात, त्या सुमारास दुःशासन युयुधनावर चालून जातो. पावसाप्रमाणे त्याचे बाण सत्यकीवर पडत असतात. प्रथम साठ व नंतर सात बाण तो मारतो पण त्याचा कांहीच परिणाम होत नाही. सत्यकी मैनक पर्वतासारखा स्थीर ताठ उभा होता. सत्यकीचे बाण कौरवांच्या फौजांवर कोसळत होते तरी त्या फौजा त्याला घेरण्याचे काम दुःशासनाच्या नेतृत्वाखाली करत होतेच. त्यातील कांहीं तुमचे सैनिक मात्र घाबरून पळून जात होते तुमच्या मुलाच्या समक्ष. दुःशासन सत्यकीवर असंख्य बाण मारतो त्याशिवाय त्याचे घोडे व सारथी तो जखमी करतो. ते केल्यानंतर तो कौरव मोठ्याने गर्जना करतो. त्यामुळे संतापलेला माधव दुःशासनाचे सर्वस्व त्याच्या बाणांने अदृष्य करतो. जसे कोळी त्याच्या जाळ्यात माशीला गुंडाळतो तसा दुःशासन त्या बाणात गुंतला गेला होता. दुःशासनाचे ते हाल पाहिल्यावर दुर्योधन त्रिगर्ताच्या लोकांना युयुधनाकडे जाण्यास सांगतो. ते त्रिगर्ताचे इमानदार योद्धे युयुधनाला वेढा देतात. युयुधन त्यांच्या आघाडीचे पांचशे योद्धे गारद करतो एका फटक्यात. त्यांच्या बरोबर असलेले हत्तीसुद्धा मोठ्या प्रमाणात जखमी होतात. सगळीकडे मेलेले घोडे माणसे ह्यांचा खच पडला होता. त्यांचे सोन्याचे कपडे सूर्याच्या उन्हात चमकत होते. युयुधनाचे अंगसुद्धा त्याच्या रक्ताने भरलेले होते. त्यानंतर ते सगळे तुमचे योद्धे संरक्षणासाठी द्रोणांच्या रथाकडे जातात. ते सोडून सत्यकी धनंजयाकडे निघतो. त्याच्या मागून दुःशासन त्याच्यावर पांच बाण मारतो जे युद्धाच्या नियमांनुसार चुकीचे होते. दुःशासन त्याचे बाण मागून मारत असतांना सिनीचा नातू त्याच्यावर हल्ला करतो त्याचा तिरकमटा मोडून टाकतो. ते केल्यावर तुच्छपणे तुमच्या मुलाकडे पहात तो पांडव धनंजयाकडे जाऊ लागतो. परंतु, दुःशासन त्याचा पिच्छा सोडत नाही. तो एक लोखंडी शर त्याच्यावर फेकतो. सत्यकी तो शर तोडून टाकतो, तो व्यर्थ जातो. तुमचा मुलगा पुन्हा नवीन धनुष्य घेतो व सत्यकीवर वार करत रहातो. सत्यकी त्याला तोड देत पार्थाच्या दिशेने जातच असतो. दुःशासनाचे सगळे प्रयत्न त्याला थांबवण्याचे व्यर्थ

जातात. तो ऐकत नाही असें दिसल्यावर सत्यकी त्याच्या छातीत तीन जबरदस्त बाण मारतो. त्यानंतर तो दुःशासनाचे घोडे मारून टाकतो व त्यामुळे त्याचा रथ बंद पडतो. त्याच्या रथाची मोडतोड करतो, त्याचा ध्वजस्तंभ पाडून टाकतो. त्याचे मुख्य व सहायक सारथी तो मारून टाकतो. त्यानंतर रथ गेलेला दुःशासन त्रिगर्ताच्या रथात चढतो. सत्यकी कांहीं काळ त्याच्या मागावर रहातो कीं, तो आणखीन काय करतो ते पहावे परंतु, नंतर दुःशासन हा भिमाची शिकार आहे ते लक्षात आल्यावर युयुधन त्याचा नाद सोडून धनंजयाकडे जाणे जास्त श्रेयस्कर समजतो व त्या दिशेने जाऊ लागतो. भिमांने तुमचे सगळे पुत्र ठार मारण्याची प्रतिज्ञा घेतली आहे त्याची आठवण त्याला होते.
जयद्रथ वध पर्व भाग एकशे विसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकविसावा

धृतराष्ट्र विचारतात, "अरे संजया मला सांग, माझ्या एवढ्या सैन्यात एकही असा योद्धा नव्हता जो सत्यकीचा मुकाबला करू शकेल? सिनीचा नातू इंद्रासारखा सामर्थ्यवान आहे हे समजते. त्याने असंख्य योद्धे मारले आहेत माझे काय हे आमचे दुर्भाग्य म्हणावयाचे कां? त्या अवाढव्य रणभूमीमध्ये हा एकटाच कशा जात होता सगळ्यांना मारत"?

संजय पुढे सांगतो, अहो महाराज, तुमच्या सैन्याचा गदारोळ असा होता जणूकाय युगांत येऊन ठेपला आहे. तुमच्या सैन्याची शिरगणती केली तर असें दिसून येईल कीं पृथ्वीवर इतके मोठे दुसरे सैन्य नसेल. जे देव आणि चरण ते युद्ध पहात होते ते बोलतात, असे युद्ध व्युह व त्याचे इतके चांगले व्यवस्थापन आधी कधी त्यांनी पाहिलं नव्हते. त्यावरून द्रोणाचार्यांचे युद्ध कौशल्य सिद्ध होत होते. जयद्रथाला वाचवण्यासाठी ती व्यवस्था होती. त्यात असंख्य राजे व त्यांची सैन्ये एकत्र काम करत होती. त्यांची संस्कृती विविध होती, भाषा वेगवेगळ्या होत्या तरी ते एकत्र एकसंधपणे काम करत होते हे विलक्षण आहे असें ते बोलत होते. त्या लढणार्या योद्ध्यांचे ओरडणे सागरातील लाटांच्या गदारोळा सारखे होते. भिमसेन, धृष्टद्युम्न, नकूल, सहदेव राजा युधिष्ठीर मोठ्याने ओरडत होते, "धरा, पकडा, मारा, हल्ला करा". त्यावेळी धनंजय व कृष्ण त्या शत्रूच्या परिसरात शिरत होते. ते त्यांच्या योद्ध्याना सांगत होते कीं, असे करा कीं, त्या दोघांना विनासायास जयद्रथापर्यंत जाता येईल. जर सत्यकी व अर्जुन ते मारू शकले तर ते कौरवांसाठी मोठी कमाई ठरेल. आपल्यासाठी पराभवाची नांदी ठरेल. त्या आदेशाचे पालन पांडवांचे लष्कर करत होते. त्यांचे नेतृत्व भिमाकडे होते. त्याशिवाय पांचालांचे राजपुत्र होते. कौरवसुद्धा जीवाची बाजी लावून जयद्रथाला वाचवण्याचा प्रयत्न करत होते. त्यात येणार्या मरणामुळे त्यांना स्वर्गात प्रवेश मिळणार म्हणून कांहीं बिनधास्तपणे लढत होते. त्या क्षत्रियांना ती पर्वणी वाटत होती. त्या लढाईत सगळ्यांना बाद करून सत्यकी अर्जुनापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. दोनही बाजूचे आपापल्या कर्तृत्वाचे प्रदर्शन करत होते. दुर्योधन पांडवांच्या फौजांना

विभक्त करण्यात गुंतला होता. दोनही बाजूंचा नरसंहार होत होता. त्याची कोणाला पर्वा नव्हती कारण जे मेले ते स्वर्गात गेले होते असें ते समजत होते.

धृतराष्ट्र बोलतात, "जसे पांडवांचे सैन्य आघाडीवर जात होते माझ्या मुलाची काय मनस्थिती होती ते मला सांग. मला आशा आहे कीं, तो युद्धातून पळून जाण्याचा विचार करत नव्हता. ती लढाई ज्यात एक योद्धा अनेकांना तोंड देत आहे मला एक राजा म्हणून अन्यायकारक वाटते. माझी मुलं आरामात व वैभवात वाढलेली आहेत. आता तो दुर्योधन राजासुद्धा झाला आहे, तो अनेकांना कधी एकटा तोंड देऊ शकेल असे मला वाटत नाही".

संजय सांगतो, जरा ऐका, त्या एक विरुद्ध अनेक अशा लढाईचे वृत्त. पांडवांचे सैन्य दुर्योधनाने हलवले होते. जसे उन्मत्त हत्ती सरोवरात असलेल्या फुलावर आलेल्या कमळांच्या दांड्यांना हलवतो. पांडवांचे सैन्य पराभूत होत आहे ते पाहून भिम तेथे जातो. त्याबरोबर दुर्योधन त्याला दहा बांणांने भोसकतो. नकूल व सहदेवांना प्रत्येकी सहा मारतो. धृष्टद्युम्नाला वीस मारतो. द्रौपदीच्या मुलांना प्रत्येकी पांच मारतो. शिखंडीला शंभर मारतो. त्याशिवाय पांडवांचे हत्ती व घोडेसुद्धा तो पुष्कळ मारतो. त्याच्या काम करण्याच्या पद्धतीवरून समजत होते कीं, त्याचे शस्त्रांचे ज्ञान पूर्ण आहे. ते स्वतः भोवती गोल फिरत निशाणं साधत होता. त्यावेळी युधिष्ठीर दोन बाण मारून तुझ्या मुलाचे धनुष्य तोडून टाकतो. त्यानंतर दहा जोरदार बाण मारतो दुर्योधनावर. परंतु ते बाण दुर्योधनाच्या चिलखताला लागतात व तुटून पडतात. त्यावेळी पार्थ मोठ्या कौतुकांने युधिष्ठीरा भोवती जमा होतात. जसें इंद्राभोवती देव वृत्राच्या वधाच्या वेळी जमले होते. तुझा शूरवीर मुलगा नवीन धनुष्य घेतो व युधिष्ठीराला बोलतो, "थांब, थांब", त्यानंतर त्याच्यावर चालून जातो. पांचालांचे योद्धे त्याला अडवण्यासाठी पुढे होतात. त्यांच्याच धुमश्चक्री युद्ध होते. असे भीषण युद्ध पाहिले नाही असें आकाशातील प्रेक्षक सांगत होते. मोठ्या प्रमाणात संहार होतो. जणूकाय युगांत आला आहे. त्याच वेळी जेथे धनंजय होता तेथे मोठी आरडाओरड ऐकू येते. तेथे जयद्रथाला संरक्षण देणारे व अर्जुन ह्यांच्यात युद्ध होत होते. ते अर्जुनाला अडवण्याचा प्रयास करत होते. अशारितीने ते पांडव कौरव युद्ध होत होते. एका बाजूला अर्जुन व तुझे सैन्य लढत होते

व दुसर्या बाजूला सत्यकी व तुझे सैन्य लढत होते.  एक विरुद्ध अनेक असे ते जगावेगळे युद्ध होत होते.

त्यात वेळी द्रोण पांडवांच्या सैन्याशी लढत होते.  नरसंहार मोठ्या प्रमाणात होत होता.

त्यात अर्जुन,  द्रोण व सत्यकी असें तिघे क्रोधीत होऊन आपापल्या शत्रूंचा नाश करण्यात गुंतले होते.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे एकविसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे बाविसावा

संजय पुढे सांगतो, त्या दिवशी दुपारच्या सुमारास द्रोण व सोमक ह्यांच्यात तुंबल युद्ध झाले. त्यांच्या लाल रंगाचे घोडे असलेल्या रथातून ते पांडवांच्या फौजांवर तुटून पडतात. त्यांने जे काम त्यांच्या धन्याने दिले ते तो ब्राह्मण प्रामाणिकपणे करत होता. तो त्याच्या धारदार बाणांने अनेक योद्ध्यांचा बळी घेत जणू खेळत होता त्या रणभूमीत. त्यावेळी कैकेया घराण्याचा कुलदीपक बृहतक्षत्र जो त्याच्या युद्धकला नैपुण्याबद्दल ख्यातनाम होता, द्रोणांना आडवा जातो. जसे गंधमादन पर्वतावर पाऊस पडतो तसे बाण तो द्रोणांवर फेकत होता. त्यामुळे द्रोणांना राग येतो व ते नेमके बाण त्याच्यावर मारतात. परंतु, तो कैकेया राजपुत्र ते बाण हवेतच तोडून टाकतो. त्यानंतर पांच बाण द्रोणांवर फेकतो. त्याची चपळता पाहून द्रोण त्याच्यावर आठ बाण मारतात. ते सगळे बाण बृहतक्षत्र हवेतच नष्ट करतो. पुन्हा तो द्रोणांवर बाणांची एक फेरी झाडतो. ते सहन न झाल्याने द्रोण त्याच्या हातावर बाण असा मारतात कीं त्याचे चिलखत फाटते. त्यानंतर दुसरा मारतात जो त्याच्या अंगातून जाऊन खाली जमिनीवर पडतो. त्यामुळें त्याचा राग अनावर होतो व तो त्यांच्यावर सत्तर बाण फेकतो. त्यानंतर तो द्रोणांच्या सारथ्याच्या वर्मी बाण मारतो, ते पाहून द्रोण त्याच्या रथावर अनेक बाण मारतात. त्याचे चारही घोडे मरतात. त्याची छत्री मोडून जाते. त्याच्या रथाची चाकं आंसातून सुटी होतात. आणखीन एक बाण त्याच्या छातीत मारतात. तो खाली पडतो. त्याचा मृत्यू झालेला पाहून शिशुपालाला संताप होतो. तो त्याच्या सारथ्याला सांगतो, "अरे सुता, द्रोणांकडे रथ घेऊन जा". ती आज्ञा ऐकल्याबरोबर तो सारथी त्यांचा रथ द्रोणांच्याजवळ नेतो. त्याच्या रथाला कंबोज प्रजातीचे उत्तम घोडे लावलेले होते. त्यावेळी छेड्डींचा धृष्टकेतू त्याच्या ताकदीचा गर्व असलेला द्रोणांवर चाल करून जातो. जणू त्याला आता मरावयाचे होते. तो द्रोणांवर व त्याच्या ध्वजावर साठ बाण मारतो. ते झाल्यावर द्रोण त्याचे घोडे मारतात. त्याचे धनुष्य मोडतात, त्यानंतर तो महारथी नवीन धनुष्य घेऊन द्रोणांवर बाणांचा मारा करतो. द्रोण त्यानंतर त्याचे घोडे ठार

मारतात त्याच्या सारथ्याला मारतात. त्यानंतर धृष्टकेतूलासुद्धा कांहीं बाण मारतात. ते बाण तो चुकवतो व रथातून उडी मारून खाली येतो, हातात गदा घेऊन ती द्रोणांवर जोरांने फेकतो. द्रोण ती गदा त्यांच्या बाणांनी तोडून टाकतात. ती गदा तुकडे होऊन जमिनीवर पडते. त्यामुळे गोंधलेला धृष्टकेतू तलवार फेकतो. त्याशिवाय कांहीं शर मारतो. द्रोण ते सगळे त्यांच्या बाणांनी व्यर्थ ठरवतो. द्रोणांचा नाश करण्यासाठी लढणार्या दृष्टकेतूवर द्रोण एक शर फेकतात. ते त्याच्या चिलखतात घूसून मग मातीत जाऊन पडते. द्रोण त्याचा पराभव करतात. छेड्डीच्या राजाचा मृत्यू होतो. त्यामुळें त्याचा मुलगा पुढे होतो. त्यालासुद्धा द्रोण यमाकडे त्वरित पाठवतात. अशा आघातांमुळे पांडवांचे बळ कमी होत असते. त्यावेळी जरासंधाचा मुलगा द्रोणांवर चाल करतो. त्याच्या बाणांच्या भडिमारामुळें द्रोण दिसेनासे होतात. द्रोण त्याच्यावर अनेक बाण मारतात. त्यानंतर लवकरच द्रोण त्या जरासंधाच्या मुलाला यमाकडे पाठवतात. जे त्यांच्याशी द्वंद्व करण्यासाठी गेले त्या सगळ्यांना ते यमाकडे पाठवत असतात. त्यानंतर द्रोण त्यांच्या नावाचा घोष करत पांडवांवर बाणांचा हल्ला करत रहातात. त्या प्रत्येक बाणांवर त्यांचे नांव कोरलेले होते. त्या लहान मोठ्या बाणांने अनेक हत्ती, घोडे, पायदळीतील सैनिक असे बरेच जण मारले जातात व त्यात दोनही बाजूचे नुकसान होते. पांचालांचे विशेष नुकसान होते व ते भांबावून जातात. त्यांना समजत नाही द्रोणांना कोण आवरणार? तरी त्यांच्यातील क्षात्रतेज यत्कींचितही कमी झालेले नव्हते. तो छेड्डी, पांचाल, श्रींजय काशीस, कोसल मोठ्या जोमांने द्रोणांना घेरतात. त्यांच्यावर बाणांचा मारा चालू करतात. ते सगळे एकमेकांना बोलत असतात कीं, "द्रोणाचा वध झाला पाहिजे, द्रोणाचा वध झाला पाहिजे". ते सगळे योद्धे त्यांच्या शौर्याची पराकाष्ठा करण्याचा निश्चय करतात. कांहीं करून त्या ब्राह्मणाला यमाकडे पाठवावयाचेच असा निर्धार ते करतात. द्रोण मात्र त्यांच्या बाणांने एकेक करून त्यां योद्ध्याना यमाकडे पाठवत असतात. विशेषकरून छेड्डींचे जास्त मारले जातात. त्यांचा सर्वनाश केला जात होता. ते भिमसेनाला, धृष्टद्युम्नाला बोलावतात. ते बोलतात, "ह्या ब्राह्मणाला त्याच्या तपस्येमुळें जे तेज प्राप्त झाले आहे त्यामुळे आमचे त्याच्यापुढे चालत नाही. आम्ही क्षत्रिय लढण्यासाठी जन्मतो. परंतु, ब्राह्मणांचे

तपस्येतून प्राप्त झालेले तेज आम्हाला नाही कारण, साधारणपणे क्षत्रिय तेवढी तपस्या करत नाहीत. म्हणून द्रोणांना आम्ही हरवू शकत नाही. तेंच शस्त्र जेव्हां तपस्या केलेला ब्राह्मण वापरतो तेव्हां त्याला जे बळ असते ते क्षत्रियांच्याना येत नाही कारण, त्यांच्याकडे ब्राह्मणांइतके तपस्येचे तेज नसते. परंतू, पांडव असे क्षत्रिय आहेत कीं, त्यांनी वनवासाच्या काळात मोठे तप केले आहे जे ब्राह्मणांच्या बरोबरीचे किंवा त्याहूनही जास्त प्रभावी आहे म्हणून युयुधन, अभिमन्यू, भिमसेन, नकूल, सहदेव आणि धनंजय इतर क्षत्रियांपेक्षा जास्त चांगले लढवय्ये सिद्ध होतात. म्हणून ते त्यांच्या नावांने हांका मारत असतात. ती त्यांची ओरड ऐकून क्षत्रधर्मन जो क्षत्रिय धर्माचे पालन यथास्थीतपणे करणारा आहे, येतो व द्रोणांचे बाण व धनुष्य तोडून टाकतो. ते पाहून द्रोणांना त्याचा राग येतो. ते एक नवीन मोठे व मजबूत धनुष्य घेतात, ते जोरांने कानापर्यंत ताणतात, क्षत्रधर्मनावर सोडतात. क्षत्रधर्मन त्याच्या फटक्याने खाली कोसळतो, मरतो तो धृष्टद्युम्नाचा मुलगा असतो. ते झाल्याने पांडवांचा धीर खच्ची होतो. त्यांना समजत नाही ह्या ब्राह्मणाला कसे आवरावयाचे. त्यानंतर चेकितन द्रोणांवर घसरतो त्यांच्यात द्वंद्व होते. चेकितन द्रोणांचे चारही घोडे मारून टाकतो. त्याच्या सारथ्याला घायाळ करतो. त्याच वेळी द्रोणांच्या छातीत बाण मारतो दहा. त्यानंतर द्रोण त्याच्यावर सोळा बाण मारतात. त्याच्या सारथ्याला सात बाण द्रोण मारतात. सारथी मेल्यामुळे चेकितनाचे घोडे सैरावैरा पळत सूटतात. द्रोण त्यानंतर पांचालांच्या व श्रींजयांच्या बरोबर युद्ध करतात ते पहाण्यासारखे होते. त्यावेळी द्रोण पंच्याऐंशी वर्षाचे होते. त्यांचा वर्ण सावळा होता. त्यांच्या डोक्यावर व्यवस्थितपणे बांधलेल्या पांढर्या शूभ्र जटा होत्या. त्यात त्यांचे कान झाकलेले होते, वयाच्या सोळाव्या वर्षापासून ते धनुर्विद्येत गुंतलेले होते, ते ह्या युद्धात बेडरपणे लढत होते व कित्येक युवकांना पाणी पाजत होते, कित्येकांना यमाकडे धाडत होते. त्यांना इंद्राच्या बरोबरीचे समजले जात आहे. तो ब्राह्मण क्षत्रियांना भुकेल्या वाघाप्रमाणे खात होता. दुर्योधनाच्या नावावर ते सगळे पाप जात होते कारण, तो ब्राह्मण त्याच्या आज्ञेने ते विध्वंस करत होता. दुर्योधन कोणत्या खालच्या लोकांत जाणार आहे ते समजत नाही. क्षत्रियांच्या इमानदारीचा ज्या पद्धतीने दुर्योधन फायदा उठवत आहे त्यावरून त्याचे पाप

अमाप झाले आहे.  असें बोलून द्रुपद राजा त्याच्या अक्षौहिणी सैन्यासह द्रोणांकडे जाऊ लागतो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे बावीसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे तेविसावा

संजय पुढे सांगतो, द्रोणांच्या विक्राळ अवतारामुळे पांडवांचे सैन्य व त्याबरोबर त्यांचे दोस्त रणभूमीत थोडे पाठी सरकलेले होते. त्यात पांचाल, सोमक, श्रींजय, पार्थ होते. त्या युद्धाच्या काळात जे घडत होते त्यामुळे पहाणार्यांचे अगावरील केस शहारल्यासारखे ताठ होत होते. जो नरसंहार होत होता ते पाहून काळजाचे ठोके चुकत होते. जसे युगांत होत आहे असे वाटत होते. द्रोण मोठ्या मोठ्याने आव्हानात्मक गर्जना करत होते. पांचालांचा विध्वंस होत होता, पांडवांचे हत्याकांड होत होते त्यावेळी युधिष्ठीर काळजी करत होता कीं, अशा परिस्थितीत काय करावयाचे. त्याला सतत सव्यसाचीची आठवण येत होती. परंतु, त्या जागी धनंजय व कृष्ण दोघे उपलब्ध नव्हते परिस्थिती सावरायला. कपीधारी रथ दिसत नव्हता, त्याच्या गांडीवाचे टणत्कार ऐकू येत नव्हते. राजा युधिष्ठीर चिंताक्रांत झाला होता. त्याला सत्यकी सुद्धा कोठे दिसत नव्हता. त्याची काळजी पराकाष्ठेला पोहोचली होती. युधिष्ठीराला युयुधनाची काळजी वाटू वागली कारण त्याला त्यांने अर्जुनाच्या संरक्षणासाठी पाठवले होते. तो विचार करतो कीं, सुरूवातीला त्याला फक्त एकाचीच चिंता होती आता त्याला दोघांची चिंता वाटत होती. मला त्या दोघांच्या सुखरुपतेची वार्ता मिळाली पाहिजे. तो विचार करतो, त्याने सत्यकीला अर्जुनाचा मागोवा घेत जाण्यास सांगितले, आता सत्यकीचा मागोवा घेऊन कोणाला पाठवू असा प्रश्न तो स्वतःला विचारत होता. जर कोणत्या प्रकारे त्यांची माहिती मिळाली तर बरे असा तो विचार करत असतो. मी जर ते केले नाही तर जग माझ्या तोंडात शेण घालील. म्हणून मी वृकोदराला पाठवून त्या दोघांची माहिती काढली पाहिजे. माझे प्रेम जितके अर्जुनासाठी आहे तितकेच युयुधनासाठी सुद्धा आहे. तो सिनीचा नातू केवळ आमच्या प्रेमापोटी कौरवांचा विध्वंस करत होता हे मी कसे बरे विसरेन. मला आठवते तो आवाज जेव्हां कौरवांचे सैन्य त्याच्यावर तुटून पडले होते. म्हणून मला वाटते कीं, धनुष्य बाणाने तयार असा भिम त्यांच्या शोधासाठी गेला पाहिजे. ह्या पृथ्वीवर असे कांहीं नाही जे भिमास मारू शकेल.

जर तो ठरवेल तर तो सगळे जग पादाक्रांत करून टाकील. सगळे त्याच्या मनावर असते. त्याच्या कुवतीला मर्यादा नाहीत. तो कधीही युद्धात हरलेला नाही. जर तो त्यांना भेटला तर ते तिघे म्हणजे मोठी शक्ती होईल त्यासाठी वृकोदराला पाठवणेच प्रशस्त होईल. त्यात त्यांच्या बरोबर आपला वासुदेव आहेच. म्हणजे माझी विवंचना संपुष्टात येईल. तेव्हां मी भिमसेनाला सत्यकीच्या मागोव्यात पाठवणे श्रेयस्कर ठरेल. तसे झाले म्हणजे माझी व्यवस्था उत्तम झाली असें मला समजता येईल. अशारितीने तो कुंतीचा मोठा मुलगा विचार करत असतो. तो सारथ्याला बोलवतो व सांगतो, "अरे सुता, आपण आता भिमसेनाकडे जाणार आहोत". ते ऐकल्यावर सारथी त्यांचे घोडे त्या दिशेने वळवतो. ते लवकरच भिमाच्या ठिकाणी पोहोचतात. तेथे पोहोचल्यावर पुन्हा त्याला गहिवर येतो त्यांच्या आठवणीने. तो मोठ्या मुष्कीलीने बोलतो, "अरे कुंतीपुत्रा, भिमा, अरे मला अर्जुनाचे झेंडे दिसत नाहीत. त्याच प्रमाणे सत्यकीचे सुद्धा दिसत नाहीत". ते त्याचे बोलणे ऐकून भिम त्याला विचारतो, "मी तुला अशारितीने रडत बोलतांना आधी कधी पाहिलेले नाही, मामला काय आहे? पूर्वीच्या काळी जेव्हां आम्ही दुःखी होत असू तू आमचे सांत्वन करत असें आणि आता हे काय मी पहात आहे"? युधिष्ठीर त्याला बोलतो, "मला गांडीवाचे टणत्कार किंवा पांचजन्य शंखूचा नाद ऐकावयाला येत नाही म्हणून मनात नको त्या शंका येत आहेत. हे आधी होत होते म्हणून मी सत्यकीला त्यांच्या शोधात पाठवले तर त्याचासुद्धा कांही सुगाव राहिलेले नाही. म्हणून माझ्या मनात काही वाईट येत आहे. त्यांचे कांही बरेवाईट तर नाही झाले, अशी शंका माझ्या मनाला खात आहे. त्याच्या बरोबर कृष्ण आहे तरी, मन चिंती ते वैरी न चिती, असे म्हणतात तसा प्रकार माझ्या बाबत होत आहे. कृष्णाच्या असण्यामुळे तसे कांहीं होईल असे समजणे सुद्धा गैर आहे तरी आपण शोध घेतला तर काय बिघडले"? ते सिंधच्या राजाच्या शोधात गेले आहेत व त्याची प्रतिज्ञा तुला माहीत आहे. आता पहा सूर्य मावळतीकडे वेगांने झुकत आहे. जर त्याला जयद्रथ नाही मिळाला तर अनर्थ होणार आहे, त्याची तुला कल्पना आहेच. तो आपला भाऊ सावळ्या रंगाचा, लाल डोळे असलेला, रुंद छाती असलेला, कुरळे केस मानेवर सोडलेला, असा देखणा भाऊ जो शत्रूच्या मनात भिती पेरतो तो आपण कोठे आहे ते

शोधले पाहिजे. त्याच्या दर्शनाशिवाय मला कांहीं सुचणार नाही. मी त्यांना नाही पाहिले तर बेहोष होईन. मला भिती वाटते कीं, तो तरूण सतवत घराण्याचा कुलदीपक कोठे गायब झाला आहे. त्याला द्रोणांनी कांहीं केले नसेल नां? ते दोघे सामर्थ्यवान आहेत तरी शोध घ्यावयाला काय हरकत आहे? जर तुला वाटत असेल की मी तुझा मोठा भाऊ आहे व माझे ऐकावयाला पाहिजे, तर तू त्यांचा शोध घेण्यासाठी निघशिल". सत्यकी माझ्या सांगण्या वरून अर्जुनाचा शोध घेण्यासाठी गेला आहे तो सुद्धा कोठे गेला ते पहावयाचे आहे. तो आपल्याला धनंजया इतकाच प्रिय आहे. ते दोघे ज्या मार्गाने गेले त्या मार्गाने जाणे सोपे नाही. त्यांची खबर मला कली पाहिजे. तू तुझ्या बरोबर तुझे प्रामाणिक सेवक घेऊन निघ. ते भेटले कीं, तू मोठ्याने गर्जना करून मला ती खबर दे. जयद्रथ वध पर्व भाग एकशे तेविसावा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे चोविसावा

भिम ते ऐकून युधिष्ठीराला बोलतो, "ज्या रथातून पूर्वी ब्रह्म आणि इशान व इंद्र आणि वरुण युद्धासाठी गेले होते त्या रथातून आज दोन कृष्ण गेले आहेत. त्याना कसलेच भय नसते. तरी मी जातो परंतु, तू काळजी करत बसू नकोस. त्यांचे दर्शन झाल्यावर मी तुला संदेशा पाठवीन". असें बोलून तो जाण्याच्या तयारीला लागला.

संजय पुढे सांगतो, तयारी करत असतांना तो वेळोवेळी युधिष्ठीर व धृष्टद्युम्नाशी तसेंच इतर पांडवांशी संभाषण करत असतो. तो महाबली पांडव धृष्टद्युम्नाला बोलतो, "प्रिशताच्या मुला, माझे त्या दोघांना शोधण्यासाठी जाणे युधिष्ठीराच्या संरक्षणापेक्षा जास्त महत्वाचे निश्चितच नाही. परंतु, त्याने आज्ञा केली आहे म्हणून मला जावे लागत आहे. मी त्याला नाही म्हणू शकत नाही. मी तेथे जाणार आहे जेथे सिंधचा राजा लपला आहे मरण्यासाठी. मी पूर्ण विश्वासाने अर्जुन व सत्यकी ह्यांच्या शोधात जात आहे. म्हणून आता तुझी जबाबदारी आहे राजाच्या संरक्षणाची. सगळ्या जबाबदार्यांमध्ये ती सर्वात मोठी आहे हे लक्षात घेऊन असावे". ते ऐकल्यावर धृष्टद्युम्न त्याला सांगतो, "मी ते सगळे करणार आहे जे तू माझ्याकडून अपेक्षित आहेस. तू बिनधास्तपणे त्यांचा शोध घेण्यासाठी जा. द्रोण तुझ्या गैरहजेरीत राजाला कैद करू शकणार नाही". ते सगळे व्यवस्थित ठरल्यावर अर्जुन व सत्यकी ह्यांना शोधण्यासाठी भिम निघतो. त्यावेळी युधिष्ठीर भिमाला आलिंगन देतो. त्याच्या माथ्याचे चुंबन घेतो. युधिष्ठीराला एक प्रदक्षिणा करून व आठ शुभ लक्षणी गोष्टींना स्पर्श करून व मध, दही चाखून तो निघतो. त्यावेळी त्याचे डोळे लाल झालेले होते. त्यावेळी ब्राह्मण विधी करतात ज्यामुळें दैवी शक्ती त्याला संरक्षण देण्यास बांधल्या जातात. ते केल्यानंतर त्याला खात्री झाली कीं, तो त्याच्या त्या कामात निश्चितपणे यशस्वी होणार. तो त्याचे कवच अंगावर घालतो. हातात चामड्याचे हातमोजे घालतो. त्याच्या रथात चढतो. तो त्या स्वारीसाठी निघणार तेवढ्यात त्यांना पंचजन्य शंखाचा मोठा आवाज दूरून ऐकू येतो. ते ऐकून युधिष्ठीर भिमाला बोलतो, "ते पहा, कृष्ण व अर्जुन मदतीसाठी

पुकारत आहेत असें मला वाटते. माझी खात्री आहे कीं, ते कोणत्या तरी मोठ्या संकटात पडले असावेत. म्हणून तू त्वरा कर व तेथे जा. भिम त्याचे शंखू वाजवतो व अखेरीस त्यांना शोधण्यासाठी निघतो. त्याने त्याचे धनुष्य सज्ज ठेवलेले होते. त्यांचा रथ वेग घेतो. त्याचा सारथी अशोक असतो. तो पुढे जाताना शत्रूच्या फौजांवर बाणांचा मारा करत असतो. त्याच्या मागून शूरवीर पांचाल व सोमक जात होते. जसे स्वर्गात इंद्राच्या मागून देव जातात. भिमाच्या वाटेत तुमची मुलं आडवी येतात. त्यात दुःशासन, चित्रसेन, कुंढभोदी, विविंसती, दुर्मुख, दुःसाह, सल, विंद, अनुविंद, सुमुख, दीर्घबाहू, सुदर्शन, सुहस्त, सुशेना, दूर्विमोचन होते. त्यांच्या सैन्यासह ते त्याच्यावर चाल करतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करत तो द्रोणांकडे जातो. द्रोणांची हत्ती पलटण तो बाणांच्या माराने नष्ट करतो. जेव्हां सरभ (एक भयंकर प्राणी ज्याला सहा पाय होते, ती प्रजाती आता कालवश झाली आहे) येतात तेव्हां हत्तीसुद्धा पळून जातात तसे होत होते. ते केल्यावर तो द्रोणाकडे पोहोचतो. तेथे द्रोण त्याला अडवतात. ते भिमाच्या कपाळावर बाण मारतात. त्यांना वाटते कीं, भिम त्याना सन्मानाने वागवेल जसे अर्जुन करत असें, ते वृकोदराला बोलतात, "अरे भिमसेना, माझ्या क्षेत्रात तू प्रवेश करू शकणार नाहीस. कृष्ण व अर्जुन आधी माझ्या परवानगीने गेले होते. परंतु, तसे तू जाऊ शकणार नाहीस. ते त्यांचे आव्हानात्मक बोलणे भिमाला रुचले नाही. तो संतापतो, तो त्या ब्राह्मणाला बोलतो, "अरे भिकाड्यां ब्राह्मणा, ते तुझ्या मर्जीने गेले असे नाही. तो माझा बंधू अजिंक्य आहे त्याला कोणाची परवनगी लागत नाही. त्यांने तुम्हाला मान दिला कारण, तुम्ही त्याचे एके काळचे गुरू होता. परंतु, मी तसा श्रद्धावान नाही कीं, तुम्हाला मान देईन. मी भिमसेन आहे, आम्ही तुम्हाला आमच्या पित्याच्या, गुरूच्या व मित्राच्या जागी पहात आलो आहोत. आम्ही तुमचे मुलगे आहोत. त्या विचारसरणीमुळे आम्ही आपल्याला नेहमी मानात वागवत आलो आहोत. परंतु, ज्या भाषेत तुम्ही आज माझ्याशी बोलत अहात, मला वाटते त्या गोष्टींत बदल करण्याची आवश्यकता आहे. तुम्हाला जर आमच्याशी शत्रूत्व करावयाचे असेल तर मी त्यासाठी तयार आहे. ह्यापुढे मी आपल्याशी तसा वागेन जसे एका शत्रूंशी वागतात. तसे बोलून भिम गदा द्रोणांवर फेकतो. परंतु, द्रोण त्वरित

रथातून उडी मारून खाली उतरतात त्यामुळे वाचतात. ते जर केले नसते तर द्रोण त्या गदेच्या फटक्याने चिरडले गेले असते. असे सांगण्याचे कारण त्या गदेच्या फटक्याने द्रोणांचा रथ मातीत त्याच्या घोडे व सारथ्यासह रुतला. त्यानंतर तो द्रोणांचे अनेक योद्धे चुरडून टाकतो. त्यानंतर तुमचे मुलगे पुन्हा भिमाला घेरतात. द्रोण दुसर्या रथात चढतात. ते व्युहाच्या द्वाराकडे जातात. भिम त्याच्या बाणांनी कौरवांच्या अनेक पलटणी ओलांडत जात असतो. तुमचे मुलगे त्याच्याशी लढाई सुरू करतात. त्यांची संख्या जास्त होती व ते प्राणपणाने त्याच्याशी लढत होते. त्याना भिमाला ठार मारावयाचे होते. भिम तुमच्या मुलांनी फेकलेले विषारी शर हवेतच तोडून टाकत होता. ते पहाण्यासारखे होते. त्यानंतर ते जास्तच झाले व भिम तुमच्या मुलांना ठार मारू लागतो. त्यात सुशेना, दीर्घनेत्र, कुंडभेदी मारले जातात . त्यानंतर तो वृंदारकाला ठार मारतो. त्यानंतर आणखीन बाण फेकून तो तुमचे आणखीन पुत्र ठार मारतो. त्यांची नांव होती अभय, बौद्रकर्मन, दूर्विमोचन. कौरव पंडुच्या मुलावर पावसासारखे बाण फेकत असतात. भिमाला त्याचा कांहींच त्रास होत नाही. भिम हसत हसत विंद, अनुविंद व सुवर्मन यमाकडे पाठवतो. त्यानंतर भिम सुदर्शनाला बाणांने भोसकतो तो मरतो. थोड्याच वेळात तो कौरवांच्या फौजांकडे नुसता पहातो तेंच ते पळून जाऊ लागतात. भिमा पाहूनच ते घाबरून जात होते. परंतु, भिम त्याना सोडत नाही. तो त्यांचा पाठलाग करतो व पकडून मारू लागतो. तुमच्या सैन्याचा संहार होत असतो. त्यांना ठार मारल्यावर भिम एक मोठी गर्जना करतो ती ऐकून सगळे घाबरून जातात. त्याशिवाय तो दंड थोपटतो त्याचा फार मोठा आवाज होतो. ते तुमचे योद्धे द्रोणाकडे जातात.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे चोविसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग पंचविसावा

संजय पुढे सांगतो, द्रोणाच्या फौजा पार केल्यानंतर द्रोण त्याच्यावर मागून बाणांचा मारा करत रहातात. द्रोणांचे वागणे असे होते कीं, त्यांना भिमाला विरोध करावयाचा नव्हता परतु तसे ते उघडपणे दाखवू शकत सुद्धा नव्हते. भिम त्याच्याकडे असलेल्या भ्रमविद्येचा उपयोग करू लागतो. तो तुमच्या मुलांना त्या विद्येच्या मदतीने बेहोष करतो व त्यांच्यावर चाल करतो. तुमच्या साठी लढणारे कित्येक राजे जे सामान्य होते भिमाला गराडा घालतात. भिम त्याची प्रचंड गदा त्यांच्यावर अशी फेकतो कीं ती एकानंतर दुसर्याला अशी मारत मारत जाते. त्यामुळें त्यातील बरेच राजे दगावतात. इंद्राच्या वज्रासारखे ते होत असते. ती गदा त्यांना मारून पुन्हा परत भिमाकडे जात असे. त्यामुळें तो ती गदा पुन्हा पुन्हा फेकत होता व प्रत्येक वेळी अनेक योद्धे मारत होता. अशारितीने भिम त्याच्या गदेने नरसंहार करत होता. तुझ्या फौजांना मारत तो त्यांच्यामध्ये अधिकाधिक आत घुसत होता. पुन्हा द्रोण त्याला त्यांच्या बाणाच्या वर्षावाने अडवण्यात यशस्वी होतात. द्रोण व भिमाचे ते द्वंद्व देव आणि असुरांच्या युद्धासारखे वाटत होते. त्यात कित्येक हजार योद्धे यमाकडे पाठवले जात होते. एकदा भिम त्याच्या रथातून उतरतो व चालत द्रोणांकडे जाऊ लागतो. द्रोण त्याच्यावर बाण मारत होते परंतु, त्या बाणांचा त्याच्यावर कांहींच प्रभाव पडत नव्हता. त्यांच्या रथाजवळ गेल्यावर भिम त्यांचा रथ उचलतो त्याचा दांडा पकडून व जोराने दूर फेकतो. द्रोण त्वरेने त्यांच्या रथातून उतरतात व दुसर्या रथात चढतात. त्याच्या पासून ते दूर पळू लागतात. ते दृश्य पहाण्यासारखे होते. पुन्हा भिम त्याच्या गाडीत चढतो व तुमच्या सैनिकांचा संहार करू लागतो. पर्वताने समुद्राच्या लाटांना अडवावे तसे भिम कौरवांच्या सैनिकांना अडवत होता. तो भोजांच्या पलटणीकडे पोहोचतो. त्यांचे नेतृत्व करत होता कृतवर्मन. त्या फौजांचा नाश भिम सहजपणे करतो व पुढे जातो, त्यानंतर येतात म्लेच्छ पलटणी. ते उत्तम योद्धे होते पण भिमाची लढण्याची तर्हाच निराळी होती. तेथे भिमाला सत्यकी त्यांच्याशी लढतांना दिसत होता. भिम मोठ्या विश्वासाने

त्याच्याकडे जाऊ लागतो. आता त्याला धनंजयाला पहावयाचे होते. पुढे गेल्यावर तो अर्जुनाला पहातो. त्याचा शोध संपूर्ण झाला होता. भिम मोठी गर्जना करतो. जशी ढग गडगडाटत आहेत. त्याची ती गर्जना अर्जुन, कृष्ण व सत्यकी तिघे ऐकतात. ते त्यांच्या गर्जना करतात भिमाला समजण्यासाठी कीं त्यांनी भिमाला ऐकले आहे. त्या तीन गर्जना ऐकल्यावर युधिष्ठीर शांत होतो. युधिष्ठीर पुन्हा पुन्हा धनंजयाला त्याची प्रतिज्ञा सिद्ध करता यावी म्हणून लोकपाल देवतांकडे प्रार्थना करू लागतो. पांडवांच्या फौजांचे मनोधैर्य सुधारते. ते आणखीन जोमांने कौरवाशी लढू लागतात. ते बोलतात, "अरे वृकोदरा, तू मला संदेशा पाठवला आहेस. तू तुझे काम फत्ते केले आहेस. सत्यकी सुद्धा सुरक्षित आहे त्यामुळें आता चिंता करण्याचे कारण उरलेले नाही असे राजा सांगत असतो सगळ्यांना. युधिष्ठीर अर्जुनाच्या कितीतरी पराक्रमाचे किस्से सांगू लागतो त्यात त्याने निवातकवचांचा कसा नाश केला, विराटाच्या जनावरांना पळवून नेण्यासाठी गेलेल्या कौरवांची कशी फटफजिती केली असें सगळे तो आठवून आठवून बोलत होता. सुदैवाने ते सगळे सुरक्षित आहेत म्हणून तो भेदरट पांडव देवांचे आभार मानत असतो वारंवार. युधिष्ठीर कृष्णाचे सुद्धा आभार मानत असतो कारण त्याच्या कृपेमुळेंच ते सगळे सुरक्षित आहेत हे तो जाणून असतो.

आता प्रश्न असतो कीं जयद्रथाचा वध कसा होणार कारण, वेळ फार कमी उरलेला असतो. दुर्योधन जेव्हां पाहिल कीं, त्याचा भाऊजी जयद्रथ मारला गेला तर काय तो शांतता करण्यासाठी पुढे येईल? त्याची सख्खी भावंड मरत आहेत ते पाहून दुर्योधनाला उपरती येईल? जे उरले आहे ते सांभाळण्यासाठी काय तो तहाला तयार होईल? अशाप्रकारचे विचार युधिष्ठीराच्या मनात येत होते. ते तो विचार करत असतांना प्रत्यक्षात युद्धाने जोर धरला होता.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे पंचविसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व
## भाग एकशे सव्विसावा

धृतराष्ट्र विचारतात, "जेव्हां अर्जुन, कृष्ण व सत्यकी भेटल्याचे भिम गर्जना करून युधिष्ठीराला सांगतो त्यावेळी आमचे योद्धे त्याला घेराव घालतात कां? मला माहीत आहे कीं, ह्या जगात असा कोणी योद्धा नाही जो भिमाला भर युद्धात आव्हान देऊ शकेल. गदाधारी भिमापुढे कोण उभा रहाणार? गदाधारी भिम म्हणजे साक्षात यमच आहे. इंद्रसुद्धा तसे धाडस करणार नाही. दुर्योधनाशी प्रामाणिक असलेले कोण आहेत जे भिमापुढे उभे राहू शकतील"? रागावलेला व माझ्या मुलांचा संहार करणार्या भिमापुढे उभे रहाणे म्हणजे जळत्या वनात प्रवेश करण्यासारखे आहे. खाटीकखान्यात जसे प्राणी कापले जातात तसे तो माझी मुलं मारत आहे. मला अर्जुनाची भिती वाटत नाही किंवा कृष्ण अथवा युयुधन ह्यांनासुद्धा मी भित नाही किंवा महायोद्धा धृष्टद्युम्न त्याला सुद्धा मी भित नाही जरी तो यज्ञज आहे पण मला भिमाची फार भिती वाटते. आता मला सांग, माझ्यांपैकी कोण त्या जळत्या आगीत उडी मारावयाला गेला होता.

संजय सांगतो, जेव्हां तो महायोद्धा भिम ती गर्जना करत होता तेव्हां कर्ण ते सहन न झाल्यामुळें भिमावर चालून गेला. त्याचे धनुष्य त्याने खेचून ताणले होते, त्याने भिमाचे पुढे जाणे रोखले होते. कर्णाचे ते आव्हान पाहून भिमाचा राग अनावर झालेला दिसला. भिम कर्णावर अनेक जोरदार बाण फेकतो. कर्ण त्यातील कांहीं परत पाठवतो. त्या त्यांच्या द्वंद्वात जे त्याच्या हाताचे व टणत्काराचे ध्वनी होत होते ते ऐकून इतर योद्धे खचून जात होते. भिमाच्या आवाजामुळे सगळ्या तेथे असलेल्या क्षत्रियांना असं वाटत होते कीं, आकाश त्याने भरले आहे. हत्ती व घोडे मुतत होते घाबरून. अनेक भिववणारे शकून दिसत होते. आकाशात गिधाडं घिरट्या घालू लागली होती. कर्ण भिमाला वीस बाण मारतो. त्याचा सारथीसुद्धा तो जखमी करतो. ते करत असतांना तो हसत होता. भिमसुद्धा कर्णावर सहा बाण मारतो. कर्ण चार बाण मारतो परंतु, भिम ते हवेतच तोडून टाकतो. कर्ण भिमावर बाणांचा वर्षाव करू लागतो पण भिम त्याचे धनुष्य सांध्यावर तोडून टाकतो. त्यानंतर तो कर्णाला नवीन धनुष्य घेण्यास वेळ देत नाही व त्याच्यावर

आणखीन बाण मारतो. तरीसुद्धा कर्ण नवीन धनुष्य घेतो, भिमाला चटकन कांहीं बाण मारतो. त्यानंतर भिम कर्णाच्या छातीत तीन बाण मारतो. त्यामुळें कर्णाच्या छातीतून रक्ताच्या चिरकांड्या उडतात. त्यामुळे कर्णाचे भान जाते. ते विचलित होतो. तरी तो एक बाण भिमावर मारतोच. त्याने भिमाला जखम होते. कर्ण सावध होतो व भिमावर असंख्य बाण फेकायला सुरूवात करतो. त्या बाणांत भिम दिसेनासा होतो. भिम त्यातून कर्णाच्या धनुष्याची दोर तोडतो. त्यानंतर कर्णाच्या सारथ्याला यमाकडे धाडतो. त्याचे घोडे मारतो. कर्ण त्याच्या रथातून उडी मारून उतरतो. वृषसेनाच्या रथात चढतो. अशारितीने कर्णाचा पराभव केल्यावर भिम एक मोठी ओरोळी ठोकतो. ती आरोळी ऐकून युधिष्ठीराला समाधान होते. भिमाने कर्णाला हरवले ते समजल्यावर पांडवांचे रणवाद्ये वाजवून त्या वार्तेचे स्वागत करतात. अर्जुन त्याच्या गांडीवाचे टणत्कार काढून व कृष्ण पांचजन्य शंखाचा नाद करुन ते साजरा करतात. त्या सगळ्या आवाजात भिमाच्या आरोळीचा आवाज सर्वात मोठा होता. कर्णाचे बाण कमजोर होते व भिमाचे जोरदार होते.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे सव्विसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग सत्ताविसावा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर कौरवांचे सैन्य ठार मारले जाते व ते तिघे व कृष्ण जयद्रथाच्या ठिकाणी जाऊ लागतात. दुसरीकडे दुर्योधन द्रोणांना भेटण्यास जातो. त्याचा एक माणसाचा रथ (लहान रथ) तो घेऊन निघतो कारण त्याला फार जलद द्रोणांकडे जावयाचे असते. तो द्रोणांना भेटतो व सांगतो कीं, "अहो सरसेनापती, अर्जुन, भिम, कृष्ण आणि सत्यकी असे सगळे सिंधच्या राजाच्या शोधात त्यांच्या भागात फिरत आहेत. ते कौरवांचे सगळे योद्धे मारत आहेत. अशाने ते लवकरच जयद्रथापर्यंत पोहोचतील. आपण त्यांना कसे आवरावयाचे ते समजत नाही. आपला सुद्धा ते पराजय करत आहेत. भिमाने कर्णाचा पराजय केला आहे म्हणून तो युद्धातून निघून गेला आहे. तो कालचा पोरगा सत्यकी आपल्याला पराजित करून पुढे गेला आहे, भिमाने आपल्याला पळवले आहे, हे सगळे काय होत आहे? त्यांच्या झपाट्यामुळे कौरवांचे सैन्य नाउमेद झाले आहे. काय करावे ते समजत नाही. सगळे आपल्याला दोष देत आहेत. हे असे आपल्यासारख्या कडून कसे झाले ते समजत नाही. असें दिसते कीं, आपला नाश होणार हे स्पष्टपणे दिसत आहे. ह्यापुढे काय करावयाचे ते सांगा. जे झाले ते झाले त्यावर एकमेकांना दोष देत न बसता पुढे काय करावयाचे ते ठरवू. जयद्रथाला कसे वाचवावयाचे ते सांगा. जे सांगाल तसे मी करून घेईन".

द्रोण त्याला बोलतात, "ऐक माझ्या महान राजा, माझे मत सांगतो, आतापर्यंत पांडवांचे फक्त तीन वीर आपल्याला पराभूत करत आहेत. आपल्याला त्यांच्यावर लक्ष द्यावयाचे आहे. जेथे कृष्ण व धनंजय आहेत तेथे कौरवांना जास्त धोका आहे. आपले सैन्य मागून व पुढून असे दोनही बाजूने मार खात आहे. त्या परिस्थितीत जयद्रथाचे संरक्षण आपली प्राथमिक जबाबदारी आहे. जयद्रथ अर्जुनाला घाबरतो त्याला जास्त संरक्षण मिळाले पाहिजे. युयुधन व वृकोदर सुद्धा जयद्रथाच्या मागे आहेत. हे सगळे होत आहे कारण तू त्या द्युताचा खेळ मांडलास. त्या शकूनीने तुला नादी लावले व तू

ऐकत गेलास. आता तो शकूनी कोठे आहे"? द्युतात जिंकणे अथवा हरणे नसते कारण तो एक खेळ असतो परंतु, आता ह्या खेळात जिंकणे वा हरणे होणार आहे. त्या शकूनीच्या खेळामुळें हे सगळे होत आहे. ह्या युद्धाच्या खेळात जयद्रथ हा एक मोहरा आहे ज्याच्या भोवती हा युद्धाचा जुगार खेळला जाणार आहे. जर आपण जयद्रथाला वाचवले तर अर्जुन जातो व जर जयद्रथ गेला तर आपण हे युद्ध हरलो, अशी परिस्थिती आहे हे लक्षात घे. म्हणून जयद्रथाला संरक्षण देणे फार महत्वाचे आहे. ते जयद्रथाचे संरक्षण नसून सगळ्या कौरवांचे संरक्षण ठरणार आहे. म्हणून तू आता तेथे जा आणि जयद्रथाला बाहेर येऊ देऊ नकोस सूर्य मावळे पर्यंत. एकदाचा सूर्य मावळला कीं. त्याला बिनधास्तपणे बाहेर येऊ दे, अर्जुनाचे अग्नीकाष्ठ भक्षण पहाण्यासाठी. सूर्य मावळावयाला अजून थोडाच समय बाकी आहे. माझ्याबद्दल सांगतो, मी येथे थांबून पांडवांचे इतर योद्धे पुढे जाणार नाहीत असे पहाणार आहे. तसे सांगितल्यानंतर दुर्योधन त्याप्रमाणे व्यवस्था करण्यासाठी पुन्हा परत तेथे येतो जेथे जयद्रथाला लपवून ठेवले होते. द्रोणांने जे सांगितले ते तो पक्के ध्यानात ठेवून तसे करणार असतो. त्याच वेळी पांडवांचे दोन संरक्षक युधमन्यू व उत्तमौजस कौरवांच्या फौजांमधून पुढे सरकत होते सव्यसाचीकडे जाण्यासाठी. तुम्हाला आठवत असेल की, पूर्वी अर्जुनाला तेथे जातांना कृतवर्मनाने अडवले होते. दुर्योधन त्या दोघांना थांबवण्यासाठी जोराचे प्रयत्न करण्याचे आदेश देतो. युधमन्यू दुर्योधनाला बाणांने जखमी करतो. परंतु, दुर्योधन युधमन्यूचे धनुष्य तोडतो. त्यानंतर तो त्याच्या सारथ्याला त्याच्या जागेवरून हलवतो. त्याने रागावलेला युधमन्यू दुर्योधनाचे घोडे मारतो. दुर्योधनाच्या छातीत तीस बाण मारतो. त्याच वेळी उत्तमौजस पांचालचा युवराज, दुर्योधनाच्या सारथ्याला यमाकडे धाडतो. दुर्योधन त्याचे घोडे मारतो. त्याचे सहाय्यक सारथी असे सगळे मारून टाकतो. उत्तमौजस त्याच्या भावाच्या रथात चढतो. तो दुर्योधन त्याचे घोडे मारतो ते तेथेच मरून पडतात. युधमन्यू दुर्योधनाचे धनुष्य निकामी करतो. त्याचे घोडे गेल्यामुळे तो गदा घेऊन खाली उतरतो. युधमन्यूवर धावून जातो. ते दोघे बंधू रथातून उडी मारतात त्यावेळी दुर्योधन त्याच्या गदेने त्यांचा रथ मातीत गाडण्याचा प्रयत्न करतो. अशारितीने

तो रथ बरबाद केल्यानंतर तो तुझा मुलगा मद्रदेशाच्या राजाच्या रथात चढतो. त्याच वेळी पांचालांचे ते दोघे लढवय्ये दुसर्या रथातून अर्जुनाच्या दिशेने निघून जातात.
जयद्रथ वध पर्व भाग एकशे सत्ताविसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे अठ्ठाविसावा

संजय पुढे सांगतो, त्या युद्धात सगळे पुढे काय होणार ह्या विचारात असतांना कर्ण भिमाला आव्हान देण्याची तयारी करत असतो. त्याचा जो पराभव भिमाने आधी केला होता तो त्याला खुपत होता व त्याचा हिशोब चुकता करण्यासाठी तो ते आव्हान देत होता.

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, "मला सांग, अर्जुनाच्या शेजारीच भिम व कर्ण कसे द्वंद्वांचे आव्हान देतात. युधिष्ठीर सुद्धा कर्णाला घाबरत होता मग ते द्वंद्व कसे झाले? युधिष्ठीर त्या विवंचनेत पडला असेल कीं भिमाने ते आव्हान कां स्वीकारले? मला सांग संजया, भिम कर्णाचे आव्हान कां स्वीकारतो? कर्ण कधी हरलेला नाही व तो ब्राह्मणांना मानतो त्याच्या बरोबर भिम कसा लढू शकेल? त्यांचे द्वंद्व अर्जुनाच्या रथाजवळ कां होते? कुंती बरोबर झालेल्या संभाषणातून कर्णाला माहित असते कीं , पांडव त्याचे आईकडूनचे बंधू आहेत. दुर्योधनालासुद्धा ते सत्य माहीत असते. भिमसुद्धा कर्णाने आधी केलेली कृष्ण कृत्ये लक्षात ठेवली असतील. काय त्या परिस्थितीत ते द्वंद्व करणार होते कां? माझ्या मुलाला वाटत होते की, कर्ण सगळ्या पांडवांना पराजित करील व त्या प्रमाणे त्याचे सगळे नियोजन होते. अशा परिस्थितीत कर्णाला तो कां भिमाशी लढू देतो. मला सगळे सांग कारण तू चांगले सांगतोस. त्या द्वंद्वांत कोण जिंकले ते मला ऐकावयाचे आहे".

संजय पुढे सांगतो, त्या आधीच्या द्वंद्वात कर्णाला हरवल्यानंतर भिम अर्जुनाकडे निघतो ते मी आधी सांगितले आहे. कर्णाला ते पराजय खुपत असतो. भिम अर्जुनाकडे पोहोचतो तोंच मागून कर्ण वेगांने येऊन भिमाला पुन्हा आव्हान देतो. ते कृष्ण व अर्जुनाच्या समक्ष होते. कर्ण भिमावर बाणांचा वर्षाव करतो ज्यामुळे तो दिसेनासा होतो. ते भिमाला अपेक्षित नव्हते. तो भिमाला मोठ्याने ओरडून बोलतो, "अरे भिमा, मला माहीत नव्हते कीं, तुला धनुर्विद्या चांगली येते. मग मला तू पाठ का दाखवत आहेस? अर्जुनाला भेटण्याची एवढी काय घाई झाली आहे तुला? असे पळून जाणे कुंतीच्या

मुलाला शोभत नाही. म्हणून आहेस तेथे थांब, तुझ्या बाणांनी मला घायाळ करून दाखव". भिमसेन ते आव्हानात्मक बोलणे ऐकतो. तो कर्णावर बाणांचा पाऊस पाडतो. त्याच्या मते तो कर्णाला मारून टाकण्याचा विचार करत असतो. भिम त्या महारथीला द्वंद्वांत हरवण्याचे निश्चित करतो. त्याने आधीच बरेच कौरव ठार मारलेले असतात. कर्ण ते सगळे बाण परतवत होता. कर्ण त्याच्याकडे पहात हसत होता व अधून मधून त्याला वेडावून दाखवत होता परंतू, भिम मात्र मोठ्या त्वेषाने लढत होता. भिमाला ते कर्णाचे वाकुल्या दाखवणे रुचत नाही. त्याचा राग अनावर होत असतो. भिम कर्णावर सत्तर बाण मारतो परत दहा मारतो. त्याच्या छातीवरच तो ते मारत होता परंतु, त्याचा फारसा परिणाम कर्णावर होत नव्हता. ते होत असतांना थोड्याच काळात भिमाच्या रथाभोवती एक बाणांचे जाळे कर्ण विणत जातो. त्यात भिम कैद झाल्यासारखे होते. त्यानंतर कर्ण भिमाचे अभेद्य चिलखत फाडण्याचा प्रयत्न करतो. कर्णाचे बाण लागत असूनही भिम त्याचा विचार फारसा करत नाही व त्याचे शरसंधान चालू ठेवतो. कर्णाच्या बाणामुळें भिमाला कांही होत नाही. असे दिसत होते कीं, कर्ण त्याचे खरे कसब भिमावर लावत नव्हता. तो त्याच्याशी खेळत होता जसे मोठा भाऊ धाकट्या भावाशी खेळतो. भिम मात्र मोठ्या गाभिर्याने ते द्वंद्व लढत होता. भिमाला कर्णाचा तो खेळगडीपणा रुचत नाही. तो कर्णाला बाद करण्यासाठी त्याचे शरसंधार करत असतो. भिमाचे बाण कर्णाच्या सर्वांगावर लागत होते. कर्णाचे बाण भिम उलटवत होता. कर्ण पुन्हा भिमावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्याच्या बाणाने भिम साळूखी सारखा दिसत होता. भिमाच्या सर्वांगातून रक्ताच्या धारा लागल्या होत्या. ते जे घडत होते भिमाला रुचत नव्हते. कारण तो कर्णाला बाद करू शकत नव्हता. ते होत असतांना भिम कर्णाचे धनुष्य तोडतो. त्यामुळे त्याच्या चेहर्यावर स्मित झळकते. त्यानंतर तो त्याच्या घोड्यांना जखमी करतो. त्यानंतर तो त्याच्या सारथ्याला इजा करतो. त्यानंतर कर्णाच्या छातीत बाण मारतो. त्यामुळें कर्णाला फार त्रास होतो व तो द्वंद्व सोडून दुसर्या रथाने निघून जातो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे अठ्ठाविसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकोणतिसावा

धृतराष्ट्र पुढे विचारतो, "अरे संजया मला सांग माझा मुलगा दुर्योधन काय बोलला जेव्हां तो पहातो कीं, कर्ण भिमाकडून हरल्यावर रणक्षेत्र सोडून जातो. कर्ण पुढे काय करतो जेव्हां तो भिमाला तेजस्वी तळपताना पहातो".

संजय सांगतो, कर्णाला पुन्हा भिमाकडे द्वंद्वांसाठी जातांना तुमचा मुलगा पहातो तो समजतो कीं, भिमाचे अर्घ्य दिले गेले आहे यज्ञात. त्यांच्यात पुन्हा एक द्वंद्व सुरू होते. दोघेही रागावलेले दिसत होते. दोघांचे डोळे लाल झालेले होते. दोघे जोराजोराने श्वास घेत होते. जणूकाय साप आहेत. खर्या योद्ध्याप्रमाणे ते एकमेकांना जखमी करतात. जसे दोन सरभ भिडले आहेत. भिमाला द्युताच्या वेळचे प्रसंग आठवतात. त्याला ते वनातील त्रासदायक दिवस आठवतात. त्यानंतर अज्ञातवासाचे दिवस आठवतात. त्याला त्यांचे स्वकष्ठाने मिळवलेले राज्य कसे लुबाडले गेले ते सगळे आठवत असते व त्याचा परिणाम त्याच्या लढण्यावर होत असतो. कौरवांचे दुष्टासारखे वागणे आठवते, त्यात कर्णाचा जो भाग होता तो त्याला विशेष आठवतो. त्याला कुंतीचे कष्टाचे दिवस आठवतात. लाक्षागृहाचे दिवस आठवतात. द्रौपदीचा विनाकारण झालेला अपमान त्याला आठवतो. दुःशासनाने तिचे केस पकडून तिला कसे खेचत सभागृहात आणले ते त्याला आठवते. त्यावेळी त्या लोकांनी केलेला त्यांचा अपमान त्याला आठवतो. द्रौपदीला ते बोलतात कीं, तुझे नवरे भिकारी झाले आहेत, त्यांची लायकी तीळाच्या तुसाइतकीसुद्धा नाही हे त्यांचे उद्गार त्याला आठवतात. त्याला आठवते कीं, ते बोलतात कीं, त्या भावंडाना द्रौपदी त्यांची सेविका व्हावी असें वाटते. पांडवांचे संन्याशांचे कपडे पाहून ते कसे हसतात ते त्याला आठवते. भिमाला त्याच्या लहानपणापासूनचे ते सगळे वाईट अनुभव आठवू लागतात. तो आणखीनच क्रूर होतो कर्णाशी लढतांना. भिम त्याचे धनुष्य सज्ज करून कर्णावर धाव घेतो. कर्ण त्याच्यावर बाणाचे वार करतो नऊ. भिम कर्णावर चाल करून जातो. एकाद्या संतापलेल्या हत्तीसारखे त्याचे वागणे होते, भिम त्याचे शंखू वाजवतो. त्याचा आवाज शेकडो

तुतार्यांसारखा होता. कर्ण मात्र त्याला सहजपणे घेत होता. कर्ण त्याचे रथाचे घोडे भिमाच्या रथाच्या घोड्यात घुसवतो. ते पाहून तेथे पहाणारे योद्धे मोठ्या मोठ्याने किंचाळून त्यांना उत्तेजन देत असतात. त्याचा उत्साह वाढत होता. त्याप्रमाणे तुमच्या योद्ध्यांना पुढे काय होणार त्याची फिकीर होत होती. जेथे ते लढत होते ती भूमी यमाचे स्थान झाले होते. यमाच्या नगरीचे रुप त्या जागेला आले होते. दोघे तुल्यबळ ठरत होते. तुमच्या दुष्ट कारभाराचा परिणाम तेथे दिसत होता. ते एकमेकांचा जीव घेण्यासाठी लढत होते. त्याच्या सोनेरी बाणांमुळे आकाशात प्रकाश पडत असल्यासारखे वाटत होते. जणू काय चमकणारे अशनि पडत आहेत. त्यांचे बाण एका रेषेत जात होते. कृष्ण व अर्जुन समजतात कीं कर्णाशी लढणे भिमासाठी भारी जात आहे. त्यांच्या बाणांमुळें तेथे असलेले अनेक हत्ती व घोडे बाण लागल्यामुळे मरत होते. त्या मरणार्या जनावरांमुळे मोठा संहार तेथे होत होता. ते सगळे मरणारे लोक व प्राणी तुझ्या सैन्याचे होते.

जयद्रथ वघ पर्व भाग एकशे एकोणतिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे तिसावा

धृतराष्ट्र बोलतो, "मला वाटते भिमसेनाचे धाडस कौतुकास्पद आहे. अरे संजया मला सांग तो कर्ण जो देवांना भारी जातो भिमासारख्या सामान्य धनुर्धार्याला हरवू कां शकत नव्हता. मला तू ते सांग, त्या युद्धात, ते एकमेकांचे जीव घेण्यासाठी लढत होते कां कसे"? ते दोघे कसे लढत होते ते पाहिले कीं, कर्ण कां भिमाला पराभूत करत नव्हता ते समजत नाही. दुर्योधन सुद्धा ते पाहून नवल करत असला पाहिजे. कर्णाचा पुन्हा पुन्हा भिम पराजय करत आहे ते पाहून मला भोवळ येऊ लागली आहे. मला वाटते त्याचा अर्थ कौरवांचा निश्चितपणे पराभव होणार आहे. माझ्या मुलाच्या चुकीच्या धोरणांचा हा परिणाम आहे. त्यामुळे कर्ण भिमालासुद्धा कधीच पराभूत करू शकणार नाही. अरे संजया, पृथाची मुलं, जेव्हां जेव्हां कर्णाने त्यांच्याशी युद्ध केले आहे ते जिंकत आले आहेत. एरव्ही कर्णाला कोणीही हरवू शकत नाहीत हे सर्वमान्य सत्य आहे. मग त्यांनाच तो कां बरे हरवू शकत नाही? कदाचित माझ्या मूर्ख मुलाला ते माहीत नसावे. पार्थांच्या मुलांना माझ्या मुलाने लुटले आहे जो कुबेरासारखा श्रेष्ठ आहे. माझ्या मुलाला वाटते तो कोणालाही लुटू शकतो, त्याने विनाकारण पांडवांचा अनेक वेळा उपमर्द केला आहे. मीसुद्धा त्यात सामील झालो माझ्या मुलांवरील मायेमुळें. पंडुची मुलं नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ आहेत. त्यांच्याशी जे झाले ते व्हायला नको होते. हे मला आता समजते आहे जेव्हां युद्धाचा सोळावा दिवस उगवला. कुंतीचा ज्येष्ठ पुत्र जो शहाणपणाचा व नैतिकतेचा पुतळा आहे, नेहमी सामोपचाराचा पुरस्कर्ता राहिला आहे. परंतु, माझी मुलं समजली कीं, तो कमजोर आहे म्हणून शांततेच्या गोष्टी करत आहे. वस्तुतः परिस्थिती तशी नव्हती ते मलासुद्धा आत्ता समजू लागले आहे. इतर पांडवांचे त्याच्याशी आज्ञाधारकपणे रहाण्याचा सुद्धा माझ्या मुलांनी चुकीचा अर्थ घेतला त्याची निष्पत्ति आज आम्ही अनुभवत आहोत. आता भिम कर्णाशी द्वंद्व करत आहे त्याबद्दल मला सांग".

संजय बोलतो, "ऐका महाराज, दोन उन्मत्त हत्ती एकमेकांशी झुंजावेत तसें ते दोघे भाऊ झुंजत होते. विकर्तनाचा मानसपुत्र भिमाला ठार मारण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करत असतो. भिमावर तो अनेक बाण फेकतो. भिम ते सगळे बाण तोडून टाकत होता. भिम कर्णाच्या सारथ्याला मारतो एक मोठा लांब बाण. कर्ण भिमावर एक शर फेकतो. त्यानंतर तो जोराने आरोळी ठोकतो जसा कांहीं त्या शराने भिमाचा मृत्यू झाला आहे. त्याची आरोळी ऐकून तुझे मुलगे खूष होतात. भिम त्या शराचे तुकडे करतो. कर्णाचा मृत्यू व्हावा ह्या अपेक्षेने भिम अनेक बाण त्याच्यावर फेकत असतो जणू काय यमाचे बाण ते होते. कर्णाचे सगळे प्रयत्न व्यर्थ जात होते. भिम त्याच्याने हटत नव्हता. दोघे जोराजोरांने गर्जना करत होते जसे कांहीं दोन सिंह झुंजत आहेत. प्रसंगी ते दोघे एकमेकांकडे तीक्ष्ण नजरेने पहात होते कीं त्यानंतर काय करावयाचे ते समजावे. ते दोघेही त्यांच्या हिम्मतीची पराकाष्ठा करत होते. तशा प्रकारे त्यांचे द्वंद्व चालू होते. अधून मधून त्याना त्या द्वंद्वाचे हसू येत होते. दोघानाही समजत नव्हते असे कसे हे द्वंद्व होत आहे. कारण कर्ण भिमाच्या पेक्षा धनुर्विद्येत कितीतरी पटीने अव्वल होता तरी तो भिमाला चीत करू शकत नव्हता. त्याचे दोघांनाही आश्चर्य वाटत होते. मधूनच कर्ण चिडून भिमाला शीव्या देऊन धुत्कारत असें व भिम त्यापेक्षा जास्त कांहीं करून त्याचा कर्णाबद्दलचा तिरस्कार व्यक्त करत असें. भिम कर्णाचे धनुष्य तोडतो व नंतर त्याचे घोडे ठार मारतो. त्यानंतर त्याच्या सारथ्याला जमिनीवर फेकतो. त्यामुळे कर्ण रथाशिवाय झाला होता. त्याला भिमाच्या बाणाने बांधले होते. त्यामुळे कर्ण मोठ्या अवघड परिस्थितीत गेला होता. भिमाच्या बाणांने तो बधीर झाला होता. त्याला कळे ना काय करावे"? कर्णाची ती अवस्था पाहून दुर्योधन बेचैन झाला होता. तो त्याचा भाऊ दुर्जय ह्याला कर्णाला मदत करण्यासाठी सांगतो. तो सांगतो दुर्जयाला, "त्या दाढी नसलेल्या पांडवाचा खून कर, म्हणजे कर्ण वाचेल". ती आज्ञा ऐकून तो तुझा मुलगा भिमावर चाल करतो. भिमावर तो बाणांचा वर्षाव सुरू करतो. भिमाचा संताप अनावर होतो व तो दुर्जयाच्या मर्मस्थानी वेध घेतो. त्याला यमाच्या घरी पाठवतो. दुर्जन मरून पडतो. ते पाहून कर्णाला फार वाईट वाटते. तो अश्रू ढाळतो. त्याच्या देहा भोवती प्रदक्षिणा घालून त्याचा सन्मान करतो. त्यानंतर जिंकल्याच्या अविर्भावात भिम कर्णावर असंख्य

बाण असे मारतो कीं त्याच्या अंगाची साळूखी झाली होती. तेवढे झाले तरी कर्ण भिमापुढे हार मानत नाही. (हार मानणे म्हणजे दोन हात वर करणे असा रिवाज होता)

जयद्रथ वध पर्व भाग एकशे तिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकतिसावा

संजय पुढे सांगत असतो, कर्ण पूर्णतया भिमाकडून पराजित झाला होता. तो दुसर्या रथात चढतो आणि पुन्हा भिमावर बाण मारू लागतो. भिम त्याच्यावर बाणांचा वर्षाव चालू ठेवत मोठ्या मोठ्याने ओरडत असतो विजयाच्या घोषणा. एकमेकांवर बाण मारणे व शरीरावर बाणांचे वार करणे असें दोघांचे चालूच होते. भिमाच्या बाणांनी कर्णाच्या सर्वांगाला जखमा झाल्या होत्या. तुलनेने भिमाच्या अंगाला कमी जखमा झालेल्या होत्या. तरी त्यांचा त्वेष यत्किंचितही कमी झालेला नव्हता. उलट तो वाढत होता. त्यानंतर कर्ण भिमाच्या अंगावर चालून जातो जसे मच्छर ज्योतीवर झडप घालतो. कर्णाने फेकलेला भाला जो भिमाचा नाश करण्यासाठी होता भिमाला जबर इजा करतो व नंतर मातीत घूसतो. त्याने संतापलेला वृकोदर एक भलीमोठी गदा त्याच्यावर जोरांने फेकतो. इंद्राच्या वज्रासारखी ती होती. ती गदा कर्णाच्या त्या नव्याने मिळालेल्या रथाचे घोडे ठार मारते. त्यानंतर भिमाचे बाण कर्णाचे ध्वजस्तंभ पाडतो. त्यानंतर तो त्याचा नवीन सारथी ठार मारतो. पुन्हा कर्ण बेरथ झालेला होता. कर्ण तो रथ सोडून देतो. आता तो जमिनीवर उभा असतो जसा बेसहारा असावा. त्याला समजत नसते कीं, असे कसे होत आहे. भिमासारखा एक सामान्य धनुर्धारी त्याला कसा काय बेजार करू शकतो? त्याच्या हातात फक्त एक तिरकमटा असतो पण बाण नसतात. त्याचा भिमाला विरोध मात्र सतत चालूच असतो. दुर्योधन ते पहात असतो व ते विलक्षण दृष्य त्यालाच काय पण सगळ्यांना नवल करत असते. दुर्योधन त्याचा भाऊ दुर्मुख, त्याला सांगतो कीं, जा आणि कर्णाला एक रथ दे. मोठ्या भावाचे ते ऐकल्यावर तो कौरव भिमाला आव्हान देत त्याच्यावर बाणांचा मारा सुरू करतो. ते दुर्मुखाचे आव्हान भिमाला आवडते. तो जिभल्या चाटतच त्याच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देतो. कांहीं बाणातच तो तुमच्या दुर्मुखाला यमाकडे धाडतो. दुर्मुख मेल्यावर कर्ण त्याच्या रथात चढतो. दुर्मुख धारातीर्थी आडवा पडला होता. त्याच्या अंगात भिमाचे बाण घुसलेले दिसत होते व सर्वांग रक्ताने भरलेले होते. ते दृष्य पाहून दुर्योधनाच्या डोळ्यात पाणी येते. कर्ण त्या

रथातूनच दुर्मुखाच्या कलेवराला तीन प्रदक्षिणा घालतो व नंतर तेथून निघून जातो. कर्णाला अजून समजत नसते असे कसे होत आहे की, भिम त्याला हरवत आहे, एकदा नाही, दोनदा नाही तर तिनदा तो हरलेले असतो. हा प्रकार त्याच्या समजण्याच्या पलिकडला होता. आकाशातील देव, ऋषी सुद्धा अचंबा करत असतात. कर्ण विवंचनेत पडला आहे ते पाहून भिम त्याच्यावर आणखीन बाण मारतो. भिम चार जोरदार बाण मारतो ते आकाशात उंच जाऊन मग कर्णाच्या चिलखतात घूसतात. त्यामुळे कर्णाचे रक्त मातीत पडते. कर्ण त्याचा जास्त विचार न करता भिमाच्या उजव्या दंडाला चौदा बाण मारतो. त्यानंतर ते बाण जमिनीत घूसतात. त्यावेळी सूर्य मावळतीच्या दिशेने चालत होता. त्या कर्णाच्या बाणाने भिमाचे बरेच रक्त जमिनीवर सांडते. तरी तो त्याचे बाण मारणे थांबवत नाही. तो त्याच्या सारथ्यावर बाणांचा मारा करतो. भिमाच्या त्या सतत जिंकण्यामुळे कर्णाचा गर्व हरण झालेला होता. तो आता निराश झालेला दिसत होता. तो नामचंद योद्धा रणभूमी सोडून अखेरीस पळून जातो. भिम मात्र त्याचे धनुष्य वर करून तो जिंकला असल्याचे तुझ्या लोकांना दाखवत असतो व मोठ्याने गर्जना करत असतो. पांडवांकडील रणवाद्ये जोरांनी वाजवली जातात भिमाचा जय व्यक्त करण्यासाठी.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे एकतिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे बत्तिसावा

धृतराष्ट्र पुढे बोलतात, "अरे गवळगणा, माणसाचे भाग्य हेंच श्रेष्ठ असते. तुमच्या कर्तृत्वाला काहींच किंमत नसते. आता पहा हा अधिरथाचा मुलगा, मोठा धनुर्धारी पण पंडुच्या मुलापुढे हरत होता. कर्णाला त्याच्या तिरंदाजीचा फार मोठा गर्व होता पण त्या प्रसंगाने त्याचे गर्वहरण झाले. तो सगळ्या पांडवांना व कृष्णाला असे एकत्रितपणे हरवण्याच्या वल्गना करत होता, त्याचे काय झाले ते दिसले. खरे पाहिले तर सार्या पृथ्वीवर कर्णा सारखा तेज तिरंदाज मिळणार नाही असे असूनही ह्या प्रसंगी तो हरत होता. तो नालायक दुर्योधन, मला नेहमी सांगत असें, कीं, कर्ण कधीही न थकणारा धनुर्धारी आहे पण ह्यावेळी तो थकत होता म्हणून हरत होता. जर तो वसुसेन (कर्ण) मला जोडीदार मिळाला तर मी सगळे जग जिंकून घेईन. त्या कारणाने तो नेहमी पांडवांची आपल्याला आवश्यकता नाही असें सांगत असें. पांडव बुळे आहेत, नेहमी तत्त्वज्ञानाच्या नितिमत्तेच्या कारणांने वागत असतात, असे लोक राज्यकारभारासाठी कुचकामी असतात असें तो मूर्ख मुलगा मला समजावत असे. आता काय झाले त्या कर्णाच्या चतुराईचे"? पुढे तो राजा संजयाला विचारतो, "म्हणून मला सांग ते कर्णाचे पळून जाणे पाहिल्यावर दुर्योधन काय बोलतो. तो माझ्या मुलाला, दुर्मुखाला त्याला मदत करण्यासाठी पाठवतो व काय होते? तो भिमाच्या हातून मारला जातो. माझा आणखीन एक पुत्र मारला गेला पांडवांच्या हाती, त्यात काय मिळाले आम्हाला? अरे संजया मला सांग, अश्वत्थामा, कृप आणि सल्य हेसुद्धा त्याच्या पुढे टिकाव धरू शकले नाहीत ज्याच्या कडे मरुतांची शक्ती एकवटलेली आहे, दहा हजार हत्तींचे बळ आहे, असे माहीत असतांना त्याला कां माझी मूर्ख मुलं डिवचत आहेत ते समजत नाही. तो पांडव साक्षात यमाचा अवतार आहे हे माहीत नाहीं कां माझ्या मुलाला? कर्ण त्याच्या घमेंडीत भिमाबरोबर लढत होता. तेव्हां नियतीने त्याच्या गर्वहरणासाठीच भिमाची नियुक्ती केली होती असें वाटते. त्यातून कर्ण कांहीं शिकणार आहे कां? अशा भिमापुढे कोण टिकाव धरू शकेल? तो अर्जुनाच्या शोधात माझ्या सैन्यात शिरला आहे, त्यांने

त्या आधी द्रोणाला पळवून लावले होते ते तू मला सांगितले आहेस. एकवेळ यमाच्या घरात गेलेला माणूस परत येऊ शकतो पण भिमाच्या हातात सापडलेला कधीच परत येणार नाही अशी त्याची ख्याती आहे. अविचारी लोक त्याच्या वाटेत जाऊन त्याला आव्हान देतात, जसे किटक ज्योतीत घूसतात व मरतात. मला आठवते सभेत भिम काय बोलला होता ते. त्याने कौरवांचा संहार करण्याची प्रतिज्ञा घेतली होती. कर्णाचा हा पराजय पाहून माझे दुःशासन आणि इतर मुलगे कांहीं शिकणार आहेत कां"? तो मूर्ख दुर्योधन नेहमी बोलत असतो कीं, तो, दुःशासन व कर्ण पांडवांचा खत्मा करणार आहेत म्हणून! आता कर्णाला भिमाने हरवले आहे व त्याचे सर्वस्व खलास केले आहे ते पाहून तो काय बोलला ते मला ऐकावयाचे आहे. त्याच्या चुकीमुळें माझे कित्येक पुत्र नाहक मारले गेले आहेत. किती बांगड्या विनाकारण फुटल्या आहेत, किती सुखी संसार उध्वस्त झाले आहेत. त्या सगळ्या कर्माचे काय फळ माझ्या मुलाला व पर्यायाने मला स्वतःला भोगावे लागणार आहे ते ईश्वर जाणे. रागावलेला भिम यमापेक्षा जास्त भयप्रद वाटतो. तो वडवानलापेक्षा जास्त दाहक आहे. रागावलेला भिम माझ्या सगळ्या पुत्रांचा वध करणार आहे असे मला सारखे वाटत आहे".

संजय ते ऐकून पुढे बोलतो, "अहो कौरवं, ह्या दुःख करण्यात काय अर्थ आहे? त्या सगळ्याच्या मागे आपली स्वार्थी प्रवृत्ती कारणीभूत आहे ते लक्षात घ्या. आपल्या मुलांच्या दोस्तांचे लाड पुरवून आपणच हि वेळ आणली आहे. तुमच्या खर्या सल्लागारांचे आपण कधी ऐकले नाही त्याचा हा परिणाम आहे. दुर्योधनाला बिघडवण्याचे काम आपणच केले हे विसरून चालणार नाही. आता त्यापुढे काय झाले ते सांगतो ते ऐका. कर्णाचा पराभव झाला ते तुमच्या पांच पुत्रांना आवडले नाही. त्यामध्ये धर्मर्सन, दुर्धर, जय व दुर्मद त्यांच्या रूबाबदार चिलखतात पांडवांवर तुटून पडले. ते प्रथम वृकोदराला घेरतात. भिम त्यांचे हसत हसत स्वागत करतो. कौरवांतील पांच भिमावर चालून गेले हे समजल्यावर कर्ण सुद्धा त्यांच्यात सामील होतो. कर्णाला आलेला पाहून भिम प्रथम त्याच्यावर जातो. ते सगळे भिमावर बाणांचा वर्षाव करू लागतात. भिम त्याच्या मजबूत तिरकमट्याने त्या तुझ्या मुलांना एकेक करून यमाकडे पाठवतो. त्यांच्या बरोबर त्यांचे घोडे व सारथीसुद्धा यमाकडे जातात. मारले गेलेले ते तुमचे पुत्र त्यांच्या रथातून

जमिनीवर कोसळतात. त्यावेळी भिमाकडे पहाण्याचे धाडस कोणी करत नव्हते. त्याचा जोश विलक्षण होता. कर्णाने मात्र त्याचे युद्ध चालू ठेवले होते. ते दोघे पुन्हा एकमेकांकडे लाल झालेल्या डोळ्याने एकटक पहात होते. ते एकमेकांचा अंदाज घेत होते. त्यांचे तिरकमटे ताणलेले होते.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे बत्तिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे तेहतिसावा

संजय पुढे सांगतो, तुमची मुलं मेलेली जमिनीवर पडलेली पाहून कर्णाला फार वाईट वाटते. त्याच्या डोळ्यात अश्रू येतात. त्याला वाटते कीं, त्या मुलांच्या मृत्यूस तो कारण आहे. भिम कर्णाने पूर्वी जी गैरकृत्ये पांडवांशी केली ती लक्षात घेत त्याच्यावर बाणांचे वार करण्यास सुरूवात करतो. कर्णसुद्धा तेंच करू लागतो. भिम सुडाने पेटलेला कर्णावर सत्तर बाण मारतो. त्यानंतर तो आणखीन शंभर बाण मारतो. ह्यावेळी तो कर्णाच्या वर्मी बाण मारत असतो ज्यांमुळे त्याची ताकद कमी होईल. पुन्हा भिम कर्णाचा तिरकमटा तोडतो. तो नवीन घेतो. भिमावर चहोबाजूने बाणांचा वर्षाव करतो. पुन्हा भिम कर्णाचे घोडे आणि साथी मारून टाकतो. त्यानंतर तो कर्णाकडे पहात मोठ्याने हसत रहातो. त्यामुळे कर्णाचे नैतिक बळ संपते. तो दुःखी होतो. कर्ण त्यानंतर त्याची गदा हातात घेतो व भिमावर जोरांने फेकतो. वृकोदर त्या गदेला उलटवण्यासाठी त्याच्या बाणांचा उपयोग करतो. ते तो सगळ्या तुझ्या सैनिकांसमक्ष करतो. गदा व धनुष्य दोनही गेलेला कर्ण हतबल होऊन रणांगणात उभा असतो. ते दृष्य "न भूतो न भविष्यती", असें होते. भिमाच्या मनात कर्णाला ठार मारावयाचे होते परंतु, तो योग नव्हता. त्यानंतर कर्ण भिमाचे कवच फाडून टाकतो. त्यानंतर तो सगळ्या तुझ्या सैनिकांसमोर त्याला अनेक बाण मारून बेजार करतो. त्यानंतर भिम कर्णाचे चिलखत फाडून टाकतो. त्याच्यावर बाणांचा मारा असा करतो कीं, तो अस्वस्थ व्हावा पण ते होत नाही. भिमाची शरीराची ताकद फार जास्त असते. त्यानंतर पुन्हा कर्ण भिमाला सोडून जातो. भिम पहातो कीं, कर्ण चालत रणभूमी सोडून जात आहे, त्याच्यावर तो बाणांचा वर्षाव करतो. दुर्योधन ते पहात असतो, तो त्याच्या लोकांना आज्ञा करतो कीं, ते कर्णाला संरक्षण देतील. ती आज्ञा ऐकल्यावर त्याचे भाऊ भिमावर चाल करतात. त्यात तुझे पुत्र होते त्यांची नांव आहेत, चित्र, उपचित्र, चारूचित्र, शरशण, चित्रायुध, चित्रवर्मन. ते सगळे उत्तम योद्धे होते. परंतु, वृकोदर त्या सगळ्यांना भारी गेला. त्यांना तो ठार मारतो. जमिनीवर ते मरून

पडलेले पाहून दुर्योधनाला रडू कोसळते. कर्णसुद्धा ते मरत असतांना पहातो, त्याला विदूराचे शब्द आठवतात. तो एका दुसर्या रथात चढतो व भिमाशी लढण्यासाठी निघतो. पुन्हा त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. ते एकमेकांना बाणाने भोसकू लागतात. त्यानंतर भिम कर्णाचे कवच फाडून टाकतो. कर्णसुद्धा भिमावर पन्नास बाण मारतो. रक्तचंदनाचे लेप लावलेले ते दोघे योद्धे रक्तानेसुद्धा तसेंच माखलेले होते. त्यांचे एकमेकांना बाण मारणे चालूच होते. ते बाणांच्या फेर्या मारत असतांना त्यांचे रथ सुद्धा एकमेकां भोवती गरगरा फिरत होते. पूर्वीच्या काळी जसे शक्र व विरोचनाचा मुलगा प्रह्लाद लढत होते तसे त्यांचे द्वंद्व होत होते. भिमाची बाणबाजी पाहून दुर्योधनसुद्धा चकीत झाला. भिम इतका हुशार कधी झाला धनुर्विद्येत असा त्याला प्रश्न पडला. कर्णाच्या भोवती एक बाणांचा पिंजरा त्याने तयार केला होता. ते द्वंद्व पार्थ व कृष्णसुद्धा पहात होते, असें क्षणभर वाटले अर्जुनाला कीं, कोणी गंधर्व भिमाच्या अंगात शिरून ते सगळे करत आहे. तुझा मुलगा भयंकर खिन्न झाला होता भिमाचे शौर्य पाहून.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे तेहतिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व
## भाग एकशे चौतिसावा

संजय पुढे सांगतो, पुन्हा एकदा भिमाच्या धनुष्याचा ठणत्कार कर्णाला ऐकू आला व तो पुन्हा अस्वस्थ झाला. चिडलेल्या हत्तीसारखा चावताळत तो त्याच्या नव्या रथातून चालून जातो. ते खाली मरून पडलेले तुमचे पुत्र पहातो त्याला रडू येते. त्याचा श्वास जोरांने होऊ लागतो. छाती वर खाली होत असते, संताप अनावर झालेला होता. पुन्हा एकदा बाणांच्या फेर्या सुरू होतात. परंतु, त्या दिवशी भिमाचे भाग्य बलवत्तर होते, त्याची पुन्हा सरशी होत असते कर्णापुढे. कर्ण त्याची पराकाष्ठा करत होता, कर्ण त्याचे पिसं लावलेले बाण आकाशात मारत होता. ते खाली येतांना भिमाला लागावेत असे होते परंतु, ते आजूबाजूला सुद्धा पडत होते व इतर लोकांना विशेषकरून तुमच्या लोकांना लागून त्या फटक्याने अनेक वीर मारले जात होते. जीवाची पर्वा न करता तो अधिरथाचा मुलगा भिमाशी लढत होता. त्याच प्रमाणे भिम सुद्धा बेपर्वा होऊनच त्याला लढवत होता. कर्णाचा मारा आकाशातून व समोरून असा दुतर्फा होता पण भिमासा त्याची पर्वा नव्हती, तो नेहमीप्रमाणे बिनधास्त होऊन तिरंदाजी करत होता. भिमाची तिरंदाजी पाहून तुमचे योद्धेसुद्धा अतिशय आनंदी झालेले दिसत होते. कारण ते सगळे एका नात्याने परस्परांचे नातेवाईक सुद्धा होतेच. कौतुक करणार्यांत भुरिश्रव, कृप, अश्वत्थामा, सल्य, उत्तमौजस, युधमन्यू, व त्यांच्यातील केशव, अर्जुन व इतर असंख्य शूरवीर होते. शाब्बास, शाब्बास असें ते सारखे उत्तेजनार्थ मोठमोठ्याने ओरडत होते. पांडवांचा उत्साह द्विगुणित झाला होता त्या उलट कौरवांचा गट खिन्न झाला होता. तो गदारोळ जास्तच झाला तेव्हां दुर्योधनाला ते रुचले नाही. तो त्याच्या पक्षातील राजांना विनंती करतो कीं, ते कर्णाला भिमापासून वाचवण्यासाठी कांहीतरी करतील. नाहीतर अशारितीने होत राहीले तर कर्ण मारला जाईल. ते ऐकल्यावर त्यांच्यातील सात जण पुढे होतात कर्णाला मदत करण्यासाठी. ते भिमाला वेढा घालतात. त्यांचे शरसंधान सुरू होते. ते सात जण भिमाला बाणांने झोडून काढू लागतात. भिमाच्या त्या प्रत्येक बाणामागे त्याच्या जुन्या आठवणी होत्या. त्यामुळे त्या

आठवणी एकाद्या शापाप्रमाणे काम करत होत्या. त्या शापामुळे ते बाण विशेष प्रभावी ठरत होते. विशेष तीव्रतेने ते बाण तुमच्या मुलांच्या अंगात खोलवर घुसत होता त्यांच्या उराचा भेद करत होते. कांहीं बाण त्यांच्या इतर महत्वाच्या अवयवांना बाद करत होते. ते तुमचे सात मुलगे त्यात मारले जातात. दुर्योधनाच्या अविचारीपणामुळें तुझे आणखीन मुलगे मारले जातात. त्यात शत्रूंजय, शत्रूसह, चित्रक, चिक्षयुध होते. त्याशिवाय धृढ, चित्रसेना, विकर्ण सुद्धा त्या धमासान युद्धात मारले जातात. त्यातील विकर्ण भिमाला प्रिय होता त्याच्या मृत्यूचे त्या पांडवाला दुःख होते पण ती वेल दुःख करण्याची नव्हती. भिम मोठ्याने बोलतो कीं, सगळे कौरव मी ठार मारीन अशी प्रतिज्ञा मी केली आहे त्या प्रमाणे होत आहे. असे बोलून तो विकर्णाला श्रद्धांजली देतो. त्या हत्या कर्णाच्या समक्ष व त्याच्या कारणाने झाल्या होत्या ते कर्णाला विशेष लागते. त्यानंतर भिम एक मोठी गर्जना करतो. त्या मोठ्या गर्जने द्वारा तो युधिष्ठीराला कळवतो कीं ते जिंकत आहेत. त्यानी तो पांडवांचा ज्येष्ठ समाधानी होत असतो. ती गर्जना त्याला एकाद्या सुमधूर संगीता सारखी वाटली. त्या नव्या उत्साहाने प्रेरीत झालेला युधिष्ठीर नव्या दमाने द्रोणांवर चालून जातो. दुसर्या बाजूला त्याचे तीस बंधू मारले गेले ते समजल्यावर दुर्योधनाला विदूरांचे शब्द आठवतात. त्याला दिसते कीं जे ते सांगत होते ते प्रत्यक्ष घडत आहे. तरीसुद्धा त्याचा हट्ट कमी होत नव्हता. दुर्योधनाला सभेत घडलेला प्रसंग चांगलाच आठवत असतो. द्रौपदीचा व पांडवांची केलेली निर्भत्सना त्याला आठवते, त्यात कर्णाचे वागणे त्यावा आठवते, जसे करावे तसे भरावे, अशी म्हण आहे तिची प्रचीती त्याला येत होती. गेल्या तेरा वर्षाचा काळ ते कौरवांचे वागणे सहन करत होते. आता भिमाच्या रुपाने ते सगळे बाहेर येत होते. "जशास तसे", ह्या निसर्गाच्या नियमाची प्रचीती त्याला येत होती. तुझ्या मुलांचे वागणे व तुझे त्याला असलेले छुपे प्रोत्साहन असे सगळे आता फलत होते. त्यावर दुःख कां करावे? तेव्हां विदूरानी, भिष्मांनी, द्रोणांनी दिलेले संदेश तू व तुझ्या मुलांनी झुगरून दिले म्हणून आता हि परिस्थिती उद्भवली आहे. त्याची जबाबदारी तुमच्यावर आहे कारण आपण घरातील ज्येष्ठ आहात. आता भाग्याला दोष देणे कितपत श्रेयस्कर ठरेल? अरे राजा, आता दुःखसुद्धा करू नकोस कारण काळाची पावलं उलटवता येत नाहीत. तूंच तुझ्या

मुलांचा वध करत आहेस असे मला वाटते भिम केवल कारणमात्र आहे. जे विषारी झुडूप तू लवलेस त्याची ही विषारी फळ आहेत. जे मेले ते दिसले आता जे उरलेले आहेत त्यांची केव्हा पाळी येते ते पहावयाचे आहे.

त्याशिवाय भिम व कर्णाच्या बाणांच्या भडिमाराने कित्येक मरत आहेत त्यांची गणना करता येणार नाही.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे चौतिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे पस्तिसावा

धृतराष्ट्र बोलतात, "अरे सुता, संजया, तू म्हणतोस ते खरे आहे. ह्या सगळ्याला मीच कारणीभूत आहे हे मान्य करतो. जे झाले ते झाले आता मी काय करावे ते तू मला सांग. संजय बोलतो, आता सांगतो पुढे काय झाले. कर्ण व भिम त्यांचे बाण फेकत होते. भिमाच्या बाणांवर त्याचे नांव होते. ते बाण कर्णाच्या सर्वांगात घूसत होते. त्याच प्रमाणे कर्णाचे बाणसुद्धा भिमाच्या अंगात जात होते दोघे समसमान होते. त्यांचे धारदार बाण इतरांच्या अंगावरसुद्धा पडत होते त्यामुळे तुमच्या सैनिकांची पळापळ होत होती. कारण तेथे पांडवांचे सैनिक फारसे नव्हते. त्याच तुमचे हत्ती व घोडे मारले जात होते. कित्येत योद्धे केवळ अपघाताने त्यांच्या धुमश्चक्रीत मारले जात होते. त्यांच्या प्रेताचे ढीग लागले होते त्या रणभूमीत. त्या पळून जाणार्यांत सिंध, सौवीर आणि कौरवांचे सैनिक होते. त्या दोघांच्या भोवतीचा प्रदेश त्यामुळे मोकळा झाला होता. सगळे सैनिक त्यांच्या पासून एक कोस दूर जाऊन ते द्वंद्व पहात होते. ती रणभूमी मेलेल्या सैनिकांनी, हत्तीनी व घोड्यानी भरलेली होती. मरणाच्या तोंडावर असलेले कित्येक शेवटचे कण्हत होते. त्यांच्या अंगातून वाहणार्या रक्ताची नदी झाली होती. त्यामध्ये मोडलेले, आगीने पेटलेले असे अनेक रथ व त्यांचे तुटलेले भाग होते. त्या आगीतून धूराचे लोट निघत होते. शरीराचे भाग पडलेले दिसत होते. त्यावरील दागिने सूर्याच्या उन्हात चमकत होते. मेलेल्या सैनिकांची विविध शस्त्रं इतर आयुध विखरून पडलेली होती. त्यात धनुष्य, बाण, गदा, काटेरी गदा, सोटे, भाले, शर, शत्रूघ्नी असे विविध होते. मेलेल्या राजांचे मौल्यवान दागिने, मुकूट, शाली, कमरपट्टे असे पोषाख तेथे पडलेले होतो. मुंडके नसलेली शरीर व शरीर नसलेली मुंडकी बरीच पडलेली होती. त्या दोघांच्या द्वंद्वामुळे हि हानि झालेली होती जी एरवी अनेक योद्धे लढतात तेव्हां साधारणपणे होत असते. आकाशातील चरण, सिद्ध, देव अशा अमानवी प्रजाती तो सोहळा मोठ्या कौतुकाने पहात होते. दोन उन्मत्त हत्ती जसे वनाची नासधूस करतात तसे झाले होते. जयद्रथ वध पर्व भाग एकशे पस्तिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे छत्तिसावा

संजय पुढे सांगतो, कर्ण भिमावर असंख्य बाण मारतो परंतु, त्याचा कांहींच परिणाम भिमावर झाला नाही. भिम कर्णाच्या कानात एक काटेरी बाण मारतो. त्यामुळें कर्णाच्या कानातील कर्णकुंडलं निखळून खाली पडतात. ते खाली पडले आहेत हे पाहून वृकोदराला हसू आले. त्यानंतर तो त्याच्या छातीत बाण मारतो. त्यानंतर भिम कर्णाला दहा विषारी बाण मारतो. ते त्याच्या डोक्याला लागतात. कर्णाला भोवळ येते तो रथाचा दांडा पकडून तसांच दांडा धरून बसतो. त्याने त्याचे डोळे मिटलेले असतात. लवकरच तो सावध होतो. त्यानंतर नव्या जोमांने तो वृकोदराच्या रथावर धावून जातो. त्याचा राग अनावर असतो. भिमावर हजार बाण मारतो जे गिधाडाच्या पिसाने सजवलेले होते. त्यांचे तिरंदाजी द्वंद्व तसेंच होत होते. ते दोघे त्याच्या तळहाताच्या चापट्यांचे आवाज करून एकमेकांना आव्हान देत होते. पुन्हा भिम कर्णाचे धनुष्य मोडतो. त्यानंतर तो विजयाची आरोळी ठोकतो. मोडलेले धनुष्य तो टाकतो व त्याहून मजबूत दुसरे धनुष्य घेतो. त्या कुरुंच्या सौवीरांच्या आणि सिंधू देशाच्या लोकांचे संहार पाहून कर्णाला भयंकर राग येतो. त्याचा नवीन तिरकमटा तो ताणतो. त्याच्या हाताची चपळाई अशी होती की त्या हालचाली कोणाला नीटपणे दिसत नव्हत्या. कर्ण बाण मारतांना स्वतःभोवती गोल फिरत होता त्यामुळें त्याचे बाण चोहो दिशांना फेकले जात होते. त्याच्या असंख्य बाणामुळें प्रसंगी सूर्याचा प्रकाश झाकला जात होता त्यामुळें भरदिवसा अंधार होत होता. त्या पद्धतीने त्याने किती तीर मारले त्याची गणना करता येणार नाही. त्याचे सगळे तीर गिधाडाच्या पिसाने सजवलेले होते. त्याच्या टोकाला धारदार दगड होते. ढगाने पर्वत झाकले जातात तसा भिम त्याच्या बाणांच्या वर्षावाने झाकला जात होता. त्याची पर्वा न करता भिम त्याच्यावर चाल करत होता. जवळ आल्यावर तो चटकन त्याचे धनुष्य ताणून आकाशात बाणांचा असा वर्षाव करतो कीं, इंद्रधनुष्य दिसू लागते. ते बाण खाली येतांना ज्यावर पडत ते नष्ट होत असें. त्यांच्या बाणांने सगळे आकाश अंधःकारमय झाले होते. जसे पावसाळ्यात होते ढगांमुळे. कर्ण

त्याच्या बाणांनी भिमाला बांधून ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. त्या दोघांचे विरुद्ध दिशेने जाणारे बाण एकमेकांवर आदळत होते व त्यामुळें ठिणग्या पडत होत्या. भिमाला मारून टाकण्याच्या उद्देशाने कर्ण धारदार बाण मारत असतो परंतु, भिम ते सगळे उलटवत असतो. त्यांचे असे द्वंद्व सतत न थांबता चालू होते. त्यांच्या धनुष्याच्या दोरांचे टणत्कार मोठ्याने ऐकू येत होते. त्याशिवाय त्यांच्या ओरडण्याचे आवात सुद्धा मोठे होते. त्यात रणवाद्यांचे आवाज भर घालत होती. रथाच्या चाकांचे गडगडाट त्यात भर घालत होती. त्यांचे द्वंद्व असे होते कीं, सगळे दोनही बाजूचे योद्धे लढण्याचे थांबून ते द्वंद्व पहात बसले होते. त्याशिवाय आकाशातून ऋषी, देव, चरण, सिद्ध, विद्याधर, गंधर्व सुद्धा ते पहाण्यात रमले होते. विशेष म्हणजे त्या द्वंद्वांमुळें ते दोघे सोडून इतरांचेच जास्त नुकसान होत होते. ते दोघे एकमेकांचे बाण तोडणे, उलटवणे असे प्रकार करत होते. त्यामुळे एकादाच बाण त्यांना लागत असें. कर्ण एक बलशाली बाण मारतो परंतु, भिम तो मोडून टाकतो. जर तो मोडला नसता तर त्या बाणांने भिमाचा मृत्यू निश्चित झाला असता. त्यानंतर कर्ण पहिल्या प्रथमच त्या द्वंद्वांत भिमाचा बाणांचा भाता फेकून देतो, जे करणे सोपे नव्हते. त्याच्या घोड्याच्या मानेवर तो बाण मारतो ज्यामुळे घोडे व्यवस्थितपणे धावू शकत नाहीत. त्यांनंतर कर्ण भिमाच्या सारथ्याला जखमी करतो. तो सारथी तेथून पळून युधमन्यूच्या रथाकडे जातो. त्याने उत्तेजित झालेला कर्ण हसू लागतो. त्यानंतर तो भिमाचा ध्वज पाडतो. भिमाचा तिरकमटा गेल्यामुळे तो शर कर्णावर फेकतो. तो शक्तीमान शर कर्णाच्या गाडीवर तो फेकतो. कर्ण तो शर हवेतच तुकडे तुकडे करून टाकतो. त्याच्या मित्राच्या भल्यासाठी तो लढत होता. त्याचे भाग्य उजळत होते असें ऋषी समजतात कारण बराच काळ त्याला यश नव्हते. त्यानंतर कर्ण भिमाची ढाल तोडून टाकतो. एक तर जिंकावयाचे नाहीतर मरावयाचे हे सच्च्या क्षत्रियांचे ब्रीद कर्ण जपत होता. भिम त्या उलटणार्या भाग्यामुळे संतापला होता. त्याने त्याच्या हातातील तलवार कर्णावर फेकतो. त्या लांबसर तलवारीने कर्णाच्या धनुष्याचा दोर तुटतो. त्यानंतर ती तलवार मातीत पडते. कर्णाला राग येतो तरी तो हसत हसत दुसरे धनुष्य काढतो व त्याचा दोर लावतो. त्यानंतर कर्ण भिमावर असंख्य बाण मारू लागतो. भिम ते बाण चुकवण्यासाठी

आकाशात उड्या मारतो. त्यामुळें कर्णाचे नेम चुकतात. त्याला निराशा येते. भिम असाच आकाशात उडालेला असतांना कर्ण त्याच्या रथाच्या गच्चीत लपून बसतो. भिम त्याला हुडकून काढण्यासाठी कर्णाच्या ध्वजाच्या स्तंभावर, त्याला बाहेर येण्याची वाट पहात रहातो. जसे गरूड त्याच भक्ष्य पकडण्यासाठी झूग धरून बसतो तसा तो बसतो. भिमाची ती चाल सगळ्या ऋषी, देव, चरण, साध्य ह्यांना फार आवडते. त्याचा रथ, शस्त्रं, गेले होते तरी तो त्याचे शत्रूला पकडण्याचे कार्य करत असतो. त्यानंतर कर्ण भिमाकडे जातो जो त्याची वाट पहात असतो. कर्ण त्याचे हातापाईचे आव्हान स्वीकारतो. ते दोघे मल्लयुद्धासाठी सज्ज होतात. जसे प्राचीन काळी देव व दानवांत होत असतं. भिमाकडे शस्त्रं नसतात. कर्णाकडे असतात, त्या रणभूमीत हत्ती मरून पडलेले असतात ज्यांच्या मधून रथ काढणे शक्य नव्हते. त्या हत्तीच्या आड भिम लपून कर्णाला हुलकावण्या देत असतो. त्या मेलेल्या हत्तींच्या मोठ्या पोटांच्या आड तो लपत जात असतो, कर्णाला तो दिसत नसतो. कर्णाला त्याचा रथ त्या भागातून काढणे केवळ अशक्य असते. त्यावेळी सधी असूनही भिम त्यावर हल्ला करत नाही. भिम त्या ध्वजस्तंभाच्या मदतीने मेलेला हत्ती उचलतो. जसे मारुतीने द्रोणागिरी उचलला होता. कर्ण त्याच्या बाणांने त्या मेलेल्या हत्तीच्या चिंधड्या करतो. भिम ते तुकडे कर्णाच्या रथावर व घोड्यांवर फेकतो. त्या शिवाय तेथे जे फेकण्यासारखे होते ते सगळे तो कर्णावर फेकू लागतो. कर्ण मात्र ते सगळे त्याच्या बाणांच्या मदतीने छिन्नभिन्न करून टाकत होता. भिम त्याच्या मुठी आवळून कर्ण हातात सापडला तर त्याला आवळण्याचा विचार करत होता. परंतु, त्याला आठवते कीं, कर्ण हा अर्जुनाचा बळी आहे. त्यामुळे त्याला तो मारणे योग्य होणार नाही. कर्ण मात्र त्याला पकडण्याचा सतत प्रयत्न करत होता. कर्णाला सुद्धा त्याने कुंतीला दिलेले वचन आठवते कीं, तो एक अर्जुन सोडून इतर कोणत्याही पांडवाला मारणार नाही. अशारितीने ते दोघे आपापल्या वचनात अडकल्यामुळें वस्तुतः दोघेही सुरक्षित होते पण एकमेकांना सतावण्याचे थांबवत नव्हते. मेलेल्या हत्तींमध्ये फसलेल्या भिमाला कर्ण त्याच्या धनुष्याच्या टोकांने टोचतो. भिम ते धनुष्य कर्णाच्या हातून खेचून घेतो. त्यानेच तो कर्णाला डोक्यावर प्रहार करतो. ते करत असतांना तो हसत होता जरी त्याचे डोळे लाल झाले होते रांगामुळे. भिम त्याला

शिव्या देत असतो त्याच वेळी कर्णसुद्धा त्याला दुसर्या प्रकारच्या शिव्या देत असतो. कारण ते एकमेकांना ठार मारू शकत नाहीत. कर्ण भिमाला खादाड, बावर्जी, लढता येत नाही, बावळट, मूर्ख अशा शिव्या देत असतांना भिम त्याला हिजडा, भेकड, खादाड, बिनदाढीचा, कौरवांचा गुलाम, पळपुटा अशा शिव्या देत होता. लढणे व शब्दाची चकमक करणे ह्यातील फरक त्यांना लक्षात येतो व ते एकमेकाकडे पहात हसू लागतात. शिव्या देता येत नाहीत म्हणून ते एकमेकांचे उक्टे काढू लागतात. कोण दुसर्याला कौरवांचा गुलाम म्हणतो तर दुसरा भिमाला संन्याशी, वनवाशी अस बोलून हिणवण्याचा प्रयत्न करतो. कर्ण भिमाला बोलतो कीं, तो लढण्यापेक्षा रानातच जास्त चांगला शोभतो. तुम्ही पांडवानी जंगलातच राहीले पाहिजे. राज्य करणे तुझ्या भावाला कळत नाही. तुम्ही पांडव बावळट अहात. तुम्ही बावर्जीच चांगले शोभता. रानात पडलेली फळ वेचून खाणारे असे बरेच हिणवणारे उद्‌गार कर्ण भिमाला बोलतो. त्याच्या ढेरपोटावर विनोद करतो असे बराच काळ चालते. कर्ण त्यांचे लहानपणीचे सगळे प्रकार बोलून दाखवतो. भिम कांहीं न बोलता गुपचुप उभा असतो ते पाहून कर्ण त्याच्या धनुष्याच्या टोकांने पुन्हा एकदा टोचतो व मोठ्याने हसू लागतो. कर्ण त्याला ताकीद देतो कीं त्याने कधी त्याच्या सारख्याच्या बरोबर द्वंद्व करावयाचे नसते, नाहीतर असा अपमान होतो. नंतर त्याला सांगतो कीं, तो अर्जुन व कृष्ण जेथे आहेत तेथे जावे. कर्णाचे ते बाष्कळ उद्‌गार ऐकून भिमाला हसू येते. तो कर्णाला बोलतो, "अरे बिनबापाच्या, तू विसरलास कीं मी आज कितीतरी वेळा तुला चीत केले होते. तरीसुद्धा तू असा कसा बोलतोस तेंच मला समजत नाही. ह्या जगात इंद्राचे सुद्धा जय व पराजय सगळ्याने पाहिले आहेत. जर तू मला आव्हान देत असशिल तर कुस्तीचे आव्हान मला आवडेल कारण तो माझा प्रांत आहे. तिरंदाजी हा कांहीं माझा विषय नाही तरी त्यात मी तुला सतत मारत होतो ते शेवटी थोडे तुझे जमले म्हणून एवढा रुबाब करण्याचे कांहीं कारण नाही. ज्या किचकाला कौरव घाबरत होते त्याला मी एकादमात ठार मारले आहे तर तुझा काय विचार आहे, करणार कां माझ्याशी कुस्ती? ते ऐकल्यावर कर्णाला समजते कीं आता जास्त बोलण्यात अर्थ नाही कारण जर ह्यांने मला धरले तर माझी धडगत नाही. मग तो त्याचा फक्त अपमान करण्यातच समाधान मानतो. ते त्यांचे

बोलणे अर्जुन व कृष्णाच्या समक्ष होत होते. इतर बरेच योद्धेसुद्धा ते ऐकत होते. त्यानंतर कृष्ण अर्जुनाला खूण करतो व त्या प्रमाणे अर्जुन कर्णावर कांहीं बाण मारतो. ते बाण कर्णाच्या अंगात घूसतात. जसे बगळे क्रौंच पर्वतावर जातात. त्यानंतर तो कर्णाला भिमापासून दूर नेतो. त्याचा तिरकमटा भिमाने तोडलेला असतो. त्यानंतर परिस्थिती हाता बाहेर जाणार हे लक्षात आल्यावर कर्ण तेथून पोबारा करतो. भिमसुद्धा सत्यकीच्या रथात चढतो. ते सव्यसाची पहात असतो. त्यानंतर पळून जात असलेल्या कर्णाकडे नेम धरून तो एक बाण असा मारतो जसा यमाचा बाण आहे. तो बाण कर्णाचा पाठलाग करू लागतो. अश्वत्थामा ते पहातो तो एक बाण फेकतो व त्या अर्जुनाने सोडलेल्या बाणाला बाद करतो. तो कर्णाला वाचवतो. तो अपमान झाला असे समजून पार्थ अश्वत्थामावर बाण मारतो. त्याला आवाज देतो कीं, तू द्रोणांच्या मुला येथून जाऊ नकोस. माझ्याशी द्वंद्व करण्यास तयार हो. परंतु, अर्जुनाच्या बाणाने जखमी झालेला ते द्रोणाचा मुलगा कौरवांच्या गर्दीत लुप्त होतो. सव्यसाची पळून जाणार्या अश्वत्थामाच्या मागे जाऊ लागतो. त्यांच्यात फार अंतर नसते. त्याला तो मागून बाण मारत घाबरवत जात असतो. अश्वत्थामा त्याचे बाण टाळत कौरवांच्या फौजात लपण्याचा प्रयत्न करत असतो. त्यानंतर अर्जुन त्या कौरवांच्या सैन्याचा संहार करू लागतो. ज्यात असंख्य हत्ती, घोडे व माणसे होती.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे छत्तीसावा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे सदोतिसावा

धृतराष्ट्र बोलतात, दिवसेंदिवस माझ्या आकलन क्षमतेत अंधार वाढत आहे. माझे अनेक श्रेष्ठ दर्जाचे योद्धे यमाकडे पांडवांनी पाठवले आहेत. मला वाटते असे होण्याचे कारण, कालचक्र उलट दिशेने फिरत आहे. आता पहा, धनंजय त्याच्या त्वेषाने अश्वत्थामाच्या व कर्णाच्या संरक्षणा खाली असलेले माझे सैन्य धुडकावून आमच्या आतल्या गोटात आला आहे. मी समजत होतो कीं म्हणून कोणी आमच्या आतल्या गोटात शिरू शकणार नाही परंतु, ते झाले आहे कृष्णाच्या मदतीमुळे असेल कदाचित, अर्जुन व भिम आणि त्यांचा सत्यकी शिरले आहेत. त्यांची हिम्मत वाढली आहे. जेव्हां पासून मला समजले कीं, अर्जुन आतल्या भागात वावरत आहे माझी अस्वस्थता वाढली आहे. त्या विवंचनेमुळें मला भिती वाटते कीं, जयद्रथ वाचेल असे वाटत नाही. अर्जुनाचा अपराधी आहे तो सिंधचा राजा. जर तो पार्थाच्या तावडीत सांपडला तर कसा जीवंत राहील. मला असे आता वाटते कीं, तो माझा जामात आधीच मेला आहे. तू सांगण्यात हुशार आहेस तेव्हां पुढे काय होते ते मला सांग. अरे संजया मला समजून घ्यावयाचे आहे कीं, तो वृश्नी वीर सत्यकी कसा लढला आमच्या योद्ध्यांशी. जो अर्जुनाला मदत करण्यासाठी आपल्या गोटात घूसला आहे.

संजय सांगू लागतो, कर्णाच्या बाणामुळें घायाळ झालेला भिम अनेक वृश्नी योद्ध्यांबरोबर जात असतो. ते करत असतांना त्याच्या बाणांनी जो तुमच्या अनेक योद्ध्यांना मारत जात होता. भिम ते करत असतांना मोठ्या मोठ्याने गर्जना करत होता. त्यावेळी आपल्यातील राक्षस अलमवुष मोठ्या रागाच्या भरात त्याच्या सोन्याचे चिलथत घातलेला असा, सत्यकीवर चाल करतो. त्यांचे द्वंद्व भीषण होते आधी कधी पाहिले नाही असे होते असे आकाशातील प्रेक्षक सांगत होते. ते पहाण्यासाठी बाकीचे दोनही बाजूचे योद्धे आपापली शस्त्रं बाजूला ठेवून उभे झाले होते. इतके ते द्वंद्व विलक्षण प्रेक्षणीय होते. अलमवुष सत्यकीला दहा बाण मारतो. ते सगळे बाण सत्यकी तोडून टाकतो. पुन्हा तो राक्षस आणखीन बाण मारतो जे सत्यकीच्या अंगरख्यात घूसतात. त्यानंतर तो

सत्यकीच्या घोड्यांना इजा करतो. सिनीचा नातू त्यामुळे चिडतो व अलमवुषाचे चारही घोडे बाद करतो. त्यानंतर युयुधन अलमवुषाचे डोके उडवतो. ते द्वंद्व संपते. त्यानंतर सत्यकी अर्जुनाकडे निघतो. सत्यकी अर्जुनाकडे जात असतांना वाटेत तुझ्या सैन्याचा संहार करत असतो. त्याला कोणी अडवू शकत नाही. एकाद्या वादळासारखा तो पुढे जात असतो. त्याचे सिंधू जातीचे घोडे त्याची सदैव साथ देत होते. त्यांचे रंग चांदीसारखे चमकणारे होते. तुझा मुलगा दुःशासन सत्यकीचा आव्हान देतो. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. सत्यकी त्याला चांगलाच थकवतो. सत्यकी दुःशासनाच्या रथाचे घोडे मारतो. ते द्वंद्व पाहून अर्जुन व कृष्ण संतुष्ट होतात. ते सत्यकीला शाब्बासकी देतात.
जयद्रथ वध पर्व भाग एकशे सदोतिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे अडतिसावा

संजय पुढे सांगतो, त्रिगर्ताचा महान योद्धा ज्याचा ध्वजस्तंभ सोन्याचा होता, सत्यकी दुःशासनाला हरवल्यावर अर्जुनाच्या जवळ जात होता तेव्हां सत्यकीला अडवतो. त्रिगर्ताचे सैनिक मोठ्या संख्येने युयुधनाला वेढतात. त्रिगर्ताच्या योद्धाना तो घाबरत नाही. त्यांच्याशा तो झपाट्याने लढू लागतो. बाणांचे व धनुष्यांचे टणत्कार ह्याने आसमंत भरला होता. त्याला एकाच वेळी पन्नास युवराजांशी लढावे लागत होते. ते त्याच्या चौफेर उभे राहून एकाच वेळी त्याच्यावर बाणांचे वार करत होते तरीसुद्धा युयुधन त्यांना आवरण्यात यशस्वी होत होता. सत्यकीचे युद्धकौशल्य त्यावेळी सर्वांना जाणवत होते. तो कोणाही पेक्षा कमी नव्हता. त्याची बाण फेकण्यातील चपळाई विलक्षण होती. एकाच वेळी तो चारही दिशांना बाण फेकत होता व तेसुद्धा नेम न चुकता, हे त्याचे वैशिष्ट्य होते. तो त्यासाठी त्याच्या रथात गोल नाचत होता. तो नाच सुद्धा पहाण्यासारखा होता. त्याचे युद्ध कौशल्य पाहून ते त्रिगर्ताचे राजपुत्र तेथून पळून गेले. त्या लढाईत त्यांच्या पैकी कोणी दगावला नव्हता. त्यानंतर शुरसेनाचे योद्धे सत्यकीला भिडतात. त्यांच्याशी लढल्यानंतर तो कलिंगच्या योद्ध्याना भिडतो. कलिंगच्या जबरदस्त फौजांचा पराभव केल्यावर सत्यकी अर्जुना जवळ पोहोचतो. त्याला धनंजयाचे दर्शन होते त्यामुळे त्याला समाधान प्राप्त होते व तो शांत होतो. सत्यकी येत आहे ते प्रथम कृष्ण पहातो व पार्थाला सांगतो, "तो पहा आपला सत्यकी तुझ्याकडे येत आहे. तुझ्या पावलावर पावलं टाकत तो येत आहे. त्याची हिम्मत तुझ्या इतकीच आहे. तो तुझा मित्रसुद्धा आहे. तो कौरवांच्या योद्ध्याना सुक्या गवताच्या काड्या समान समजत त्यांना बाणांच्या आगीत जाळत येत आहे. त्याने कौरवांच्या सैन्याची अपरिमित हानि केली आहे. असा तुझा प्रिय दोस्त, शिष्य तुला मिळण्यासाठी येत आहे. त्याने येतांना वाटेत द्रोणांनासुद्धा पराभूत केले आहे. त्याशिवाय कृतवर्मनला सुद्धा पाणी पाजले आहे. असा तुझा मित्र तुला भेटण्यास येत आहे. युधिष्ठीराच्या आज्ञेने तो येत आहे. तो एकट्या हाताने सगळ्यांना हरवत आला आहे. अरे पार्था, तो तुला भेटण्यासाठी

आतूर आहे. तुझ्या शिष्याने एका रथातून एका दिवसांत अनेक लढाया यशस्वीरित्या लढल्या आहेत. त्याचा तुला व आम्हा सर्वांना रास्त अभिमान आहे. धर्माच्या मुलाने त्याला तुझ्याकडे पाठवले आहे तुला मदत करण्यासाठी त्याचा स्वीकार कर. कौरवांचे सैन्य हरवत तो एकटा आला आहे ज्याला तोडीसतोड कोणी कौरवांमध्ये नाही. सिंहासारखा तो सिनीचा नातू अनेक मुडदे पाडत, अनेक डोकी उडवत, अनेक हत्ती मारत, अनेक घोडे मारत तो तुझ्याकडे आला आहे. त्याने दुर्योधनाचे सैन्य पराभूत केले आहे. त्याने जलासंधाला मारले आहे. असा पराक्रमी सत्यकी तुझ्या भेटीस येत आहे. अर्जुन मात्र ते ऐकून नाराज झालेला दिसतो. तो कृष्णाला बोलतो, "अरे माधवा, युधिष्ठीर सतवताच्या संरक्षणाशिवाय कसा असेल त्याची मला काळजी वाटते. मी त्याला (सत्यकीला) युधिष्ठीराच्या सुरक्षिततेसाठी सांगितले होते तरी तो माझ्याकडे कां आला ते समजत नाही. सत्यकीने तेथेच रहावयाला पाहिजे होते. तो कसा आहे ते मला समजत नाही. तो द्रोणाच्या ताब्यात दिल्यासारखे झाले आहे. जर द्रोण त्याला कैद करू शकला तर मोठाच बाका प्रसंग आपल्यावर येणार आहे. सिंधचा राजा अजून आपल्याला दिसलेला नाही. अजून त्याला मारावयाचे बाकी आहे. दिवस सावकाशपणे संपत आला आहे. मला ह्या सगळ्या गोष्टींची चिंता वाटते. तेथे भुरिश्रव सत्यकीला अडवत आहे. त्यामुळें माझ्यावर फार जास्त जबाबदारी येऊन पडली आहे. जयद्रथाचा वध हे माझे आजचे मुख्य उद्दिष्ट आहे. सत्यकी थकल्यासारखा वाटत आहे त्याचा अर्थ तो हरला जाऊ शकतो. तो मला जास्त चिंतेचा विषय वाटतो. त्याच्याकडील शस्त्रांचा साठासुद्धा संपत येत आहे. त्याचे सारथीसुद्धा थकलेले आहेत. त्या उलट भूरिश्रव ताज्या दमाचा आहे. त्याच्याकडे शस्त्रसाठा विपूल आहे. अशा परिस्थितीत यश मिळवणे सोपे नाही. अभिमन्यूचे जसे झाले तसे त्याचे झाले नाही पाहिजे. ह्या सगळ्या गोष्टींचा सारासार विचार केली पाहिजे सत्यकीला कांहीं नवीन जोखीम सोपवण्या आधी. सत्यकीचे भाग्य बलवत्तर आहे आज हा त्यातल्या त्यात चांगला भाग आहे. माझ्या मते युधिष्ठीराने नेहमी प्रमाणे चुकीचे निर्णय घेतले आहेत. द्रोणाच्या हातात स्वताला सोपवून त्याने मोठी चुक केली आहे. द्रोण त्या उपाशी गिधाडा सारखा माझ्या भावाला ताब्यात घेईल तर ते मोठे अरिष्ट ठरेल.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे अडतिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकोणचाळीसावा

संजय पुढे सांगतो, अजिंक्य अशा सतवताला अर्जुना बरोबर पाहून भुरिश्रव अचानकपणे पुढे झाला. तो सत्यकीला बोलतो, माझे भाग्य आहे किं, तू माझ्या समोर आला आहेस आज. ह्या युद्धात माझी एक इच्छा आहे कीं, तुझ्याशी द्वंद्व करावे. जर तू युद्धातून पळालास तरच सुटशील नाहीतर तुला माझ्या मुळें यमसदनात जाण्याचा रस्ता मोकळा होणार आहे. तुला तुझ्या वीरतेचा मोठा गर्व आहे नां"? "मी दशर्ह घराण्याचा आहे, मी दुर्योधनाचा मित्र आहे. ते केशव आणि अर्जुन आज पहातील तुझा माझ्याकडून कसा पराभव होतो. माझ्या बाणांने मी तुला बरबाद करणार आहे. तुझा वध मी येथे केला हे जेव्हां त्या पांडवाला (युधिष्ठीर) समजेल तेव्हां त्याला पश्चात्ताप होईल कीं, त्याने तुला येथे कौरवांच्या आतल्या गोटात धाडले. पृथाचा मुलगा (धनंजय) आज माझी हिम्मत पहाणार आहे जेव्हां तो तुला मेलेला मातीत पडलेला पाहिलं. तुझ्या बरोबर द्वंद्व करण्याची माझी फार पूर्वीपासूनची इच्छा आहे. ती आज पुरी करणार आहे. जसे शक्र व वली लढले तसे आपण आज लढू नाहीतर तू बर्या बोलाने माझ्या पुढून पळून जा तरच तू जीवंत रहाशिल. तेव्हांच तुला समजेल माझी मर्दानगी. मी तुला मारल्यानंतर तू यमाच्या घरी जाशिल जेथे अभिमन्यू आधीच गेला आहे. रावणाच्या मुलाला (इंद्रजित) लक्ष्मणाने मारले तसे मी तुला मारणार आहे. ते झाल्यावरच तुम्ही सतवत लोक माझ्या ताकदीला समजाल. मी तुला मारले कीं, तू सरळ यमाकडे जाशिल. ते कृष्ण व अर्जुन पहाणार आहेत. म्हणून तू न घाबरता माझ्याशी लढण्यासाठी तयार हो. तुला ठार मारून मी त्या सगळ्या विधवांना आनंद देणार आहे ज्यांचे पती तू ठार मारले आहेस ह्या युद्धात. माझ्या दृष्टीक्षेपात आल्यानंतर तुझी सुटका होणार नाही. जसे छोटे हरण सिंहाच्या नजरेत आले तर निश्चितपणे मरणार तसे तुझे होणार आहे".

भुरिश्वराचे ते उद्धटपणाचे बोलणे ऐकल्यावर युयुधन हसत हसत उत्तर देतो, "अहो कुरील घराण्याचे, मी कधीच घाबरत नाही. आपण मला बोलण्याने घाबरवण्याचा प्रयत्न करू

नका. मला द्वंद्वाची भिती अजिबात वाटत नाही. उलट मला द्वंद्व करावयाला आवडते. मला तोच हरवेल जो माझी शस्त्र माझ्याकडून काढून घेईल. जोवर मी सशस्त्र आहे मी जिंकत राहीन. उगाच घमोंडखोरी कशाला करता, करून दाखवा जे तुम्ही बोलता. नाहीतर तुमचे बोलणे शरद ऋतुतील ढगांच्या गडगडाटा सारखे समजले जाईल. तुमचे ते फालतु बोलण्यांने तुम्ही माझी करमणूक चांगली करत अहात. ज्या द्वंद्वाची आपण फार दिवसांपासून अपेक्षा करत अहात ते द्वंद्व आताच कां नाही सुरू करत"? तुमच्याशी लवकरात लवकर द्वंद्व आरंभ करू. मी युद्धातून अजिबात पळणार नाही आणि तुम्हीसुद्धा पळण्याचा विचार करू नका".

अशारितीने ते एकमेकांशी हुज्जत घालत होते. त्या त्यांच्या हमरीतुमरी मुळे त्यांचा क्रोध क्षणोक्षणी वाढत होता. त्या भांडणाचे अखेरीस द्वंद्वात परिवर्तन झालेच. जसे दोन हत्ती झुंजावेत तसे ते होते. पहिला बाण रागाच्या भरात सत्यकीने मारला. त्यानंतर त्यांचे बाणद्वंद्व चालू झाले सगळ्यांच्या समक्ष. सोमदत्ताचा मुलगा भुरिश्रव व सिनीचा नातू लढू लागले. ते एकमेकांना बाणांच्या घेर्यात अडकवू लागले. ते दोघे एकमेकांना ठार मारण्याच्या इराद्याने लढत होते. भुरिश्रव सत्यकीवर दहा बाण मारतो. सत्यकी मात्र ते सगळे तोडून टाकतो हवेतच. ते दोघे उच्च कुलीन क्षत्रिय आपापले कौशल्य दाखवत होते. ते एकमेकांला बाणाने दखमी करत असतात. त्यांचे रक्त मातीत पडत होते. ते द्वंद्व एका प्रकारे द्युताचा खेळच होता. कोण जिंकणार व कोण हरणार ते कोण जीवंत रहाणार व कोण मरणार ह्यावर विसंबून होते. त्यात मधला पर्याय नव्हता. ते एकमेकाला शह देत होते बाणांच्या मार्फत, ते पहाण्यासारखे होते. त्यात ते जोर मिळण्यासाठी मोठ्या मोठ्याने ओरडत होते. सगळ्या कौरवांपुढे ते द्वंद्व होत होते. कौरवांचे लोक भुरिश्वराला उत्तेजन देत होते. कारण तेंच त्या ठिकाणी जास्त संख्येने होते. ते एकमेकांचे धनुष्य तोडत होते. एकमेकांचे घोडे जखमी करत होते. घोडे गेल्यामुळें ते जमिनीवर उतरतात व तलवारीने लढाई चालू रहाते. दोघांच्या हातात लांब तलवारी व रुंद ढली होत्या. ढाली बैलाच्या चामड्याच्या होत्या. त्यांच्या विविध हालचालीमुळें त्यांचे कसब उत्तम आहे ते समजत होते. दोघे तोडीस तोड होते ते स्पष्ट समजत होते. तलवारीचे वार चुकवण्यासाठी ते उंच उड्या मारत होते. त्या त्यांच्या

हालचाली पहाण्यासारख्या होत्या. कौरवांच्या सैनिकांपुढे ते द्वंद्व होत होते. त्यांच्या तलवारी तुटतात. मग ते ढाली बाजूला टाकून मल्लयुद्ध सुरू करतात. त्यासाठी ते मधूनच मुष्टीयुद्ध सुद्धा करत होते. दोघे उत्तम मल्ल सुद्धा होते. त्यांची त्यातील कसब विलक्षण होती. सगळे त्यांची युद्ध थांबवून हे द्वंद्व पहाण्यात गर्क झाले होते. कुस्ती करत असतांना ते विचित्र आवाज काढून जोर मिळवत होते. जसे पहाडावरील मोठे पशु करतात. कधी छातीवर जोराने हात मारून तर कधी डोक्याने टक्कर देऊन ते त्यांच्या शक्तीचा अंदाज घेत होते. कधी पेच टाकत होते. कधी मातीत लोळून ते लढत होते. कुस्तीचे सगळे डाव ते अजमावत होते. ताज्या दमाचा भुरिश्रव थकलेल्या सत्यकी बरोबर कुस्ती करत होता हे कृष्ण व अर्जुन पहातात. भुरिश्रव रागाने सत्यकीचा एक जोराचा फटका मारतो. कृष्ण पार्थाला सांगतो, "हे द्वंद्व समसमान नाही म्हणून त्याला रोकणे आवश्यक आहे. नाहीतर आपण आपला मोठा वीर विनाकारण घालवून बसू. तू सोमदत्ताच्या मुलावर बाणाचा वर्षाव सुरू करावा. भुरिश्वाराला त्याचा बळी घेऊ देऊ नकोस". अर्जुन त्याला उत्तर देणार तेवढ्यात तेथे जमलेले श्रोते अरेरे हाय हाय असे ओरडू लागतात कारण भुरिश्रव सत्यकीवर आणखीन एक जोराचा फटका हाणतो जो त्या थकलेल्या वृश्नीला सहन होत नाही. सत्यकी खाली कोसळतो. त्या थकलेल्या युयुधनाचे एक तंगडे पकडून सोमदत्ताचा मुलगा त्याला खेचू लागतो जसे सिंह हत्तीला खेचून नेत आहे. त्यानंतर भुरिश्रव त्याच्या म्यानातून तलवार काढतो. त्या तलवारीच्या मुठीने तो सत्यकीच्या डोक्यावर जोराचा प्रहार करतो. त्यानंतर तो युयुधनाचे शीर त्याच्या धडापासून कापण्याच्या तयारीत असतो. सत्यकीचे डोके भुरिश्वराने त्याच्या केसाने पकडलेले असते त्यामुळें जेव्हां सत्यकी गोल गिरकी घेतो तेव्हां भुरिश्वराचा नेम चुकतो. ते पाहून कृष्ण अर्जुनाला पुन्हा सांगतो कीं, "तो तुझा शिष्य मरणाच्या दाढीत सापडला आहे, कांहीं केले पाहिजे नाहीतर तो नाहक दुर्योधनाचा बळी ठरेल".

अर्जुन बोलतो कीं, तो केवळ वृश्नीला खेचत आहे. मनाने तो भुरिश्वराचे कौतुक करत होता कारण भुरीश्वर त्याचा जवळचा आप्त होता. पुढे तो बोलतो, "माझे लक्ष सिंधच्या राजावर आहे, मला ह्या द्वंद्वांत रस नाही. अजून तो मिळालेले नाही". ते बोलल्यानंतर

कृष्णाची आज्ञा प्रमाण मानणारा पार्थ भुरिश्वराच्या त्या हातावर त्याच्या गांडीवातून एक बाण असा मारतो कीं, ज्या हातात तलवार होती तो हात तुटून पडतो.

जयद्रत वध पर्व भाग एकशे एकोणचाळिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे चाळीसावा

संजय पुढे सांगतो, तो हात व त्या मधले दागिने आणि त्या हातात धरलेली तलवार खाली पडतात. ज्या हाताने तो सत्यकीचे मुंडके उडवणार होता तो हात आता मातीत पडला होता. भुरिश्रव संतापून अर्जुनाकडे पहातो. तो बोलतो, "तू अर्जुना हे काय केले आहेस, मी तुझ्याशी लढत नव्हतो. मग तू आमच्यात कां आलास"? ते तुझे कृत्य धर्माला धरून नव्हते. ते तू तुझ्या नैतिकतेच्या संरक्षक युधिष्ठीराला सांगणार आहेस कां? अशा प्रकारे दुसर्याच्या द्वंद्वांत हस्तक्षेप करावयाला तुला कोणी शिकवले? इंद्राने, कां द्रोणांनी कां कृपाचार्यानी? तू द्वंद्वाचे नियम चांगले जाणत असतांना ते कसे केलेस"? द्वंद्वातसुद्धा त्याला ठार मारता येत नाही जो घाबरलेला आहे, जो अज्ञानी आहे, जो शस्त्रहीन आहे, ज्याने क्षमा मागितली आहे, जो हार मानतो. तसे कांहीं नसतांना तू मध्ये कां आलास आमच्या द्वंद्वात"? "तू असे निषेदार्थ कृत्य केले आहेस म्हणून ते पाप ठरते. एकाद्या शुद्राचे ते कृत्य ठरते. तू असे करू शकत नाहीस पण केले आहेस. मनुष्य संगतीप्रमाणे वागत असतो. ज्याच्या संगतीत तू आहेस त्याच्या वाईट सवयी तुझ्यात प्रविष्ट झाल्या आहेत असे दिसते. त्या तुझ्या वृश्नी मित्रासाठी तू एका कुरुवर हात टाकला आहेस. तुला माहीत आहे हे अंधक, वृश्नी हलक्या कुळातील क्षत्रिय असतात, त्याच्याशी तुम्ही सोयरीक करता त्यामुळे तू असा बिघडला आहेस. अशा हलक्या कुळातील लोकांशी तू कां संबंध ठेवतोस".

अर्जुन त्याला बोलतो, "तुझ्या म्हातारपणामुळे तुझी अक्कलसुद्धा नाठी झाली आहे. द्वंद्वात दोघे समसमान अवस्थेत असले पाहिजेत. तू ताज्या दमाचा आहेस व हा वृश्नी दिवसभाराच्या कष्टाने थकलेला आहे अशा परिस्थितीत त्याच्याशी आत्ताच द्वंद्व तू उकरून काढलेस ते सुद्धा युद्ध नितीच्या विरुद्ध होते. त्याच्याशी तू जर दोघे समसमान हिम्मतीत असतांना केले असतेस तर ते रास्त होते. सत्यकीने तुझे आव्हान स्वीकारून त्याची हिम्मत दाखवली होती. राहता राहिला मुद्दा तुमच्या कुरु घराण्याच्या उच्चतेचा. पांडवांवर जे अन्याय झाले ते तुमच्या कुरु घराण्यातील लोकांनींच केले आहेत. तेव्हां

कोठे गेली होती तुमची श्रेष्ठता आणि कुलीनता? माझे गांडीव न्यायासाठी काम करते त्या प्रमाणे त्यानी न्याय दिला सत्यकीला, हेच सत्य आहे. वस्तुतः तो थकलेला आहे म्हणून तू जर त्याला वरदान दिले असतेस तर ते खर्या क्षत्रियाला शोभणारे ठरले असते. पण ते तू केले नाहीस. द्वंद्वातील इतर नियमांचेसुद्धा तू पालन केले नाहीस त्यात वयाची समानता, ताकदीची समानता, क्षमतेची समानता अशा बर्याच बाबतीत हे द्वंद्व अन्याय कारक होते. म्हणून मी कृष्णाच्या सल्ल्याने त्यात हस्तक्षेप केला. तू आम्हा दोघांना (अर्जुन व कृष्ण) चांगला ओळखत असतांना असे कसे बोलतोस त्याचे कांहीं भान आहे कां तुला? माझा धर्मशास्त्राचा अभ्यास चांगला आहे, मी कोणतेही गैरकृत्य केलेले नाही. मी युद्ध नितीप्रमाणे सत्यकीला न्याय दिला आहे. तू जर त्याला लाथ मारून गेला असतांस तर मी ते मान्य केले असते पण तू त्याला वध करण्यास निघाला होतास ते योग्य नव्हते म्हणून माझे कृत्य पुण्यकारकच आहे. सत्यकीची अजिंक्यता त्याच्या कुवतीने ठरली आहे. तू त्याला तो ताज्या दमाचा असतांना जर आव्हान दिले असतेस तर ते योग्य होते. पण तू त्याला तो थकलेला असतांना आव्हान दिलेस तेंच युद्ध नितीच्या विरुद्ध होते. जर अशा स्थितीत तू माझ्या समोर त्याला मारले असतेस व मी ते पहात राहिलो असतो तर ते माझ्यासाठी दोषपूर्ण ठरले असते. म्हणून मी तुझा हात थांबवला. मला हस्तक्षेप करावा लागला. म्हणून ह्याकरता तू मला दोष देऊ शकत नाहीस. खरे तर तू स्वतःला दोष द्यावयाला पाहिजेस. कारण तूंच युद्धाचे नियम तुझ्या द्वेषाच्या प्रेरणेने मोडत होतास".

संजय पुढे बोलतो, अशाप्रकारे त्यांच्यात बाचाबाची होत असते. भुरिश्रव सत्यकीला सोडून देतो व स्वताला प्रायश्चित्त करण्यासाठी निघून जातो. तो त्याच्या उरलेल्या डाव्या हातांने एक बाणांची शय्या तयार करतो. त्यानंतर ब्रह्मपदी जाण्याच्या तयारीला लागतो. त्याच्या आराध्य देवतेचे स्मरण करत तेथे बसतो. भुरीश्वर उपनिषदातील मंत्र उच्चारून मौनवृत्तीत ध्यान करू लागतो. त्याचे ते ध्यान पाहून सगळे कौरवांचे लोक धनंजयाला व कृष्णाला दोष देऊ लागतात. ते दोघे त्यावर कोणतीही प्रतिक्रीया देत नाहीत. गप्प बसून रहातात. जरी कौरव भुरिश्रवाचे कौतुक करत होते परंतु त्याला त्यात कांहीं आनंद वाटत नव्हता.

तुझे मुलगे धनंजयाला भुरिश्रवा वरून वाईट बोलत असतांना त्याकडे दुर्लक्ष करत तो सगळ्याना उद्देशून बोलतो, "सगळ्याना माझी प्रतिज्ञा ज्ञात आहे. अशी कीं, कोणाही

आमच्या बाजूच्या सदस्याला कौरवांचा कोणीही मारू शकणार नाही माझ्या समक्ष. त्या प्रमाणे जे घडले ते उचीत होते. त्या प्रतिज्ञेला लक्षात घेऊन तुम्ही मला समजू शकता कीं, मी कां भुरिश्रवाला झापले. त्यात माझ्या प्रतिज्ञेचा समावेश होतो. ते नितीशास्त्रानुसार उचीत झाले आहे म्हणून, त्यावर कोणी कांहीं भाष्य करण्याचे कारण नाही. जर अभिमन्यूचे मरणे तुम्हाला योग्य वाटत असेल तर माझे हे करणे त्यापेक्षा जास्त चांगले वाटावयाला पाहिजे तुम्हा सगळ्यांना. ते ऐकल्यावर भुरिश्रव त्याची मान खाली घालतो व अर्जुनाचे बोलणे योग्य आहे हे मान्य करतो. त्यानंतर अर्जुन त्याला बोलतो, "सालाच्या मोठ्या भावा (भुरिश्रव) जो मला माझ्या युधिष्ठीरासारखाच सन्माननीय आहे, भिम, नकूल व सहदेवा सारखा प्रिय आहे तसेंच मी तुझ्यावर प्रेम करत आहे. आता आमच्या सद्भावना घेऊन तू सिवी, उशीनर ह्यांच्याकडे शांत मनाने निघून जा. कृष्ण भुरिश्रवाला बोलतो, "तू नेहमीच यज्ञ करत आला आहेस. अग्नीहोत्र सांभाळत असतोस, म्हणून आता त्या पुण्यवंताच्या लोकात निघून जा".

संजय पुढे सांगतो, सोमदत्ताच्या मुलाने त्याचे केस सोडल्यावर सत्यकी उठून बसतो. त्यानंतर भुरिश्रवाचीच समशेर घेऊन तो त्यांचे डोके कापण्यासाठी पुढे सरसावतो. भुरिश्रव त्यावेळी ध्यानात गेला होता. युद्ध विसरला होता. तो आधीच मारल्या सारखा होता. सगळे पहाणारे योद्धे सत्यकीला "थांब, थांब", असे सांगत होते. त्यामध्ये सगळेच होते, जसें कृष्ण, अर्जुन, भिम, युधमन्यू, उत्तमौजस, अश्वत्थामा, कृप, कर्ण, वृशसेन, आणि जयद्रथ त्याला थांबण्याची विनंती करत असतांना भावनेच्या आवेगात युयुधन भुरिश्रवाचे डोके कापून टाकतो जेव्हां तो ध्यानात होता. ते डोके खाली पडते. ते पाहून कोणीही सत्यकीचे कौतुक करत नाही. सगळ्याना उलट वाईट वाटते. परंतु, आकाशातील प्रेक्षक मात्र त्याचे कौतुक करतात टाळ्या वाजवून. कांहीं योद्धे सत्यकीचे बरोबर आहे असे मत मांडतात. द्वंद्वाच्या नियमानुसार जे सत्यकीने केले ते योग्य होते कारण त्यात जो मरेल तो हरला असे होते. त्याप्रमाणे भुरिश्रव मेला म्हणजे सत्यकी जिंकला होता. त्यातील भावनांचा भाग वेगळा होता व व्यवहार वेगळा होता. जे प्रारब्धात ठरले होते ते घडले आहे. क्रोधातून माणसाच्या दुःखाना सुरूवात होत असते. विधात्याने ते अगोदरच तसे ठरवले होते ते झाले आहे. भुरिश्रवाचा वध सत्यकीच्या हाती होता तो झाला आहे असे ते सिद्ध

एकमेकांना सांगत होते, सत्यकी जोरांने सगळ्या कौरवांना उद्देशून बोलतो, "तुम्ही कौरव स्वताला उच्च समजता व तसा आव आणता, मग तुम्ही सहा जणानी मिळून अभिमन्यूला ठार मारलेत तेव्हां कोठे गेला होता तुमचा सुसंस्कृतपणा? मी म्हणालो होतो कीं, जो मला निःशस्त्र करील व मला लाथ मारील त्याला मी ठार मारीन त्याप्रमाणे ते सगळे भुरिश्रवाने केले माझ्या बरोबर त्यामुळे त्याला मी मारले ते नियमानुसार योग्यच ठरते. तुम्ही कांहीं केले तर त्याला कोणी विचारावयाचे नाही व आम्ही काही केले कीं त्यावर नियमांची चर्चा करावयाची ह्यात कोणता न्याय आहे"? मी असे पक्षपाती नियम मनणारा नाही. भुरीश्रवाची हत्त्या मी नियमानुसारच केली आहे त्याबद्दल फालतू चर्चा नको. पार्थाने जे केले भुरिश्रवाचा हात कापून तेसुद्धा योग्यच होते. तो त्याच्या प्रतिज्ञेचा भाग होता. तो भुरिश्रव सन्यास घेतो त्याच्याशी मला काय करावयाचे, मी माझ्या शत्रूला मारले आहे. मग त्याने सन्याशाची घोषणा केली त्याचा माझा कांहीं संबंध नाही. क्षत्रिय धर्मानुसार जे योग्यतेंच मी केले आहे. अनेक कौरव त्याला अनुमोदन देतांना दिसतात.

संजय पुढे सांगतो, सत्यकीचे जे स्पष्टीकरण दिले ते ऐकल्यावर कोणी कांहीं बोलले नाही. तरी सगळे भुरिश्रवाचेच कौतुक करत होते, कोणी सत्याकीचे कौतुक करत नव्हते. भुरिश्रवाने मंत्र म्हणत संन्यासाची दिक्षा घेतली होती त्याचे कौतुक होत होते. त्याने केलेले दान सगळे आठवत होते. भुरिश्रवाचे तेथे मातीत पडलेले शीर यज्ञात बळी दिलेल्या घोड्याच्या डोक्यासारखे दिसत होते. भुरिश्रवाचा देवांतसुद्धा मोठा बोलाबाला होता. कौरवांचा एक नामी योद्धा मारला गेला होता.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे एकेचाळीसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकेचाळीसावा

धृतराष्ट्र बोलतात, द्रोण, कर्ण, विकर्ण, कृतवर्मन, अशा सगळ्या बलाढ्य योद्ध्यांचा पराभव करणारा युयुधन, भुरिश्रवाकडून कसा मातीत दाबला गेला ते मला सांग. संजय सांगतो, ऐका त्याची माहिती, त्यामागे एक कथा आहे ती प्रथम सांगतो. मागे भूतकाळात सत्यकी आणि भुरिश्रव कसे जन्मले ते आपल्याला पहावे लागेल. ते समजले कीं, सगळे समजेल. ऋषी अत्रीला सोम नांवाचा पुत्र होता. सोमाचा मुलगा बुध होता. बुधाला एक पुत्र होता जो इंद्रासारखा तेजस्वी होता. त्याचे नांव होते पुरुरव. पुरुरवाला एक पुत्र होता त्याचे नांव होते अयुध. त्याचा मुलगा नहुष. त्याचा मुलगा ययाति जो राजर्षी म्हणून पुढे ओळखला जाऊ लागला. ययातिला देवयानी पासून यदू जन्मला. त्या यदू घराण्यात देवमिधा जन्मला. त्याच्या वंशात सुर जन्मला जो तिनही जगात ख्यातनाम होता. त्याच्या घरात वासुदेव जन्मला. सुर कार्तवीर्यासारखा पराक्रमी होता. त्या सुराच्या घराण्यात पुढे सिनी जन्मला. अहो राजन, त्या सुमारास देवकाच्या कन्येचे स्वयंवर योजले गेले होते. त्या लग्नासाठी सगळे क्षत्रिय जमले होते. त्या स्वयंवराच्या पणात सिनी सगळ्या क्षत्रियांना पराभूत करतो आणि देवकीला वासुदेवासाठी त्याच्या रथातून पळवून नेतो. देवकी त्याच्या रथातून जात आहे ते सोमदत्ताला पहावत नाही. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. ते अर्धा दिवस चालते. ते द्वंद्व पहाण्या सारखे होते. ते कुस्तीचे द्वंद्व होते. त्या कुस्तीत सोमदत्त जोराने जमिनीवर सिनीने फेकला. त्याची तलवार घेऊन व केसांने पकडून सिनीने त्याला एक लाथ मारली. ते सगळे राजे पहात होते. त्यानंतर सिनीने त्याला दयेपोटी माफ केले व सोडून दिले. त्यामुळें सोमदत्ताचा मोठा उपमर्द झाला होता. त्यामुळे तो तपश्चर्या करू लागला कीं महादेव प्रसन्न व्हावेत. त्याच्या घोर तपस्येमुळे महादेव यथावकाश प्रसन्न होतात. ते सोमदत्ताला विचारतात कीं, त्याला काय पाहिजे म्हणून तो ही तपस्या करत आहे. सोमदत्त बोलतो कीं, त्याला असा वर पाहिजे कीं, मला असा पुत्र व्हावा जो सिनीच्या मुलास (वंशजास) भर सगळ्यांच्या सभेत लाथ मारील. ते ऐकल्यावर महादेव तथास्तु असे बोलतात. आणि महादेव अंतर्धान पावतात. त्या आशिर्वादामुळे लवकरच

त्याला भुरिश्रव होतो. त्याप्रमाणे भुरिश्रव सिनीच्या वंशजास सगळ्यांच्या देखत लाथ मारतो. अशी कथा आहे त्या लाथाडण्या मागची. संजय पुढे बोलतो कीं, त्याने त्या मागची कथा सांगितली. तो सिनीच्या वंशज सत्यकी कोणाकडूनही हरणारा नव्हता. ते वृश्नी नेमबाजीत अव्वल होते. त्यांचे युद्धकलेचे ज्ञान पूर्ण होते. ते देवांकडून सुद्धा हरत नव्हते. ते दानव, गंधर्व कोणाकडूनही हरत नव्हतो. त्याची मति स्थीर असे त्यामुळे त्याच्यात गोधळ होत नसे. ते नेहमी योग्य निर्णय घेत असतं. म्हणून असे बोलतात कीं, वृश्नींच्या बरोबरीचे कोणी नाही. ते स्वतंत्र बुद्धीचे होते. त्याच्या वागण्या बोलण्यात सुसंस्कृतपणा असतो. ते वडीलधार्यांचा कधी अपमान करत नाहीत. ते सदैव अजिंक्य असतात. ते केलेल्या उपकाराची फेड करतात, ब्राह्मणांचा आदर करतात, खरे बोलतात, त्यांच्या मध्ये गर्विष्टपणा नसतो, त्याना त्याच्या यशाची गर्व नसतो. ते आस्तिक असतात, त्यांच्यात संयमीपणा असतो, ते दयाळू असतात, अशा उत्तम गुणांमुळें ते हिम्मतवान असतात. ते मोठी दिव्य करू शकतात. ह्यासाठी त्यांना पराभूत करणे कोणालाही शक्य नसते. तुम्हाला जे माहीत करून घ्यावयाचे होते सगळे सांगितले. परंतु, तेथे जे घडत आहे त्या मागे आपली वाईट धोरण कारणीभूत आहेत.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे एकेचाळीसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे बेचाळिसावा

धृतराष्ट्र बोलतात, भुरिश्रवाचा वध झाल्यानंतर पुढे काय झाले ते सांग. अर्जुन वासुदेवाला सांगतो कीं त्यांने घोडे दमटवले पाहिजेत जयद्रथाला पकडण्यासाठी. जेथे जयद्रथ आहे तेथे गेले पाहिजे. सूर्य मावळतीकडे जात आहे, आपल्याकरता फार थोडा समय उरलेला आहे. त्याच्या संरक्षणार्थ अनेक कुरु योद्धे नेमलेले आहेत त्या सगळ्यांना मारत मला त्याच्यापर्यंत जावे लवागणार आहे. तरच मी माझी प्रतिज्ञा पूर्ण करू शकेन. ते बोलल्यावर कृष्ण त्यांचे चांदी सारखे चमकणारे घोडे त्या दिशेने पळवतो. जयद्रथाच्या भोवती दुर्योधन, कर्ण, वृषसेना आणि जयद्रथ स्वतः होते तेथे ते जातात वेगांने. विभत्सू जयद्रथाला पहातो त्याच्या डोळ्यांतून रागाचे अंगार बाहेर पडू लागतात. दुर्योधन कर्णाला बोलतो. अरे विकर्तनाच्या मुला, आता युद्धाची वेळ आली आहे. आता तुझ्या उत्तम युद्धकलेचे प्रदर्शन झाले पाहिजे. असा आपल्याला करावयाचे आहे कीं, कोठल्याही परिस्थितीत जयद्रथ मारला गेला नाही पाहिजे त्यामुळे दोन गोष्टी साध्य होतात. दिवस संपावयाला आला आहे. अर्जुनाला बाणांच्या युद्धात अडकवून ठेवावयाचे तुझे काम. एकदा कां दिवस मावळला कीं आपला विजय झाला असें समज कारण अर्जुनाला अग्नीकाष्ट भक्षण करावी लागतील म्हणजे पांडव हरल्यात जमा होईल. अर्जुन मेला कीं ते पांडव सुद्धा मरतील. त्यानंतर सगळी पृथ्वी आपली असेल. कांही घटकांचाच तर प्रश्न आहे, तेवढा वेळ त्याला तू युद्धात गुंतवून ठेव म्हणजे जय आपलाच. पार्थाने अविचाराने व भावनेच्या भरात ती प्रतिज्ञा केली आहे असे मला वाटते. मला वाटते ती प्रतिज्ञा त्याच्या नाशाची नांदी आहे. त्याचा नाश म्हणजे पांडवांचा नाश. तुझ्याकडून जर तो सुटला तर पुढे सल्य, कृप आहेत त्याला अडवायला. त्यापुढे अश्वत्थामा आहे. त्यानंतर दुःशासन आहे. असे बरेच योद्धे आहेत जयद्रथाला वाचवण्यासाठी. परंतु, तुझ्यावर माझी जास्त भिस्त आहे. येथेच त्याला थकवले कीं पुढचे काम सोपे होईल. ते पाहा सूर्य क्षितीजाला टेकला आहे. फार थोडा अवधी आहे त्या पांडवाला त्याचे वचन पुरे करण्यासाठी. ते ऐकल्यावर कर्ण त्याला बोलतो, "भिमसेनाने माझे शरीर फार वाईट प्रकारे जखमी केले आहे. तशा परिस्थितात

पार्थाबरोबर तिरंदाजी करणे मला कसे झेपेल ते पहावे लागेल. मी येथे रणभूमीत हजर आहे कारण मला हजर रहावयालाच पाहिजे पण माझी ती ताकद आज नाही हेंच सत्य आहे. भिमाने मारलेले बिषारी बाण माझे सगळे अंग भाजून काढत आहेत. तरी मी मला जमेल तितके चांगले लढण्याची कोशिश करीन. माझे आयुष्य तुझ्यासाठी आहे. परंतु ज्या स्वाभाविक मर्यादा असतात त्यांचे भानसुद्धा ठेवावे लागते म्हणून मी ते सांगितले एवढेच. कृपया गैरसमज करून घेऊ नकोस. मी माझी शर्थ करणार आहे. त्याला प्रथम मला मारावे लागेल नंतर तो पुढे जाईल एवढे मी पाहिन. मी तुझा हितचिंतक आहे, तुझ्यासाठी कांहींही करीन त्याबद्दल निश्चिंत अस. शेवटी भाग्यात जे असेल तेंच होणार आहे हे आपण सगळे जाणतो आहोत".

ते त्यांचे बोलणे होत असतांना अर्जुन त्याचे जोरदार शरसंधान सुरू करतो. ते फार भयंकर होते. त्याला विरोध करणारे सगळे तो वेगांने ठार मारत असतो. वाटेत जे येईल ते सगळे तो नष्ट करत असतो. त्याच्या भडिमारापुढे कोणाचाच टिकाव लागत नव्हता. घोडे, हत्ती असे सगळे मारले जात होते. विलक्षण शक्ती असलेले कांही वेगळ्या प्रकारचे बाण तो वापरत होता. रथाचे आंस तुटल्यामुळे रणभूमीत सगळीकडे रथांचा ढीग लागला होता व त्यावरील योद्धे कोठेतरी पळून गेले होते असे दिसते. तुमच्या योद्ध्यांची संहार करत तो पुढे वेगांने येत होता. त्याला जयद्रथावा वध करण्याची घाई झाली होते. तो आता जयद्रथाच्या समीप पोहोचला होता. अर्जुना बरोबर भिम व सत्यकी होते व त्यांचे हुशार सैनिक होते. ते अर्जुनाला संरक्षण देत होते. तुझे सैनिक त्यांना पाहून दूर जात होते त्यामुळें अर्जुनाचे काम सोपे होत होते. अर्जुनाचा जोर पाहून तुमचे मोठे मोठे योद्धे सुद्धा बाजूला होत होते. अर्जुन शेवटच्या आघाडी पर्यंत पोहोचतो. तेथे दुर्योधन, कर्ण, वृषसेन, सल्य, अश्रवत्थामा, कृप आणि स्वतः सिंधचा राजा जयद्रथ, अर्जुनाची वाट पहात होते. ते सगळे महायोद्धे जयद्रथाला वाचवण्यासाठी अर्जुन व कृष्णाला ठार मारण्याचे मनसुभे आखत असतात. त्यावेळी धनंजयाचा अवतार भयंकर होता साक्षात यमदेवता तो झाला होता. त्याचे त्याच्या रथात तांडव होत होते ते पाहून कोणीही भयचकित होत होते. त्याच्या धनुष्यातून विलक्षण असें ध्वनी उत्पन्न होत होते ते कोणालाही खच्ची करणारे होते. सूर्य संध्याकळच्या लाल रंगात अवतीर्ण झाला होता. त्यामुळे सगळीकडे लाल छटा

पसरल्या होत्या. कांहीं घटकांचाच समय उरला होता व जर त्या वेळांत अर्जुन जयद्रथाला मारू नाही शकला तर त्याला अग्नी काष्ठ भक्षण करावी लागणार होती. कृष्ण गालातल्या गालात हसत होता जसे काय त्याला माहीत होते काय विधात्याने ठरवले आहे. कौरवांनी अर्जुनावर बाणांचा भडीमार चालू केला होते असा कीं, तो पुढे येई नये. ते सगळे बाण विषारी होते. जर त्यातला एक अर्जुनाच्या शरीरात गेला तर तो तात्काळ बेहोष झाला असता. परंतु, अर्जुनाचे कवच अभेद्य होते व ते त्याच्या सर्वांगाला झाकत होते. त्यामुळे ते बाण व्यर्थ जात होते. त्या बदल्यात अर्जुनाच्या गांडीवातून मोठ्या प्रमाणात व मोठ्या वेगांनी अनेक प्रकारचे बाण सुटत होते ते कौरवांच्या महारथीना घायाळ करत होते. परंतु, त्यांची संख्या इतकी अफाट होती कीं, धनंजयाला पुढे सरकण्यास त्रास होत होता. अर्जुन आता प्रमुख योद्ध्यांवर त्याचे लक्ष केंद्रीत करतो. त्यात अश्वत्थामा पुढे येतो. तो अर्जुनाला दहा व कृष्णाला सात बाण मारतो. त्याच वेळी इतर योद्धे ज्यांचा मी आधी उल्लेख केला आहे ते पार्थाला आवरण्यासाठी पुढे सरकतात. दुर्योधन त्यांचे नेतृत्व करत असतो. अर्जुन त्याची दैवी आयुध वापरू लागतो त्यामुळे कृप, अश्वत्थामा, गोंधळून जातात. अर्जुनावर अश्वत्थामा वीस व वृषसेन सात बाण मारतात. दुर्योधन वीस व कर्ण आणि सल्य तीन बाण प्रत्यकी मारतात. ते सगळे जोर जोरांनी ओरडत त्यांचे बाण मारत होते. त्या सगळ्या योद्ध्यानी त्यांचे रथ अर्जुनाच्या रथाला वेढा दिल्या सारखे गोलाकारात उभे करतात ज्यामुळे कृष्णाला त्यांचा रथ पुढे नेता येत नाही. त्या सगळ्यांचे लक्ष सूर्याच्या क्षितिजावरील जागेकडे होते. सूर्य अजून क्षितिजाला टेकलेला नव्हता. दोनही बाजूंनी बाणांचे पाऊस पडत होते. त्यांमुळे कोणी कोणाला पाहू शकत नव्हते. कौरवांचे योद्धे सुद्धा त्यांच्या कडे असलेली दैवी आयुध वापरू लागतात. तरी तुमच्या योद्ध्यांचा नाश करत धनंजय ती तुमची फळी तोडून जयद्रथा पर्यंत पोहोचतोच. कर्ण भिमाच्या व सत्यकीच्या समोर अर्जुनावर बाणांचा मारा करत होता. पार्थ कर्णाला त्याच्या बाणाने भोसकतो. ते दहा बाण त्याच्या वर्मी लागतात. तो कळवळतो. भिम कर्णावर बाणांचा मारा चालू करतो. पार्थ कर्णावर सात जोरदार बाण फेकतो. कांहीं काल कर्णच त्यांच्याशी लढत होता असें दिसते. कर्ण एकटा अर्जुन भिम व सत्यकी अशा तिघांशी लढत होता. अखेरीस फाल्गुनी कर्णाला असे भोसकतो कीं तो गप्प होतो. त्याच्या सगळ्या

अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडतात. तरीसुद्धा तो अर्जुनावर पन्नास बाण मारतो. अर्जुन त्याच्या छातीत नऊ बाण मारतो. असें कीं त्याने कर्ण मेला पाहिजे. तेवढ्यात तेथे अश्वत्थामा येतो व कर्णाला मदत करण्यासाठी अर्जुनाचे बाण फोडण्याचे काम करू लागतो. त्यानंतर तो कर्ण एक नवीन धनुष्य घेतो त्यांन तो अर्जुनावर हजार बाण मारतो. टोळधाड असावी असें ते बाण त्यांच्यावर जाऊन पडतात. त्या दोघांत एक तुंबळ युद्ध सुरू होते ते सगळे पहात असतात त्यांचे इतर युद्ध थांबलेले असते. जोर जोरांने ते ओरडत नाचत बाणांचा वर्षाव करत असतात. त्यांचे बाण उंच आकाशात जाऊन खाली येत होते व त्यामुळे तुमच्या अनेक सैनिकांचे जीव जात होते. त्याच्या धनुर्विद्येचे कौशल्य सगळे पहात होते. आकाशातील प्रेक्षक त्यांचे कौतुक करत होते. त्यानंतर अर्जुन कर्णाचे चार घोडे मारून टाकतो. कर्णाच्या सारथ्याला सुद्धा इजा करतो. कर्णाचा रथ कुचकामी झाला होता. तो त्याला आधी झालेल्या जखमांमुळे व आताच्या मारामुळे बोहोष होतो. काही काळासाठी तो बाद होतो. आता अश्वत्थामा कर्णाची जागा घेतो. त्यानंतर सल्य पुढे येतात. अश्वत्थामा कृष्णाला आठ बाण मारतो. ते त्याला लागत नाहीत. तो धनंजयालासुद्धा वीस बाण मारतो. जयद्रथसुद्धा अर्जुनाला चार बाण मारतो. वृषसेन सुद्धा चार बाण मारतो. धनंजय त्या सगळ्यांना बाणाने जखमी करत असतो. द्रोणाच्या मुलाला चौसष्ठ बाण मारतो, सल्यावर साठ मारतो, वृषसेनाला व कृपांना वीस प्रत्येकी मारतो. पार्थ मोठ्याने आरोळी मारतो. तुमचे योद्धे जोराने सव्यसाचीवर चाल करतात. अर्जुन त्यावेळी वरुण अस्त्राचा प्रयोग करतो. त्यामुळे धृतराष्ट्राचे गोंधळू जातात. पार्थ सावधगिरीने त्याचा मारा करत पुढे सरकत असतो, त्याला त्यांच्यावर झालेले सगळे अन्याय आठवू लागतात. गेलेले राज्य पुन्हा मिळवण्याठी तो लढत होता त्याची त्याला जाणीव असते. वनवासात घालवलेले दिवस त्यांला आठवतात. त्याने गांडीवातून सोडलेल्या बाणामुळे सगळे आकाश अंधःकारणय होते. आकाशातून अशनि कोसळू लागतात. कावळे कोठून तरी येतात व मृतांच्या शरीरावर येऊन बसतात. अशी अभद्र दृष्यें दिसू लागतात. अर्जुन त्याच्या शत्रूंचा संहार करत असतो. जसे महादेव पिनाकाच्या मदतीने असुर, दानव दैत्य मारत होता. तो शत्रूघ्न योद्धा कौरवांचे मोठे योद्धे ठार मारत असतो. त्यानंतर कौरवांचे इतर राजे त्यांची दुसर्या प्रकारची आयुध जसे गदा, सोटे, मोठे सुरे घेऊन सव्यसाचीवर

चाल करतात. ते त्यांच्या वाहनावर (हत्ती, घोडे वगैरे) आरूढ होऊन येतात. ते त्यांचे स्वरुप विलक्षण घाबरवणारे असें होते. अर्जुनाला त्या रानटी योद्ध्यांचे हसून येते, तो त्यांचा सहजासहजी बेसहारा करून टाकतो. त्यामुळे यमाच्या राज्याची लोकसंख्या आणखीन वाढलेली असते.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे बेचाळिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे त्रेचाळिसावा

संजय पुढे सांगतो, अर्जुनाच्या गंडीवाच्या टणत्काराने तुमचे सैनिक घाबरून सैरावैरा पळत होते. सव्यसाची अशा रितीने लढत होता कीं तो एकाच वेळी अनेक ठिकाणी असावा असे वाटत होते. त्याच्या हाताची चपळाई अशी होती कीं, केव्हा त्याने बाण भात्यातून काढला व दोरीवर लावला समजत नव्हते. मंत्राने भारलेले ते बाण तुमच्या सैन्याची नासधूस करत होते. ते बाण आकाशात असतांना तेथे पहणेसुद्धा शक्य होत नव्हते. अर्जुनाचे मंतरलेले बाण कौरवांच्या बाणांना काट शह देत होते. ज्याचा मंत्र जास्त प्रभावी तो बाजी मारणार त्याप्रमाणे अर्जुनाचे बाण जास्त प्रभावी ठरत होते. ते मंतरलेले बाण तुमच्या योद्ध्यांचे प्राण शोषून काढत होते. कौरवांचे मोठे मोठे योद्धे ज्योतीपुढे किटक मरावेत असे मरत होते. पार्थ साक्षात यमदेव असे एकंदर स्वरुप होते. त्याच्या माथ्यावर मुकूट होता जो इंद्राने दिला होता. अंगावर दागिने होते जे क्षत्रिय नेसतात. तो त्याच्या बाणांने हत्तीवरील म्हात्रे मारून टाकत होता. तलवारधारी घोडेस्वार व पायदळीतील सैनिक तसेंच तुमच्या रथांचे सारथ्यांकडील चाबूक त्या मंतरलेल्या बाणांमुळे त्यांच्या हातातून खेचले जात व ते निःशस्त्र होत होते. पार्थ चमकत्या तार्यासारखा दिसत होता. त्याचे शत्रू त्याच्याकडे पाहूसुद्धा शकत नव्हते. त्याच्या विध्वंसक दैवी शस्त्रामुळे तेथे प्रचंड प्रमाणात प्राणी हत्त्या होत होती. त्यामध्ये अनेक तुमचे योद्धे सुद्धा होते. कोणाचे हात तुटलेले होते कोणाचे पाय तर कोणाचे मुंडके असे तुटून पडत होते. रथांचा चुराडा झाला होता. त्यात अनेक योद्धे अडकून गेलेले दिसत होते. ते मृत्यूचे तांडव होते. रुद्रांचे ते क्षेत्र झाले होते. मेलेल्या योद्ध्यांची डोकी त्यांच्या शिरस्त्राणासह तेथे पडलेली दिसत होती. कांहींचे दागिने तेथे विखुरलेले दिसत होते. ती रणभूमी भयंकर वाटत होती. अर्जुनाने केलेल्या संहारामुळे तेथे रक्ताची नदी वाहू लागली होती. जशी वैतरणा नदी असावी. त्यात कित्येक ध्वज व त्यांचे खांबे तरंगत असलेले दिसत होते. मोडलेल्या रथातील छत्र्या मोडून गेलेल्या तेथे त्यात तरगत होत्या. त्याशिवाय रथांची चाकं मध्येच अडमडत होती ज्यामुळे त्या रणभूमीत चालणे अथला रथ चालवणे अशक्य प्राय झाले होते. कोल्हे, तरस, लांडगे, सरभ असें

हिंस्त्र प्राणी तेथे वावरू लागले होते मेलेल्या प्राण्याना खाण्यासाठी. त्या संहारामुळे कौरवांत धडकी भरली होती. अधून मधून कोल्ह्यांचे ओरडणे ऐकू येत होते. जशी संध्याकळ जवळ येऊ लागली भूतं, राक्षस, पिशाच्च प्रेतावर बसण्यासाठी येत होती.

अर्जुनाने त्या संहाराद्वारा सगळ्या शत्रूंना दाखवून दिले होते कीं, तो एक जहाबाज योद्धा आहे. त्याच्याशी कोणी तुलना करू नये. जयद्रथाचा वध करण्याच्या उद्देशाने तो सगळ्या कौरवांच्या रथी महारथींना ओलंडून पुढे आला होता. त्यांना अचंबीत केले होते. त्यांच्या अपेक्षांपेक्षा जास्त वेगांने तो आत आला होता. तो चौफेर बाणांचा वर्षाव करत पुढे जात होता. कृष्णासारखा सारथी त्याला साथ देत होता. त्यांची घोडदौड पहाण्यासारखी होती. त्याचे बाण आकाशात सगळीकडे दिसत होते. त्याची बाण चालवण्याची चपळता विलक्षण होती. कधी बाण काढला व कधी दोरावर धरला कांहीं समजत नसे. जयद्रथ त्याच्या आवाक्यात आला होता. तो त्याच्यावर सेहेचाळीस बाण एका मागोमाग असें मारतो. कौरवांचे योद्धे पहातात कीं, अर्जुन जयद्रथावर मारा करत आहे. ते पाहून सगळे आपली लढाई थांबवून त्यांच्याकडे पहात रहातात. जे त्याच्यावर चालून जातात त्यांचे हाल होतात. त्यांना जखमानी तो भरून टाकतो. कित्येकांची तो डोकी उडवतो. खरोखरच त्याच्या त्या एकतर्फी हल्ल्याने तुमच्या चारही प्रकारच्या सैन्यात एकच हलकल्लोळ सुरू होतो. अश्वत्थामाला चाळीस व वृषसेनाला चार बाण मारतो. तो कृपावर सुद्धा कांही बाण फेकतो. सल्य व कर्णावर प्रत्येकी दोन व तीन बाण मारतो. जयद्रथावर चौसष्ट बाण मारतो. त्यानंतर तो मोठी जय गर्जना करतो. जयद्रथ त्या माराने चिडतो, तो अर्जुनाच्या रथाच्या दिशेने अनेक बाण फेकतो. ते विषारी होते. त्यानंतर तो कृष्णालासुद्धा तीन बाण मारतो. तो त्यानंतर अर्जुनाचे घोडे जखमी करतो. परंतु, अर्जुन ते सगळे बाण उलटवतो. त्याच वेळी तो जयद्रथाच्या सारथ्याचे डोके उडवतो. त्याचा ध्वजस्तंभ मोडून टाकतो. तो मोठा आवाज करत खाली कोसळतो. सूर्य बिंबाने क्षितिजाला स्पर्श केला होता. आता कांही क्षणांची मुदत उरलेली होती. जनार्दन अर्जुनाला सांगतो हे पहा पार्थ जयद्रथाने त्याचे सहा योद्धे आपल्यामध्ये ठेवलेले आहेत. त्यांचा परामर्श घ्यावा लागेल. तो पुढे सांगतो जयद्रथ घाबरलेल्या अवस्थेत लपण्याचा प्रयत्न करत आहे. त्या सर्व जणांचा प्रथम तुला नाश करावा लागेल. तेव्हां ते प्रथम कर. हे मोठे आव्हान आहे. पुढे कृष्ण सांगतो कीं, तो त्याची

भ्रमसिद्धी वापरणार आहे सुर्याचा अस्त लांबवण्यासाठी, तेवढ्यात पार्थाने त्याची प्रतिज्ञा पूर्ण करावी. त्याप्रमाणे तो कृष्ण सुर्य आधीच अस्त झाल्यासारखे भास उत्पन्न करणार आहे व त्यामुळे जयद्रथ बिनधास्तपणे पुढे येईल व त्यावेळी अर्जुनाने डाव साधावयाचा. असे त्या दोघांत ठरते. विभत्सू ते ऐकून कृष्णाला बोलतो, तसेच करू. त्या नंतर कृष्ण म्हणजेच हरी, त्याची सिद्धी वापरू लागतो. तो आकाशात अंधार उत्पन्न करतो जसे सुर्य मावळला आहे असे वाटावे. तुमचे लोक समजतात कीं, सुर्य मावळला आहे व अजून जयद्रथ जीवंत आहे त्या कल्पनेने ते बेहद्द खूष होतात. जयद्रथ पुढे येतो व अर्जुनाला अग्नीकाष्ठ भक्षण करण्याचा आग्रह करतो सगळे तुमचे लोक फार आनंदात दिसतात. त्याच वेळी सुर्य पुन्हा दिसू लागतो. ते पाहून तुमचे लोक आश्चर्य करत असतांना कृष्ण अर्जुनाला बोलतो कीं, आत्ताच डाव साध व त्याचे डोके उडव. कृष्णाचे बोलणे संपण्याच्या आधीच अर्जुन त्या जयद्रथाचे मुंडके एका बाणाने उडवतो. तेव्हा सुर्य क्षितिजावर दिसत होता. आणि त्यानंतर कांही क्षणातच तो अस्ताला गेला. त्यात अर्जुन सल्याला कृपाना व कर्णाला पन्नास बाण मारतो. वृषसेनाला आठ मारतो. मोठे तुंबळ युद्ध प्रारंभ होते. अर्जुन सुद्धा रागात त्याना तोंड देत असतो. अर्जुनाने केलेल्या बाणांच्या वर्षावामुळे त्रस्त झालेले तुमचे योद्धे जयद्रथाला तेथेच सोडून पळून जातात. अर्जुन कौरवांचे हत्ती घोडे व मायदळाचे सैनिक ठार मारत जातो. त्यावेळी इतकी धूळ हवेत उडालली असते कीं, कोणी कोणाला पाहू शकत नाही. त्यातूल कित्येक जखमी झालेले लंगडत तेथून दूर जण्याचा प्रयत्न करत असतात. जणू युगांत होत आहे असे वाटत होते. फार थोडेजण सुखरुप तेथून बाहेर पडू शकले. सगळी रणभूमी रक्ताच्या चिखलाने भरलेली होती. त्यात हत्ती घोडे व माणसे अशा सगळ्यांचे रक्त मिसळलेले होते. तो रक्ताचा चिखल इतका होता कीं त्यात रथाची चाकं अडकून जात होती. मरणार्यांचे किंकाळणे, ऐकवत नव्हते. सारथी नसलेले रथ वेडेवाकडे इतस्ततः फिरत होते. कांही रणभूमीच्या बाहेर गेले होते. पार्थ जयद्रथाच्या संरक्षक फळीच्या योद्ध्यांवर जोराचा मारा करू लागतो. त्यात कर्ण, द्रोणांचा मुलगा, कृप, वृषसेन, सल्य, दुर्योधन असे होते. तो कर्णाचा व त्याचा मुलगा वृषसेन दोघांचे धनुष्य मोडून टाकतो. सल्याच्या सारथ्याला मारतो. त्यानंतर तो कृपाना जबर जखमी करतो. त्यानंतर अर्जुन एक मंतरलेला बाण घेतो, त्यावेळी जनार्दन त्याला सांगतो

ताबडतोब जयद्रथाला ठार मार. सुर्य अस्ताला जात आहे. परंतु त्यात एक गोष्ट ध्यानात घे कीं त्याचे डोके जमिनीवर पडणार नाही. अर्जुन त्याला विचारतो, असे कां? तेव्हां कृष्णा त्याला जयद्रथाच्या जन्माची कथा ऐकवतो ती अशी, जयद्रथाचा पिता मुल व्हावे म्हणून नवस करत असतो त्याला जेव्हां जयद्रथ होतो तेव्हां एक आकाशवाणी होते कीं, त्याच्या मुलाचे डोके कोणी युद्धात उडवेल आणि ते जर जमिनीवर पडले तर ज्याच्या कडून ते डोके जमिनीवर पडेल त्याच्या डोक्याच्या चिंधडया होतील. अशासाठी पार्था तुला तुझ्या स्वर्गीय शक्तीचा उपयोग करून एक गोष्ट करावी लागेल कीं, ते जयद्रथाचे डोके त्याच्या पित्याच्या मांडीवर पडेल. त्यासाठी लक्षात घे कीं, जयद्रथाचा पिता वृद्धाक्षत्र हल्ली जवळच असलेल्या समंतपंचक क्षेत्रात तपस्या करत असतात. त्यासाठी जयद्रथाचे डोके तू असें उडवशिल कीं ते त्याच्या अंगावर पडेल व त्यानंतर जरी ते मातीत पडले तरी तुला धोका नसेल. ते समजल्यावर अर्जुन त्याची इंद्राने शिकवलेली विद्या वापरून त्या प्रमाणे जयद्रथाचे डोके मंतरलेल्या अशा बाणाने उडवतो कीं ते डोके त्या बाणात अडकलेले तेथून थेट समंतपंचक क्षेत्रात जाते. तेथे जयद्रथाचा सन्यास घेतलेला पिता वृद्धाक्षत्र संध्याकाळचे स्तवन करत ध्यानात बसला होता. त्याच्या मांडीवर येऊन पडते. ध्यान झाल्यावर निष्पापी असा तो वृद्धाक्षत्र उठतो तेव्हां त्याच्या मांडीवर असलेले ते जयद्रथाचे शीर मातीत पडते. त्याबरोबर वृद्धाक्षत्राच्या डोक्याच्या शतशः चिंधड्या होतात व तोसुद्धा मरून पडतो. ते पाहून आकाशातील सगळे, कृष्णच्या युक्तीचे कौतुक करतात.

जयद्रथ मारला गेला हे पहाताच कौरवांचे दोस्त संतापतात व अर्जुनावर हल्ला करतात. कारण त्याना समजते कीं, तो अंधार हा एक भ्रम होता व तो कृष्णाने लिलया केला होता. ते सगळे संतापतात. सिंधच्या राजाचे आठ अक्षौहिणी सैन्य अर्जुनाने नष्ट केले होते व आता त्यालासुद्धा त्यांने मारले होते. तुमची मुलं रडू लागतात. त्यांच्या राणीवसातून रडण्याचा आक्रोश ऐकू येऊ लागतो. दुर्योधनाचे आणखीन एक स्वप्न धुळीला मिळाले होते. ते सिद्ध झाले आहे ह्याची खबर युधिष्ठीराला कळवण्यासाठी कृष्ण त्याचे पांचजन्य वाजवतो. अर्जुनसुद्धा त्याचे वाजवतो. भिमसेन सुद्धा त्याचे वाजवतो. मोठा हलकल्लोळ होतो. पांडवांच्या बाजूचे आनंद व्यक्त करत असतांना तुमच्या बाजूचे रडत असतात कारण जयद्रथ कौरवांच्या एकुलत्या एक बहिणाचा पती होता.

मोठ्या उत्साहाने युधिष्ठीर द्रोणांच्या फौजेवर हल्ला करण्याचे ठरवतात. त्या दिवस मावळावयाच्या थोड्या काळात द्रोण व सोमकांच्या सैन्यात तुंबळ युद्ध होते. अर्जुनसुद्धा तुमचे योद्धे मारण्यास सुरूवात करतो. प्रतिज्ञा पूर्ण केल्याचा आनंद त्याच्या चेहर्यावर दिसत होता. जसें देवानी दानवांना मारले असे ते वाटत होते. सोळावा दिवस संपला होता.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे त्रेचाळिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे चव्वेचाळिसावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, मला सांग संजया, जयद्रथाचा वध अर्जुनाने केल्यानंतर माझे योद्धे काय करतात.

संजय सांगतो, जेव्हां ते घडते, कृप त्याची अपेक्षा करत नव्हते ते झाल्याने संतापतात. ते अर्जुनावर हल्ला करतात. ते बाणांचा वर्षाव करू लागतात कृष्ण व पार्थावर. अश्वत्थामासुद्धा त्यात भर घालतो. त्याच्या रथातून तो अर्जुनावर चाल करतो. त्यांच्या विषारी बाणांमुळे पार्थाला फार त्रास होतो. तरी अर्जुनाला कृपांचा वध करण्याची इच्छा नसते म्हणून तो थोडे आवरते घेतो. फक्त त्याना झुलकावण्या देत रहातो त्याच्या दैवी आयुधांच्या मदतीने. जरी सौम्य शक्तिचे ते होते ते ज्या जोराने मारले गेले होते त्यामुळे कृपाचार्यांना व अश्वत्थामा ह्यांना फार वेदना होतात. त्यामुळे ते बेहोष होतात व त्यांच्या गाडीत पडून रहातात. आपल्या रथाचे बेहोष झाले आहेत हे समजल्यावर ते सारथी रथांना घेऊन दूर निघून जातात. अशाप्रकारे आपले शिक्षक व गुरूबंधू बेहोष झाले आहेत ते पाहून अर्जुनाला वाईट वाटते व तो स्वगत बोलतो, "विदूरानी हे होणार असे फार पूर्वी पाहिले होते त्यांच्या दिव्य दृष्टीने, कीं, त्यांच्या घराण्याचा नाश त्यांच्याच कुलदीपक दुर्योधन करणार आहे. ते त्यांनी धृतराष्ट्राला सांगितलेसुद्धा होते पण लक्षात कोणी घेतले नाही. आता ते प्रत्यक्षात घडत आहे. ते बोलले होते कीं, त्याच्या मुळे आपल्या कुरील वंशाला फार वाईट दिवस येणार आहेत. त्यांच्यामुळे मला माझे आजोबा शरशय्येवर झोपलेले पहावे लागत आहे. क्षत्रियांच्या ह्या प्रवृत्तीचा मी निषेध करतो. धिक्कार असो अशा क्षात्रतेजाचा ज्यामुळे जिद्दीने आम्ही आमचेच लोक मारत आहोत व त्या बद्दल अभिमान करत आहोत. त्यामुळे आज मला एका ब्राह्मणावर बाण मारावे लागत आहेत व तेथे एक ब्राह्मण (द्रोण) आम्हा क्षत्रियांवर बाण मारत आहे. त्या सगळ्या गोष्टींमुळे मला फार त्रास होत आहे. पण मी ते थांबवू शकत नाही. माझ्या मुलाच्या वधामुळे मला जितका त्रास झाला त्यापेक्षा जास्त त्रास आता मला होत आहे. अरे कृष्णा मला सांग, जे शिष्य त्यांचे शिक्षण झाल्यावर आपल्या गुरूला योग्य दक्षिणा देतात ते देवपदाला जातात पण जे

शिक्षकाला असें जखमी करतात त्यांना कोणती गती मिळते? काय ते नरकात जातात हे खरे आहे कां? मला वाटते मी खरोखरच नरकात जाणार आहे. मी जेव्हां त्यांच्या कडून शिकत होतो तेव्हां ते बोलले होते, युद्धात सुद्धा तू तुझ्या शिक्षकाला जखमी करणार नाहीस. ती त्यांची आज्ञा मी आज पाळलेली नाही. मी त्यांची क्षमा मागतो. माझा धिक्कार असो". अशारितीने सव्यसाची दुःख व्यक्त करत असतांना, कर्ण तेथे येतो कारण त्याला समजले कीं, जयद्रथाचा वध सव्यसाचीने अखेरीस केला आहे. ते पाहून दोन पांचाल राजपुत्र व सत्यकी त्याना अडवण्यासाठी कर्णा पुढे होतात. अर्जुन कर्णाला येतांना पाहून स्मित हास्य करत कृष्णाला बोलतो, "तो पहा राधासुत सत्यकीकडे जात आहे. आपल्याला तेथे गेले पाहिजे. कर्णाला थांबवले पाहिजे नाहीतर तो सत्यकीला भुरिश्रवाकडे पाठवेल". ते ऐकून माधव त्याला उत्तर देतो, "तुझा सत्यकी कर्णाला पुरून उरणारा आहे. त्याची काळजी करू नकोस. सत्यकी एकटा नाही, त्याच्या मदतीला पांचाल सुद्धा आहेत. तूर्तास तू कर्णाच्या भानगडीत पडू नकोस. त्याच्या कडे एक ज्वलंत शर आहे जो जळत्या अशनिसारखा आहे. तो त्याला इंद्राने दिला आहे. कर्णाने तो तुला मारण्यासाठी खास राखून ठेवला आहे. त्याला सतवताकडे जाऊ दे. मला माहीत आहे कुंतीपुत्रा , त्याची जेव्हां वेळ येईल तेव्हांच त्याला तुझ्या बाणांने मारणार आहेस पण ती वेळ आता आलेली नाही. अशी घाई करू नकोस".

धृतराष्ट्र विचारतात, "मला सांग ते युद्ध कसे झाले? सत्यकी बेसहारा झाला होता, त्याचा रथ गेला होता तेव्हां तो कोणाच्या रथात चढला. त्याच प्रमाणे पांचाल पुत्र त्याच्याशी कसे लढले".

संजय बोलतो, त्या भयंकर रात्री काय झाले ते तुम्हाला सांगणार आहे. जरा शांतपणे ते ऐका. तुमच्या चुकीच्या धोरणाचे परिणाम काय झाले ते ऐका. ते घडावयाच्या आधीच कृष्णाला माहीत होते कीं, सत्यकीला भुरिश्रव हरवणार आहे. जनार्दनाला सगळे भूत वर्तमान आणि भविष्य समजते. त्या कारणाने कृष्णाने त्याच्या सारथ्याला दारुकाला सांगितले होते कीं, त्याने कृष्णाचा रथ उद्यासाठी सर्व शस्त्रानिशी सज्ज करून ठेवावा. त्या दोन कृष्णाना कोणीही पराभूत करू शकत नाहीत मग ते देव असोत, गंधर्व असोत, उरुग असोत, यक्ष असोत अथवा राक्षस असोत. ब्रह्मदेव आणि सगळे ऋषी सुद्धा हे

जाणतात. पुढे असे झाली कीं, सत्यकीला बेसहारा आहे हे समजून कृष्ण त्याचे शंखू ऋषभ रागात वाजवतो. तो राग ऐकून दारुक समजतो कीं, तो तयार केलेला रथ त्यांने सत्यकीकडे न्यावयाचा आहे. त्याप्रमाणे तो करतो. सत्यकी त्या दैवी रथात चढतो. त्या रथाचे विशेष म्हणजे त्याने तुम्ही कोठेही जाऊ शकत होता. त्याचे घोडे सैव्य, सुग्रीव, मोघापुष्य आणि वलहक जय्यत तयार होते. सत्यकी त्या रथाने कर्णाकडे जातो. त्यानंतर तो कर्णावर बाणांचा भडिमार करतो. दोन संरक्षक युधुमन्यू व उत्तमौजस राधेयावर चाल करून जातात. कर्ण बाणांचा तसाच भडिमारा करत सत्यकीवर चाल करतो. ते युद्ध फारच भीषण होते. सगळे इतर योद्धे त्यांचे थांबवून ह्या दोघांचे द्वंद्व पहात रहातात. त्यात असंख्य घोडे व माणसे मारली जातात त्यांच्या बेछूट बाणांमुळे. सत्यकीच्या रथाचे सारथ्य दारुकाकडे होते. दारुकाचे सारथ्य विशेष वाखाणण्यासारखे होते. आकाशातून सगळे देव, गंधर्व, यक्ष, दानव ते द्वंद्व पहात होते. ते दोघे परस्परांना आव्हाना मागून आव्हानं देत होते. त्याच्या दोघांच्या बाणांचा सडा पडला होता. कर्णाने सिनीच्या नातवाला चांगलेच झोडले होते. परंतु त्याला तो मारू शकत नव्हता. त्यामुळे त्याला दुःख होत होते. त्या पलिकडे तो कांहीं करू शकत नव्हता. सत्यकी कर्णाची ती अवस्था पाहून त्याला पुन्हा पुन्हा बाणांने भोसकत होता. जसे माहूत हत्तीला पराणीने टोचतो. त्यानंतर तो कर्णाचे चारही घोडे मारतो. त्यानंतर सत्यकी कर्णाच्या ध्वजाच्या चिंधड्या उडवतो. त्यामुळे कर्ण बेसहारा होतो. त्याला आता मदत करण्यासाठी त्याचा मुलगा वृषसेन येतो. त्या मागोमाग सल्य सुद्धा येतो. अश्वत्थामा जातो. ते सिनीच्या नातवाला चारही बाजूंनी घेरतात. सत्यकी त्या सगळ्यांना पुरून उरतो. तो दुर्योधनाच्या रथाची मोडतोड करतो. त्यानंतर तुमचा मुलगा दुःशासन तेथे येतो. सत्यकी दुःशासनाला मारत नाही कारण त्याला मारण्याचे काम भिमाचे असें ठरले होते. तो कर्णाला सुद्धा ठार मारत नाही कारण त्याला मारण्याचे काम अर्जुनाचे असें ठरलेले होते. नाहीतर त्यांने त्या दोघांना त्याच युद्धात मारले असते. त्या युद्धात सत्यकी सगळ्या मोठ्या मोठ्या योद्ध्यांना बाद करतो. त्याच अश्वत्थामा, कृतवर्मन होते. युधिष्ठीराच्या साठी तो युयुधन लढत होता. कदाचित त्याला कृष्णाची शक्ती मदत करत असावी असें वाटते. तो एकट्या हाताने त्या सगळ्यांना कसे बाद करतो ते

स्वर्गातील प्रेक्षकांनासुद्धा समजत नाही. फक्त तीन विक्रमी योद्धे ज्ञात आहेत, कृष्ण, अर्जुन आणि सत्यकी.

धृतराष्ट्र पुढे विचारतो, "वासुदेवाच्या अजिंक्य रथातून दारुकासारखा विलक्षण सारथी मिळाल्यानंतर सत्यकी कर्णाचा पराभव करतो. त्यानंतर सत्यकी इतर कोणत्या रथातून गेला कां? मला ते ऐकावयाचे आहे".

संजय पुढे सांगतो, त्यानंतर दारुकाचा धाकटा भाऊ नंतर सत्यकीसाठी आणखीन एक नवा रथ आणतो. त्याचा ध्वजस्तंभ ज्याच्यावर सिंहाची मुद्रा आहे असा होता. तो सोन्याने चांगला सजवलेला होता. त्या नव्या रथात चढल्यावर तो योद्धा लगोलगच कौरवांच्या फैजांवर चाल करून जातो. त्याच प्रमाणे कर्णासाठी सुद्धा एक नवीन राथ आणला जातो. त्याला नवीन चार घोडे जोडलेले होते. तो सर्व यंत्राने सज्ज होता. त्यावर एक नवीम झेंडा होता जो कर्णाचे प्रतिक होता. त्यानंतर तोसुद्धा पांडवांच्या फौजांवर चालून गेला. मी सगळे सांगितले पण आता सांगतो आपल्या चुकीच्या धोरणामुळें तुमच्या घराण्याचे व राज्याचे किती व कसे नुकसान झाले आहे. आजपर्यंत आपले तेहतीस मुलगे मारले गेले आहेत भिमाच्या मुळे. सत्यकी व अर्जुनानी सुद्धा तुमचे शेकडो प्रामाणिक सेवक, योद्धे ठार मारले आहेत. त्यात भागादत्त सारखे तुमचे मित्र मारले गेले आहेत. एवढे नुकसान झाले पण अजून तुमचा मुलगा युद्धा चालू ठेवत आहे म्हणजे जे तुमचे उरलेले आहेत तेसुद्धा मारले जाणार असें दिसते.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे चव्वेचाळीसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे पंचेचाळिसावा

धृतराष्ट्र बोलतात, "त्या दोन बाजूंची परिस्थिती तशी होती तेव्हां भिमाने काय केले"? संजय बोलतो, भिमसेन बेसहारा झाला होता तेव्हां तो कर्णाचे अपशब्द ऐकत होता. तो नंतर फाल्गुनीला म्हणाला, "तुझ्या समोर मला हा कर्ण वाट्टेल ते बोलत होता, मला हिजडा, मूर्ख, खादाड, युद्धकलेत कमजोर, मला सांगतो कीं, मी लढले नाही पाहिजे, सन्यास घेतला पाहिजे, वनात राहण्यासाठी मी जन्मलो आहे. असे बोलणार्याला मी ठार मारणार आहे. परंतु, तू त्याला मारण्याची प्रतिज्ञा घेतली आहेस म्हणून मी त्याला ठार मारणार नाही पण ते लवकर कर नाहीतर मी त्याला मारून टाकीन कारण मी जास्त काळ धीर धरणारा नाही. लवकर त्याला यमाकडे पाठवं म्हणजे मला बरे वाटेल". त्यानंतर अर्जुन कर्णाजवळ जातो व बोलतो, "अरे कर्णा तू स्वतः एक खोटा योद्धा आहेस. तुझ्या मनात पाप असते, द्वेष व मत्सर हे तमोगुण तुझ्यात भरलेले आहेत. तुझ्यात म्हणून सात्त्विकता नाही. तू कुलीन क्षत्रिय नाहीस. युद्धात जिंकतो नाहीतर हरतो, त्यापैकी एक असते. त्यांची कांहीं खात्री नसते. म्हणून अरे राधासुता, इंद्र जरी असला तरी हा नियम कायम असतो. तुला युयुधनाने कितीवेळा बेसहारा केले होते. तू मरणाच्या दाढीत गेला होतास पण त्याने तुला मारले नाही कारण तुझा मृत्यू माझ्या हाती आहे म्हणून त्याने तुला सोडले हे लक्षात ठेव. तू भिमाची गाडी तोडलीस, म्हणून तुझे प्रतिस्पर्ध्याला घालून पाडून बोलणे प्रतिष्ठीतपणाचे नव्हते. प्रतिस्पर्ध्याला हरवले म्हणून त्याला अपशब्द बोलणे सुसंस्कृतपणात येत नाही. तुझे ज्ञान कमी आहे. त्यात तुझा दोष नाही. परंतु तू सुधारू शकतोस. भिम हा सुसंस्कृत आहे तेव्हां त्याच्याशी तसे तू बोलले पाहिजेस. भिमाच्या ताकदीचा तुला अंदाज नाही एरवी तू असे बोलला नसतात. तो पुण्यवंत आहे त्याची फार मोठी तपस्या आहे. त्यांने राक्षसांना मारले आहे अशा योद्ध्याला जे तू बोललास त्यावरून तुझे ज्ञान किती कमी आहे आम्हा पांडवांबद्दलचे निदर्शनास आले". असे तो सगळ्या तुमच्या योद्ध्यांपुढे कर्णाला सुनावतो. "तुलासुद्धा भिमाने त्याच दिवशी बेसहारा केले होते. ते तू विसरलास. तेव्हां त्यांने तुला अपशब्दाने अपमानित केले नाही. कारण तो सुसंस्कृत

आहे. तुम्ही माझ्या मुलाचा खून केलात त्याचे काय तुला समर्थन करावयाचे आहे"? तू तुझ्या मरणासाठी माझ्या अभिमन्यूचे धनुष्य तोडलेस. त्या पापासाठी मी तुझा वध करणार आहे. ते होण्या आधी जे तुला व तुझ्या लोकांना करावयाचे आहे ते करून घे. त्यानंतर एक मोठे संकट तुमच्या मागे लागणार आहे हे लक्षात असू दे. मी तुझा मुलगा वृषसेन त्याचा तुझ्या समक्ष वध करणार आहे. जशास तसे ह्या न्यायाने ते योग्य होईल. त्यावेळी जे तुमचे राजे माझ्यावर येतील त्या सगळ्यांना मी यमाकडे धाडणार आहे. माझ्या गांडीवाची शपथ घेऊन हे मी बोलत आहे. तुला मेलेला पाहून दुर्योधन रडत असलेला मला पहावयाचा आहे". अर्जुनाने वृषसेनाच्या वधाची प्रतिज्ञा केल्यावर सगळीकडे आकांत झाल्याचे ऐकू येते. त्यावेळी हजार नेत्र असलेला सूर्य अस्ताकडे डुबला होता. तो सोळावा दिवस संपला होता. अर्जुनाने त्याची प्रतिज्ञा सार्थ केली होती. कृष्ण त्याला प्रेमांने आलिंगन देतो. बोलतो, "पुढे असेच चांगले भाग्य तुला लाभणार आहे. वृद्धक्षत्र त्याच्या मुलासह यमाकडे गेला आहे. देवांचा सरसेनापती सुद्धा धृतराष्ट्रांच्या बरोबर लढतांना गोंधळून जाऊ शकतो. त्याप्रमाणे तू गोंधळला नाहीस हे विशेष आहे. मला नाही वाटत ह्या तिनही जगात तुझ्या सारखा योद्धा असेल. दुर्योधनाने अनेक उत्तम वंशाचे राजे स्वताच्या अंकीत केले आहेत पण ते तुझ्यापुढे टिकत नाहीत हे मी पहात आहे. कर्णाचा वध व त्याच्या फौजांचा नाश तू केल्या नंतर मी तुझी आणखीन स्तुती करणार आहे".

ते ऐकल्यावर अर्जुन कृष्णाला बोलतो, "हे तुझे मोठेपण आहे, अरे माधवा, तुझ्या मदतीशिवाय मी माझी प्रतिज्ञा पूर्ण करू शकलो नसतो ह्याची मला माहिती आहे. मला मिळणारे यश तुझेंच असते. तुझ्या कृपेनेच पांडवांचे भले होणार आहे. अरे वृश्नी, जे आमचे ते तुमचेसुद्धा असते. आम्ही पांडव तुझे सेवक आहोत". ते ऐकून कृष्ण गालातल्या गालात हसतो. त्यांनंतर तो घोड्याना चुचकारतो व रथ पुढे हलतो. ते त्या रणभूमीत जे हत्याकांड झाले त्याचे परिणाम पहात त्यांच्या निवास स्थानी जाऊ लागतात. कृष्ण सांगत असतो, अनेक राजे यशाच्या व जगद्मान्यतेच्या साठी येथे आले व तुझ्या बाणाने मारले गेले आहेत. त्यांचे शस्त्र, दागिने, घोडे, हत्ती, रथ सगळे ह्या रणभूमीने बरबाद केले आहेत. त्यांचे दुःख कितीतरी मोठे आहे. बरेचजण मेले व कांही अजून जीवंत आहेत. जे मेले ते त्यांच्या कतृत्वाच्या रुपात कायम जीवंत रहाणार आहेत ह्यापुढे. ह्या रणभूमीवर तुझे बाण

पडलेले दिसत आहेत. त्यांची सोनेरी टोकं मागील पिसं सगळे सर्वत्र विखुरलेले आहे. मेलेल्यांची वस्त्रं ज्यात रत्न लावलेली आहेत, मुकूट, अंगरखे, चिलखतं, कवचं, इतर शस्त्रं सगळे येथेच पडलेले आहे त्यांच्या धन्याच्या शरीराजवळ. तेथे पहा फाटलेले ध्वज, त्यांचे दांडे, रथाचे भाग, चाकं सगळे मोडलेल्या अवस्थेत येथे अस्ताव्यस्त पडलेले आहेत हे दृष्य काय सांगते? जीवन किती क्षणभंगूर आहे त्याची कल्पना ह्यावरून शहाणे घेतात. ते मेलेले हत्ती पहा. ते मेले त्याचे कारण त्यांना माहित नाही. ते घोडे कां मेले ते त्याना माहित नाही. त्यांच्या अंगावर किती सुंदर दागिने चादरी, शाली आहेत ते पहा. काळ पुढे चालला आहे. तो कोणाला थांबत नाही. माणसाच्या हव्यासामुळे हे निष्पाप प्राणी मरत होते. त्यांच्या मरणाचे पाप त्या लोकांना लागते ज्यांच्यामुळे अशा लढाया होतात. माणसाच्या महत्वाकांक्षेमुळे हे निष्पाप प्राणी नाहक मरत होते. ते राजे पहा मरून पडले आहेत. आता त्यांना कोणी वारा घालावयाला दासी नाही. ते आता गिधाडांचे खाणे झाले आहेत. त्याच्या सुशोभित श्रृंगारलेल्या शरीराचे आता लांडगे लचके तोडणार आहेत. ते मोडलेले रथ पहा. त्यांना सजवण्यासाठी किती मेहनत घेतली जात होती ते आता मोडून पडले आहेत. त्यांचासुद्धा मृत्यू झाला आहे. ते ध्वज पहा. फाटून गेले आहेत. जे बनवण्यासाठा किती खर्च राजे करतात ते तुला माहित आहे. सगळे क्षणभंगूर आहे. काळ सगळे संपवणारा आहे. ते मेलेले पाईक पहा, कोणासाठी ते मेले त्यांना माहित नसेल. त्यांच्या मरण्यात व त्या हत्तींच्या व घोड्यांच्या मरण्यात फारसा फरक नाही कारण ते दोघे कोणा दुसर्यासाठी मेले आहेत, त्यांची प्रेमाची माणसं ते सोडून गेले आहेत यमाच्या द्वारी. त्यांच्या अगावरील चंदनाचे गंध आता मातीने भरलेले आहे. त्यांचे नीटपणे विंचरलेले केस आता मातीने मळलेले आहेत. वीरांसाठी वारा देणारे पंखे, त्यांच्या छत्र्या सगळे मोडून गेले आहे. जे बनवण्यासाठी किती मेहनत व धन खर्ची गेले ते कोणाला माहित नाही. ते मोडलेले हात, पाय कोणाचे कोणाला माहीत नाही. त्यांचे रक्त वहात आहे. कांहीं अजून जीवंत असतील पण जास्त काळ तसे ते रहाणार नाहीत. ते पहा लांडगे, कुत्री, कोल्हे जमा होत आहेत, त्यांच्यासाठी मेजवानी माणसाने दिलेली आहे. ते राक्षस पहा नरमांसभक्षक आता मेलेल्या प्राण्यांचे, माणसांचे लचके तोडत रात्रभर खात रहाणार आहेत, ते रक्ताचे पाट आता वहाण्याचे थांबले आहेत. ते कोणत्या प्राण्याचे आहेत, मनुष्य,

घोडा, हत्ती अशा सगळ्यांचे रक्त एकत्र वहात आहे हे कां होत आहे तर त्याचे कारण कांहीं मोजक्या लोकांची महत्वाकांक्षा आहे. जे मेले त्यांचा त्या महत्वाकांक्षेशी कांहींच संबंध नव्हता पण ते मेले आहेत. हि जगरहाटी आहे. कोण कोणासाठी कां मरतो ते समजत नाही. कांहीं शक्तीमान लोकांसाठी ते मरत आहेत. जर ते शक्तीमान आपल्या महत्वाकांक्षा आवरतील तर हे होणार नाही पण ते कोण करणार. माणसाच्या लोभाला, मोहाला मर्यादा नसल्याने अशी युद्ध होतात. इंद्र दानवांना, दैत्याना मारत होता पुण्य वाढावे म्हणून कारण ते दैत्य, दानव व त्याच्या प्रभावाखाली असलेले असुर व राक्षस हे लोभ, मोह ह्यात अडकलेले होते". असे पहात व बोलत ते दोघे त्यांच्या जागी पोहोचतात. कृष्ण त्याचे शंख वाजवतो. त्यानंतर अर्जुन त्याचे वाजवतो. त्यानंतर त्यांचे सैनिक त्यांची शंख वाजवतात. यशाची नांदी ते देतात. त्यानंतर कृष्ण युधिष्ठीराकडे जातो व जयद्रथाचा वध अर्जुनाने केला हे सांगतो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे पंचेचाळिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे सेहेचाळिसावा

संजय पुढे सांगतो, जयद्रथाचा वध केल्यानंतर कृष्ण युधिष्ठीराला ती आनंदाची वार्ता सांगण्यासाठी त्याच्या दालनात जातो. कृष्ण बोलतो, "अरे राजा तुझे कल्याण हो. तुझ्या भावाने त्याची प्रतिज्ञा पूर्ण केली आहे. जयद्रथाचा वध झाला आहे". ते ऐकून राजा युधिष्ठीर फार आनंदी होतो. त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू असतात. तो त्या दोघा कृष्णांना मिठी मारतो व त्याचे मुख त्याच्या हाताने गोंजारतो. तो बोलतो, "महारथी तुम्हाला माझ्या शुभेच्छा आहेत. तुमचे भाग्य उज्वल हो. आपले शत्रू ह्यामुळे मोठ्या चिंतेत पडले असतील. ज्याच्या कडे तू आहेस त्याला ह्या जगात काहीही अशक्य नसते. तुझी कृपा असल्यामुळे आम्ही ह्या युद्धात निश्चितपणे यशस्वी होणार आहोत. ते यश तुझ्या कृपेनेच आम्हाला मिळणार आहे. इंद्राला सुद्धा तुझे पाठबळ आहे म्हणून तो दानवांना मारत असतो. तेंच येथे होत आहे. तुझ्या कृपेने ह्या सगळ्या जगाची सत्ता आम्हाला प्राप्त होणार आहे. तुझ्या कृपेने आम्हाला कायम ख्याती मिळणार आहे. आमच्या जाण्यानंतर सुद्धा लोक आम्हाला आठवणार आहेत ते केवळ तुझ्या कृपेमुळें. म्हणून सगळे सूज्ञ लोक तुझ्या स्मरणात आपला वेळ व्यतीत करत असतात. तूंच जगाचा कर्ता करविता आहेस. तूंच सृष्टीची मुख्य प्रेरणा आहेस. ज्याने तुला जाणले त्यांना सगळे समजले. तुझ्यातून देव, दैत्य व दानव सुद्धा उत्पन्न झाले. तूंच सृष्टीची चेतना आहेस व तूंच सृष्टीची उर्जासुद्धा आहेस. तुला जे जाणतात, त्यांची बुद्धी स्थीर असते ते कधी गोंधळत नाहीत. सगळ्या चांगल्या गोष्टी तुझ्यातून येतात व तुझ्यात मिसळून जातात. जे तुझ्यावर नितांत श्रद्धा राखून जगतात त्यांच्या सर्व पिडा संपुष्टात येतात. तू अति प्राचीन आहेस तुला सुरूवात नाही व अंतसुद्धा नाही. कारण तू नित्य आहेस. तुझ्याहून श्रेष्ठ कांहीं नाही. चार वेदात तुझे स्तवन आहे. अशा तुला माझा नमस्कार आहे. मी तुला वंदन करतो. असे बोलून तो त्याच्यापुढे नतमस्तक होतो. तू धनंजयाचा मित्र आहेस. त्याचे भले करत आहेस".

ते ऐकल्यावर दोघा मित्रांना फार आनंद होतो. पुढे युधिष्ठीर बोलतो कीं, कृष्णाच्या क्रोधामुळें कौरवांचा नाश होत आहे. जर त्यांनी तुझी शिष्टाई मान्य केली असती तर हे

सगळे झालेच नसते. परंतु, ते पाप बुद्धी म्हणून हे त्यांचे विनाशाचे युद्ध आरंभले गेले. भिष्म शरशय्येवर निजले आहेत तेसुद्धा त्यांच्या पापबुद्धीमुळेच झाले आहे. तुझ्या क्रोधाने त्यांचे सुख नाहीसे झाले आहे. त्यांची मुलं बायका आक्रोश करत आहेत कारण ते तुझे ऐकत नाहीत".

त्यांचे तसे संभाषण होत आसतांना तेथे भिम, सत्यकी, नकूल व सहदेव त्याचे जखमी अंग औषधाने सावरलेले असें तेथे येतात. कृष्णाभोवती बसतात. त्या सगळ्यांना खूप आनंद झालेला त्यांच्या मुखावरून दिसत होता. ते एकमेकांचे अभिष्टचिंतन करतात. त्याच्या गप्पा रंगतात. त्यांच्या मध्ये आता पांचाल व श्रींजय येऊन मिळतात. त्यांचे हितचिंतक राजे सुद्धा तेथे जमा होतात. सगळे एकमेकांनां धन्यवाद देत असतात. द्रोणांच्या कचाट्यातून ते कसे सुटले त्याच्या गप्पा होत असतात, मधूनच दुर्योधनाची चेष्टा होत असते. कांहींना कौरवांचे वाईट वाटते, दुर्बुद्धीचे दुष्परिणाम कसे असतात त्यावर तेथे चर्चा होत असते. उद्या सतरावा दिवस आहे, तेव्हां कसे व्युह रचावयाचे त्यावर धृष्टद्युम्न व भिम व इतर पांडव ठरवत असतात. आपले भाग्य बलवत्तर आहे तेवढ्यात हे युद्ध उरकले पाहिजे असे कांहीं सुचवतात. युधिष्ठीर भिमाचे व युयुधनाचे आभार मानतो. त्यांच्या डोळ्यात सुखाश्रू होते. एकंदर माहोल आनंदाचा होता. आज जयद्रथ व भुरिश्रव मेले होते जे कौरवांचे तारे होते. उद्या कोण आपले व त्यांचे यमाकडे जाणार ते पहावयाचे आहे.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे सेहेचाळिसाला संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे सत्तेचाळिसावा

संजय पुढे सांगतो, जयद्रथाच्या वधामुळें तुमचा मुलगा त्याचे अश्रू आवरू शकत नाही. त्याच्या चेहर्यावर भिती स्पष्ट दिसत होती. त्याचा श्वास जोरा जोरांने होत होता जसे एकाद्या सापाचा असावा. सगळ्या जगाचा शत्रू तुमचा मुलगा, फार मोठ्या आघातातून जात होता. जिश्नू, भिम व सत्याकीने त्याच्या सैन्याचे संहार व त्यानंतर जयद्रथाचा वध ह्यांने तो दुःखी झालेला दिसत होता. त्याचं सैन्य अकरा अक्षौहिणी होते ते आता फक्त तीन अक्षौहिणी उरले होते. युद्धाचे सोळा दिवस झाले होते व अजून त्याला यशाची कोठलीच लक्षणं दिसत नव्हती. त्याचा चेहरा पडला होता. डोळ्यातून अश्रूच्या धारा लागलेल्या होत्या. त्याला समजते कीं, अर्जुनाच्या योग्यतेचा योद्धा त्याच्याकडे नाही. द्रोण व कर्ण सुद्धा त्या बरोबरीचे नाहीत हे तो समजतो अश्वत्थामा व कृपसुद्धा नाही. तो विचार करत असतो कीं, माझ्या मोठ्या योद्ध्यांना ठार मारल्यानंतर पार्थ जयद्रथाला ठार मारतो, आणि त्याला कोणी अडवू शकत नाही. म्हणजे माझे अफाट सैन्य पांडवांच्या पुढे कुचकामी ठरलेले आहे. त्याच्या लक्षात येते कीं, त्याचे संरक्षण कोणीही करू शकणार नाही अगदी पुरंदरसुद्धा नाही. आता तो कोणावर अवलंबून राहू शकेल ते त्याला समजत नव्हते. कर्णालासुद्धा भिम व सत्यकी वेळोवेळी हरवत आले आहेत. ज्या कर्णावर तो विसंबून होता तोसुद्धा कमी ठरला होता. तो विचार करत असतो, मी पांडवांचा शांततेचा प्रस्ताव कर्णाच्या सांगण्यावरून धुडकावला होता, त्याचीच आता कांहीं शाश्वती उरलेली नव्हती. दुर्योधन अशाप्रकारे विचार करत दुःख करत होता. त्यानंतर तो द्रोणांना भेटण्यास त्यांच्या कडे गेला. तेथे गेल्यावर प्राथमिक औपचारीक झाल्यानंतर तो मुद्द्याला हात घालतो. तो त्यांना सांगतो कीं, त्यांच्या सैन्याची फार मोठी हानि झाली आहे. पांडवांच्या यशाची ती नांदी व कौरवांच्या नाशाची सुरूवात आहे असे तो सांगतो. तो द्रोणांना ताकीद देतो की हे फारच धोक्याचे आहे. दुर्योधन त्यांना बोलतो, "अहो गुरूवर्य, आपल्या फौजांचा नाश होत आहे, अनेक राजे आपल्याला सोडून जात आहेत, आपले सैन्य पहिल्याच्या चौथा भाग झाले आहे. सुरूवातीला भिष्म होते, त्याला शिखंडीने मारले, तो तेव्हां पासून

पांडवांच्या आघाडीला आहेच. त्याचे पांचाल त्याला संरक्षण देत आहेत, आपला आणखीन एक शिष्य सव्यसाची त्यांने एकट्याने माझे सात अक्षौहिणी सैन्य गारद केले आहे जे जयद्रथाचे होते. त्याने जयद्रथालासुद्धा यमाकडे धाडले आहे. मला सांगा अशा परिस्थितीत मी कसे युद्ध करणार? माझ्या दोस्त राज्याना जे आश्वासन मी दिले आहे ते मी कसे पाळणार? माझे कित्येक मित्र मरून मातीत मिळाले आहेत. ते त्यांचे सर्वस्व माझ्या शब्दाखातर घालवून बसले आहेत. कित्येकांचा माझ्यावरील भरवसा संपुष्टात आला आहे व ते आपल्याला सोडून जात आहेत. मी माझ्या मित्रांची हत्त्या करत आहे असे सगळे म्हणतात. मला नाही वाटत अशाने शंभर अश्वयज्ञसुद्धा मला वाचवू शकतील. मी स्वार्थी व कुकर्मी शाबीत होत आहे. मी पापी झालो आहे. अशा अवस्थेत जर मी यमाकडे गेलो तर माझे काय होणार ते समजत नाही. काय मी ह्या सगळ्या पापमयतेचा एकटा जबाबदार आहे कां? आपण सगळे त्यात सामील अहात हे लक्षात ठेवा. जेव्हां मी तेथे जाईन तेव्हां मी काय जाब देणार भिष्मांना जे तेथे बसून माझी परीक्षा करणार असतील. तो महा प्रतापी जलासंध ज्याला सत्यकीने मारले, जो मोठ्या आशेने माझ्या करता लढावयाला आला त्याला मी काय उत्तर देणार? तो कंबोजचा राजा, राक्षस अलमवुष आणि तसेंच कितीतरी मित्र त्यांना मी काय उत्तर देणार? ते माझ्या शब्दाखातर मेले आहेत त्यांची जबाबदारी मला टाळता येणार नाही. त्या सगळ्यांचे उपकार फेडण्यासाठी मी यमुना नदीत बुडून मरण्याचा विचार करत आहे. ते जर नको व्हावे असेल तर तुम्ही तुमची शर्थ करून पांचालांचे व पांडवांचे पारिपत्य केले पाहिजे. तरच माझ्या मनाला शांती मिळेल, नाहीतर त्यांच्या हातून मला मेले पाहिजे व तेथे गेले पाहिजे जेथे माझे मित्र आधीच पोहोचले आहेत. आपले मित्र समजतात कीं, तुम्हाला त्यांना योग्य प्रकारचे संरक्षण देता आलेले नाही. म्हणून त्यातील कांही आपल्याला सोडून जात आहेत. ते पांडवांना जाऊन मिळण्याचे बोलत आहेत कारण, त्यांना आता विश्वास झाला आहे कीं, पुढे युधिष्ठीरच गादीवर येणार आहे. तुमच्या मनात अर्जुनाबद्दल असलेल्या मायेमुळे हे होत आहे असे मला वाटू लागले आहे. तुमच्या त्या वागण्यामुळे आपले एवढे सगळे सैनिक तो मारू शकला असा मला संशय आहे. कर्ण सांगत होता ते आता मला पटू लागले आहे कीं, तुम्ही अस्तनीतील निखारा अहात. तुमच्यावर विश्वास टाकून मी मोठी चूक केली आहे.

जो मनुष्य पुरती पारख न करता एकाद्याला मोठी जबाबदारी सोपवतो त्याचे जे होते ते आज माझे झाले आहे. मी फार लोभी आहे, पापी आहे, दुष्ट आहे, मी फार मत्सरी आहे. जयद्रथाचा मृत्यू माझ्यामुळे झाला आहे. तो माझ्यासाठी मेला आहे, त्याच प्रमाणे भुरिश्रवा, अभिशहा, सुरसेना ते सिवी आणि वस्ता सगळे तुमच्या पट्ट शिष्याने मारले आहेत. मलासुद्धा त्यांच्याकडे जायला पाहिजे असे वाटते. अशा जगण्यात कांहींच अर्थ नाही. अहो पांडवांचे गुरूवर्य, मला त्यासाठी परवानगी द्या".

जयद्रथ वध पर्व भाग एकशे सत्तेचाळीसावा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे अठ्ठेचाळिसावा

धृतराष्ट्र पुढे विचारतात, "जयद्रथ व भुरिश्रवाचे वध झाल्यानंतर तुझ्या मनात कोणते विचार आले ते मला सांग. अशारितीने द्रोणांना दुर्योधन बोलल्यानंतर त्यांची प्रतिक्रीया काय झाली"?

संजय सांगतो, ते ऐकून तुमच्या सैन्यातून मोठा आक्रोश ऐकू आला जसे जयद्रथ व भुरिश्रवांच्या मृत्यूचे त्यांना समजते. ते तुमच्या मुलांचे ऐकेनात. त्यांचे म्हणणे असे कीं, दुर्योधनाच्या चुकीच्या धोरणामुळे कित्येक योद्धे विनाकारण मारले गेले आहेत. त्यांमुळे त्याच्या आज्ञा ते ह्यापुढे मानणार नाहीत. द्रोणांना तुमच्या मुलाचे बोलणे ऐकून फार वाईट वाटले. ते त्याला विचारतात, "अरे राजा तू अशारितीने मला घालून पाडून कां बोलत आहेस"? मी तुला त्या आधीसुद्धा सांगितले होते कीं अर्जुन अजिंक्य आहे विशेष करून जेव्हां तो कृष्णा बरोबर असतो. मला तुझे हे ऐकून फार दुःख झाले आहे. तुला प्रामाणिकपणाची कदर नाही हेंच खरे. भिष्माचा वध शिखंडीने केला कारण त्याला सव्यसाचीचे संरक्षण होते. अर्जुनाच्या कुवतीचे असंख्य पुरावे तुझ्याकडे सुद्धा आहेतच. भिष्म कोणालाही न हरणारे त्यावेळी मरतात कारण त्यांना मरावयाचे होते. त्यांच्या जाण्यानंतर कोणाला सरसेनापती करावयाचे ते ठरतांना द्युतातील सोंगट्याची आठवण येते. त्या सोंगट्या नव्हत्या ते बाण होते जे आता अर्जुनाच्या हातून सुटत आहेत. जर तो खेळ झाला नसता तर हे सगळे झालेच नसते. त्याची जबाबदारी कोण घेणार? विदूर बोलले होते हे सगळे त्यावेळीच पण तू मस्त झाला होतास तुझ्या कपटी दोस्तांच्या सानिध्यात. त्यानंतर शांतता करारासाठी साक्षात कृष्ण आला पण तू त्यालासुद्धा झिडकारलेस, ते मी नाही सांगितले करावयाला. त्याची जबाबदारी कोणावर आहे? तू कोणाचेच ऐकत नव्हतास. हा जो नरसंहार होत आहे त्यांची सुरूवात त्यात आहे. हे युद्ध हा केवळ एक त्या चुकीच्या धोरणांचा परिपाक आहे. जो माणून चांगला सल्ला धुडकावतो त्याच्या नशिबी असेंच येते. त्याकरता मला का तू दोष देतोस. राजसभेत तू काय केलेस, ते बरोबर होते कां? कां कृष्णाचा अपमान तू केलास? जे घडत आहे त्यात माझा कांहीं

दोष नाही. मला उगाच दोष देऊन स्वताची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करू नकोस. खोट्या मार्गाने तू त्यांना वनवासात पाठवले ते जर योग्य होते तर आज जे संहार होत आहेत तुझ्या मित्रांचे तेसुद्धा योग्यच आहेत. पांडव सत्वशिल आहेत. देवता त्यांच्याच बाजूने असणार हे तुझ्या तेव्हां कां नाही लक्षात आले. पांडव माझ्या मुलाइतकेच मला प्रिय आहेत कारण ते सत्वशिल आहेत त्याशिवाय इतर कोणतेही कारण नाही. त्या सभेत तुम्ही चांडाळ चौकडीने जी गैरकृत्ये केली ती तुला माहीत आहेत त्याचे परिणाम स्वरुप आज घडत आहे. अरे दुर्योधना, जर तुमच्यात तेवढी ताकद नाही तर पांडवांना कां तुम्ही आव्हान दिलेत? तुम्ही चुका कराव्यात व आम्हाला त्यांचे समर्थन करावयाला सांगावयाचे हा कोणता न्याय होतो? मी स्वतः तुमच्या नादी लागून माझे स्वताचे भवितव्य धृष्टद्युम्नाच्या ताब्यात देऊन बसलो आहे असे वाटते. पापं तुम्ही करावीत व त्याचे परिणाम आम्ही भोगावयाचे कारण काय तर आम्ही तुमचे आश्रित आहोत, हा कोणता न्याय आहे? तुम्हाला जयद्रथाचे संरक्षण करता आले नाही तो काय माझा दोष? मला असें घालून पाडून बोलून जे तू दुखवले आहेस त्याचे परिणाम तुला भोगावे लागतील कारण मी एक ब्राह्मण आहे. जर तुम्ही भुरिश्रवाला व जयद्रथाला संरक्षण देऊ शकत नाही तर स्वताला कसे वाचवणार अर्जुनाच्या बाणांपासून? त्याच सगळे स्पष्ट होते हे केव्हां तुझ्या लक्षात येणार? कृप अपराजित आहेत ते अजून जीवंत आहेत. ते जयद्रथाच्या संरक्षणासाठी गेले नाहीत हे त्यांनी चांगले केले नाहीतर तेसुद्धा मेले असते. मी त्यांचे त्यासाठी कौतुक करतो. भिष्म तुझ्या भावाच्या दुःशासनाच्या समोर मारले गेले तेव्हां तो काय करत होता? त्याने कां नाही त्याना वाचवले? भर रणांगणात मी तुझ्या भल्यासाठी जीवाची बाजी लावतो कारण काय तर तुझ्या राज्यात आम्ही इतकी वर्षे आश्रित आहोत. त्यात माझा मुलगासुद्धा येतो. आमचे संबंध पांडवांशी चांगले असले तरी त्यांच्या विरूद्ध तुझ्यासाठी आम्ही शस्त्रं उचलली त्याची कांहीं जाण तुला आहे कां? तुझ्या पित्याने तुला कोणती शिकवण दिली ती आठव. **ते सांगत होते, शालीनता असावी आपल्या वागण्यात, संयम असावा आपल्या विचारात, पुण्यवंत असावे सदैव, आपल्या कर्तव्याची जाण असावी नेहमी, हित व सुख ह्यांचे योग्य नाते, समतोल सांभाळावा, जेव्हां कर्तव्य व हित ह्यात फरक असतो तेव्हां कर्तव्याला जास्त महत्व द्यावे, ब्राह्मणांचा (ज्ञानी लोकांचा) आदर**

**करावा, त्यांना सुखी ठेवावे, त्यांची पुजा करावी, असे कांहीं करू नकोस ज्याने ते (ब्राह्मण) दुखावतील, ते अग्नी सारखे असतात, त्यांच्या शापाने तुझा नाश होऊ शकतो,** ते आठव व पहा त्यातील किती तुम्ही आचरणात आणले आहे. जर ते सगळे नियम तुम्ही आचरणात आणले असते तर आजची वेळ आलीच नसती.

माझ्या बाबत बोलावयाचे म्हणजे, मी उद्या शत्रूच्या गोटात शिरणार व तेथे अंधाधुंद बाणांचा मारा करत त्यांचे संहार करून त्याची शक्ती कमी करणार आहे. ह्यापेक्षा कांहीं जास्त माझ्याकडून अपेक्षू नकोस. मला दोष देऊन माझ्या मनाला डागण्या देण्यापेक्षा तू उद्या तुझ्या फौजेचे नियंत्रण करून दाखव. तुझ्यावर तुझे सैन्य नाराज आहे. श्रींजय तुझ्यावर नाराज आहेत, त्यांच्याशी तू उद्या जाऊन लढावेस. उगाच इतरांना दोष देण्यात वेळ वाया घालवू नकोस. एवढे बोलून दुर्योधनाच्या प्रतिक्रियेची दखल न घेता ते तेथून निघून पांडवांच्या फौजा जेथे होत्या तेथे जातात. तो दिवस संपतो.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे अठ्ठेचाळिसावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकशे एकोणपन्नासावा

संजय पुढे सांगतो, द्रोणांचे ते उद्‌गार ऐकल्यानंतर दुर्योधनाला त्यांचा फार राग येतो. तो स्वतः युद्धात भाग घेण्याचे ठरवतो. तो कर्णाला बोलतो, "त्या मुकूटधारी पंडुपुत्राकडे लक्ष ठेव. त्याच्या बरोबर नेहमी सारथी म्हणून कृष्ण असतो. तो द्रोणांने तयार केलेले व्युह जे देवांनासुद्धा तोडता येत नाहीत ते तोडून आपल्या मध्ये आला आणि जयद्रथाला मारले. त्यावेळी स्वतः द्रोण पांडवांच्या इतर फौजांचा परामर्श घेत होते. अरे राधासुता, त्या इंद्राच्या मुलाने माझे सैन्य चवथा भाग इतके कमी केले आहे. ते तो कसे करू शकतो ते मला समजत नाही. मला संशय येतो कीं, त्याला द्रोणांची मुक संम्मती असली पाहिजे. एरवी ते शक्य नाही. पार्थ त्यांना फार प्रिय आहे हे सगळे जाणातात. त्यामुळे ते तसे वागत असले, तरी त्याची कबुली मात्र ते देत नाहीत. हे माझे दुर्भाग्य आहे. पहिला जयद्रथाला संरक्षण देण्याचे मान्य केले व त्यानंतर ते अर्जुनाला मदत करू लागले अप्रत्यक्षपणे. जर मी जयद्रथाला त्याच्या देशी जाण्याची मुभा केली असती तर तो कदाचित मेला नसता पण मला दुर्बुद्धी झाली कीं मी त्याला थांबवले असें समजून कीं आपण सगळे त्याचे संरक्षण करू शकू. पण ते झाले नाही. मी जुगार खेळलो परंतु, त्यात हरलो. जयद्रथाच्या वधानंतर जे हत्याकांड झाले त्यामुळे माझे युद्धाचे गणित चुकले आहे. कारण त्याने सिंधचे सगळे शूर योद्धे त्यात मारून टाकले आहेत. त्याला संरक्षण देण्याच्या कार्यात माझे भाऊ त्यात चित्रसेन सुद्धा कामी आले आहेत. माझे सगळे गणित चुकत आहे".

कर्ण त्याला बोलतो, "द्रोणांना दोष देऊ नकोस. तो वृद्ध ब्राह्मण त्याच्या कुवती प्रमाणे चांगला लढत आहे. जीवावर उदार होऊन लढत आहे, अशा परिस्थितीत त्याला दोष देणे अयोग्य होईल. फाल्गुनी जामबाज योद्धा आहे तो कांहीही करू शकतो. त्याला द्रोणांच्या मदतीची गरज नाही. त्याच्या कडे दैवी आयुध आहेत. त्याच्या रथावर कपी मुद्रा आहे जे महादेवाचे चिन्ह आहे. त्याशिवाय त्या सारथी कृष्ण आहे. अशाला कोणतेही अवघड व्युह फोडणे फारसे कठीण नसते. त्याला द्रोणांच्या मदतीची गरज नाही. वस्तुतः द्रोण आता अतिवृद्ध झाले आहेत. त्यांच्या चपळाईत कमीपणा आला आहे त्यांच्या वृद्धत्वामुळें,

अशात ते तुझ्यासाठी लढत आहेत त्याचेच मला नवल वाटते. त्या परिस्थितीत तू त्यांना जे बोललास त्याची तुला लाज वाटली पाहिजे. कोणाशी कसे बोलावयाचे तेसुद्धा तू समजत नाहीस ह्याचे मला नवल वाटते. ते आपले गुरू आहेत हे लक्षात ठेवून तू बोलले पाहिजेस. मला वाटते जयद्रथाच्या वधात त्याचे भाग्य कारणीभूत होते कारण आपण पूर्ण मेहनत केली होती परंतु, तो मेला. माणसाचे दैव सर्व शक्तीमान असते असे म्हणतात ते खरे आहे. आपण पांडवांना पराभूत करण्याचे शिकस्तीचे प्रयत्न करत असतो परंतु, त्यांचा सरशीच होत आहे प्रत्येक दिवशी त्याचे कारण सुद्धा दैव हेंच आहे असे मला वाटू लागले आहे. आपले दुर्दैव पांडवांना मदत करत आहे असे म्हंटले तर ते जास्त योग्य ठरेल. आपण कितीही हुशार असलो तरी जर आपले भाग्य नसेल तर आपल्याला मार खावा लागतो असे अनुभवास येत आहे. तरी आपण आपली शिकस्त करत रहावयाला पाहिजे हे सुद्धा तितकेच खरे आहे. तू पांडवांना किती प्रकारे खच्ची करण्याचा प्रयत्न करत आला आहेस हे मी जाणतो, तरी तेंच तुला भारी जात आहेत, त्यांच्या गैरहजेरीत जे तू भोगलेस ते तुझे भाग्य होते, आता ते संपत आले असावे असे दिसते. त्यांना जाळण्याचा प्रयत्न तू केलास काय झाले त्याचे? तुझा दोस्त विरोचन त्यात जीवंत जळला. तू जे जे केलेस ते सगळे तुझ्यावरच उलटत आहे हे तुझ्या लक्षात येत नाही कां? पांडव कांहीं खास प्रयत्न करत आहेत असे मला दिसत नाही तरी त्यांचीच सरशी होत आहे. भिष्म म्हणतं जेथे जनार्दन आहे तेथे भाग्य जाते ते खरे असेल तर त्याप्रमाणे होत आहे. मग आपण कां लढत आहोत दुर्योधना? जर तू प्रयत्नाची पराकाष्ठा केलीस तर कदाचित तुझे नशिब उघडेल. यशाचा संबंध तुझ्या दैवाशी आहे. मान्य कर अथवा नको, पण तेंच सत्य आहे असे मला वाटू लागले आहे. एक योद्धा नेहमी त्याच्या हिम्मतीला दैवापेक्षा जास्त मानतो पण शेवटी तो काय मानतो अगर काय मानत नाही ह्याला निसर्गाच्या कार्यामध्ये कांहींच किंमत नसते. जेव्हां युद्ध प्रारंभ झाले तेव्हां आपले सैन्य किती होते व आता किती झाले आहे ते पहा. आपले सगळे चांगले लढत होते ते नाकारता येणार नाही तरी काय झाले"? संजय पुढे सागतो, ते बोलत असतांना पांडवांची एक पलटण त्यांच्यावर चालून आली युद्ध जुंपले. अहो कुरु राजे, हे सगळे तुमच्या कर्माची फळं होती.

जयद्रथ वध पर्व भाग एकशे एकोणपन्नासावा संपला.

- जयद्रथ वध पर्व संपले –

- द्रोण पर्व भाग तिसरा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235О.html

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद